विकणे आहे
महिंद्रा जिटो २०१८ मॉडेल
उत्तम स्थिती पासिंग २०२६
पर्यंत विकणे आहे.
पत्ता : साई-इन हॉटेल चोंढी, अलिबाग.
मो.नं. ९८८१५७५८१३

रायगड, मंगळवार, दि. २५ जून २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹

## सरकारकडून बळीराजाची बोळवण

# घोषणांचाच पुरस्कार

### तीन वर्षांपासून पुरस्कार वितरण रखडले

। अलिबाग । प्रतिनिधी ।

शेतामध्ये वेगवेगळे प्रयोग करुन अन्य शेतकऱ्यांना आदर्श ठरत असलेल्या शेतकऱ्यांचा राज्य कृषी विभागाच्यावतीने विविध पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येत असतो. दरवर्षी जिल्हा कृषी विभागाकडून प्रस्ताव पाठविण्यात आल्यानंतर या पुरस्कारांचे वाटप केले जात होते. मात्र, गेल्या तीन वर्षांपासून या पुरस्कारांची फक्त घोषणा झाली आहे. प्रत्यक्षात वाटप अद्याप झालेले नाही. त्यामुळे कृषी पुरस्कारांचे वितरण करण्यास मुख्यमंत्री व कृषीमंत्र्यांना वेळच मिळत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजीचा सूर उमटू लागला आहे.

१ जुलै हा दिवस कृषी दिन म्हणून महाराष्ट्र राज्य सरकार मोठ्या उत्साहात साजरा करत आहे. या दिवसाचे औचित्य साधून भाजीपाला-फलोत्पादन आणि भातशेतीत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या राज्यातील शेतकऱ्यांना राज्य सरकार विविध प्रकारचे कृषीभूषण तसेच वसंतराव नाईक यांच्या नावे कृषीभूषण पुरस्कार देऊन गौरव करीत असते. मात्र, राज्य सरकारकडून राज्यातील शेती क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शेतकऱ्यांना जाहीर करण्यात आलेल्या कृषी पुरस्काराचे वितरण करण्यास वेळच मिळत नसल्याने शेतकरी नाराज आहेत. •> पान २ वर

### कृषी अधिकारी कामात व्यस्त

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बाणखेळे यांची बदली झाल्याने त्यांच्या जागी वंदना शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना अद्याप पुरस्कार न मिळाल्याबाबत शिंदे यांच्याशी भ्रमणध्वनीवर सोमवारी दुपारपासून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्या कामात इतक्या व्यस्त होत्या की त्यांना फोन उचलण्यास वेळच मिळाला नाही.

### रायगडातील दहा शेतकरी

रायगड जिल्ह्यातील दहा शेतकऱ्यांना राज्य सरकारकडून वसंतराव नाईक कृषी भूषण पुरस्कारासह विविध पुरस्कार जाहीर करण्यात आले. त्याचे परिपत्रकही गेल्या चार महिन्यांपूर्वी काढण्यात आले. मात्र, प्रत्यक्षात शेतकऱ्यांना पुरस्कार वितरीत करण्यात आला नाही. सरकारकडून पुरस्काराची फक्त घोषणा करण्यात येत असून, प्रत्यक्षात वितरण झालेले नाही. त्यामुळे बळीराजाला या पुरस्काराची प्रतीक्षा लागून राहिली आहे.

> कृषी पुरस्काराचे वितरण करण्यास वेळच मिळत नसल्याने राज्यातील शेतकऱ्यांमध्ये सरकारविरोधात नाराजीचा सूर उमटू लागला आहे. तरी, १ जुलै या कृषी दिनाचे औचित्य साधून जाहीर करण्यात आलेल्या पुरस्कारांचे वितरण करण्यासाठी पुढाकार घ्यावा.
> – निर्भय म्हात्रे, शेतीनिष्ठ शेतकरी

# मान्सूनने अवघा महाराष्ट्र व्यापला

। पुणे । प्रतिनिधी ।

मान्सूनने रविवारी उर्वरित महाराष्ट्र व्यापला असून, आता संपूर्ण महाराष्ट्रात मान्सून दाखल झाल्याचे जाहीर करण्यात आले. सोमवारपासून सुरू होणाऱ्या आठवड्यामध्ये कोकण-गोवा येथे बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात अनेक ठिकाणी, मराठवाड्यात काही ठिकाणी, तर विदर्भात अनेक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे.

राज्यामध्ये गेल्या आठवड्यात पावसाने विश्रांती घेतली. त्यानंतर आता मान्सूनच्या खंडानंतर, महाराष्ट्रात पाऊस सुरू होणार आहे. त्याचे स्वरूप पूर्वमोसमी वळीव स्वरूपातील गडगडाटी पावसासारखे असण्याची शक्यता आहे. गेल्या पाच दिवसांपासून म्हणजे मंगळवार, १८ जूनपासून मुंबई शहर, उपनगर, •> पान २ वर

### शेवटचा आठवडा जोरदार पावसाचा

बंगाल उपसागरात मान्सूनच्या पावसाला अनुकूल बदल झाले आहे. यामुळे आता जूनच्या शेवटच्या आठवड्यात राज्यात जोरदार पाऊस पडणार आहे. आता उत्तर महाराष्ट्र, मध्य महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्रातील नाशिक, नगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर या १० जिल्ह्यांत मध्यम ते जोरदार, पावसाची शक्यता पुणे हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

### रायगडला ऑरेंज अलर्ट

रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, साताऱ्याचा घाट परिसर या भागात या आठवड्यात 'ऑरेंज अलर्ट' देण्यात आला आहे. तुरळक ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता प्रादेशिक हवामान विभागाने या काळात वर्तवली आहे. मुंबई, ठाणे आणि पालघर या जिल्ह्यांमध्येही मंगळवारपासून तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. पालघर जिल्ह्यात सोमवारी तुरळक ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडू शकतो.

**आजचा अग्रलेख**
**नको असलेला विकास**

## वे|ध|क

### पतीने केली पत्नीची हत्या

**तळा :** चारित्र्याच्या संशयावरून पतीने पत्नीची निर्घृण हत्या केल्याची घटना तळा तालुक्यातील दहिवली येथे २३ जून रोजी घडली आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, आरोपी सीताराम धोंडू शिर्के (५५) याने त्याची पत्नी मालती सीताराम शिर्के (५०) हिचे बाहेर विवाहबाह्य संबंध असल्याचा संशय घेऊन तिला दहिवली बौद्धवाडी गावाकडे जाणाऱ्या रोडच्या उजव्या बाजूस कुंपनाजवळील जागेत पोटावर चाकूने वार करून व तिचे डोके दगडाने ठेचून तिची निर्घृणपणे हत्या केली. या घटनेची माहिती मिळताच तळा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन आरोपीला ताब्यात घेत त्याच्यावर गुन्हा दाखल केला.

### आरोपींना २९ जूनपर्यंत कोठडी

**पुणे :** पुणे एल ३ बार ड्रग्स प्रकरणातील आठ आरोपींना २९ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. आरोपींना सोमवारी न्यायालयात हजर करण्यात आले होते. त्यानंतर सत्र न्यायालयाने ही शिक्षा सुनावली. पोलिसांनी न्यायालयाकडे आरोपींची सात दिवसांची पोलीस कोठडी मागितली होती. त्यानंतर न्यायालयाने आरोपींना कोठडी सुनावली आहे. एल ३ बार पार्टीमध्ये अल्पवयीन मुलांचा समावेश होता का, याचा तपास सध्या सुरु आहे.

# पेणमध्ये बेकरीतील खारी खराब

। पेण । प्रतिनिधी ।

पेण चावडीनाका येथील एका बेकरीतील खारी खाल्ल्याने लहान मुलीची प्रकृती अस्वस्थ झाली. खारी फोडून पाहिली असता खारी आतून खराब असल्याचे आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. याची माहिती बेकरीच्या मालकाला दिली असता त्याने अरेरावीची भाषा वापरत उलट ग्राहकाला दमबाजी करण्याचा प्रकार घडला.

आरोग्याशी खेळणाऱ्या प्रभात बेकरीवर कारवाई व्हावी, या उद्देशाने सोमवारी (दि. २४) अन्न व औषध प्रशासनाकडे लेखी तक्रार करण्यात आली आहे.

याबाबत हकीकत अशी की, राजन पाटील यांनी रोजच्या प्रमाणे प्रभात बेकरीमधून खारी नेली. त्यांच्या छोट्या मुलीने •> पान २ वर

### तक्रारदाराला मालकाकडून अरेरावी

### नागरिकांनो, सावधान!

प्रभात बेकरी कित्येक वर्षे बेकरी पदार्थांची विक्री करत आहे. मधल्या काळात अनेक वेळा या बेकरी मालकाच्या अरेरावीचे किस्से समोर आले; परंतु कुणी तक्रार देण्यास पुढे येत नव्हते. परंतु, आता या बेकरीतील पदार्थांची पोलखोल झाली आहे. नागरिकांचा येथील पदार्थांवर विश्वास असल्याने ते डोळे मिटून पदार्थ खरेदी करीत होते. परंतु, त्याचा गैरफायदा बेकरी मालकाने घेतल्याची चर्चा सध्या पेणमध्ये आहे.

# कशेडी बोगद्याला गळती

। रत्नागिरी । प्रतिनिधी ।

मुंबई-गोवा महामार्गावरील कशेडी घाटातील बोगद्याची दोन महिन्यांतच दुरवस्था झाली आहे. कशेडी घाटातील बोगद्याला गळती लागली आहे. बोगद्यात पाणी गळत असल्याने वाहनचालकांना प्रवास करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. कशेडी घाटातील बोगद्यात सर्वत्र पाणी गळत असल्याने महामार्गाच्या कामाबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. याविरोधात ठाकरे गट आक्रमक झाला आहे.

रत्नागिरीतील खेडमधील कशेडी बोगद्यातली गळती वाढली आहे. मुंबई-गोवा महामार्गावरील कशेडी घाटातील बोगद्याला अनेक ठिकाणी गळती लागली आहे. सिमेंटच्या फेसिंगमधून पाण्याचे फवारे उडत आहेत. •> पान २ वर

### दोन महिन्यांपूर्वीच वाहतूक सुरू

लोकसभा मतदानासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी कशेडी बोगद्यातील वाहतूक १ मेपासून पुन्हा सुरू करण्यात आली. बोगद्यातून दुहेरी वाहतूक सुरू करण्यात आली. मतदानासाठी मोठ्या संख्येनं चाकरमानी कोकणात येण्याच्या शक्यतेनं हा निर्णय घेण्यात आला होता. वळणावळणाच्या कशेडी घाटातील प्रवासाच्या वेळेत बचत होते. ५ ते ७ मिनिटांत कशेडी घाटाचं अंतर बोगद्यावाटे कापता येते.

# म्हसळ्यात स्विफ्ट कारला भीषण अपघात

### तिघे जागीच ठार, एक जखमी

। म्हसळा । वार्ताहर ।

गोरेगाव-श्रीवर्धन राज्य मार्गावरील खामगाव आणि कणघर हद्दीत हमरस्त्यावर गोरेगावकडून म्हसळाकडे येत असताना स्विफ्ट चालकाचा गाडीवरील ताबा सुटल्याने अपघात होऊन तीन जण जागीच ठार, तर एक गंभीर जखमी झाला आहे.

अपघातात गाडी चालक मोहम्मद रफीक शेख अंदाजे वय ३४ वर्षे, रा.म्हसळा, कृष्णा हरिश्चंद्र कांबळे वय ४५ वर्षे, रा. मेंदडी कोंड, मोहम्मद याचा मुलगा मुसा शेख वय वर्षे ५ हे जागीच ठार झाले असून, मोहमद याचा सहा वर्षाचा मोठा मुलगा ईसा महमद शेख गंभीर जखमी झाला असल्याचे सांगण्यात आले. त्याला पुढील उपचारासाठी मुंबई येथे हलविण्यात आले आहे. २३ जून रोजी सायंकाळी पावणे पाच वाजताच्या सुमारास अपघाती वाहन क्रमांक एमएच-०६-ए.एन.२२२३ स्विफ्ट गाडीचा म्हसळा कणघर येथे अपघात झाल्याचे फोटो सोशल मीडियावर प्रसिद्ध झाले असता सदरची गाडी म्हसळा येथील असल्याचे समजताच एकच हाहाकार उडाला.

# कशेडी घाटात अपघात; दोघे जखमी

• (छायाचित्र : शैलेश पालकर)

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

मुंबई-गोवा महामार्गावरील कशेडी घाटात इसुजू पिकअप टेम्पो व टोईंग व्हॅन यांची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात दोघेजण जखमी झाले आहेत. भरदुपारी दोन वाजता पार्टेवाडी गावाच्या हद्दीत हा अपघात झाला.

डी मॅक्स गाडी (क्रमांक एमएच ०४ केएफ ४८०४) वरील चालक अनिस हसन मिया जसनाईक (वय २७, रा. खेड जसनाईक मोहल्ला) हा त्याच्या ताब्यातील इसुजु पिकअप टेम्पो महाड ते खेड असा चालवित घेऊन जात असताना समोरून रत्नागिरी ते महाड येणारी टोईंग व्हॅन (क्रमांक एमएच १२ एचएफ ४२५१) ला समोरून ठोकर दिल्याने अपघात झाला. यावेळी इसूजू टेम्पो टोईंग व्हॅनच्या धडकेने रस्त्याच्या कडेला पलटी झाला. या अपघातात टोईंग •> पान २ वर

### कार अपघातात एक जखमी

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर महाड तालुक्यातील चांढवे बुद्रुक येथे हुंडाई कार कंटेनरला मागून धडकल्याने अपघात झाला. अपघातातील जखमींना पोलादपूर ग्रामीण रूग्णालयामध्ये तातडीचे उपचार करून पुढील उपचारासाठी मुंबई येथे पाठविण्यात आले. या अपघातामध्ये हुंडेई कारमधील एका प्रवाशाला •> पान २ वर

# ग्रामस्थांच्या लढ्याला यश

। उरण । वार्ताहर ।

उरण तालुक्यातील न्हावा शेवा बंदराच्या दुसऱ्या टप्प्यासाठी शेवा गावठाणाची जमीनसुद्धा लागेल, असे बनावट कारण सांगून शासनाने शेवा गावातील ग्रामस्थांना विस्थापित करून बोकडविरा येथील जमिनीवर गेली ३९ वर्षे तात्पुरत्या स्वरुपात वास्तव्यास ठेवले होते. आपल्याला हक्काची जमीन मिळावी यासाठी ग्रामस्थांनी शासन आणि जेएनपीटीविरोधात लढा उभारला होता. त्या लढ्याला यश आले असून, नवीन शेवा ग्रामस्थांना हक्काची जमीन मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

एमआरपीटीपी ॲक्ट १९७६ नुसार या विस्थापितांचे पुनर्वसन करणे गरजेचे होते. परंतु, या विस्थापितांना शासनाने दुर्लक्षित करून ३३ हेक्टरऐवजी फक्त १० हेक्टरवर

■ **३९ वर्षांनंतर मिळणार नवीन शेवा गावाला हक्काची जमीन**

तात्पुरत्या स्वरुपात वास्तव्यास ठेवले होते. गेली अनेक वर्षे गावकरी संघर्ष करून, आंदोलने करून आपला हक्क मांगत होते, पण शासन व जेएनपीटी याकडे दुर्लक्ष करून खोटीनाटी कारणे सांगून टाळाटाळ करीत होते. परंतु, गेल्या काही महिन्यांपासून गावातील ग्रामस्थांनी अथक प्रयत्न करून व सततचा पाठपुरावा करून शेवटी यश पदरी पाडले. सोमवार, दि. १ जुलै रोजी जेएनपीटी पुनर्वसित नवीन शेवा गावाची ३३.६४.०५ हेक्टर जमिनीची कायमहक्क मोजणी करण्यात येत असल्याने ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण तयार झाले आहे.

## पदवीधर मतदारसंघ निवडणूक प्रचाराची सांगता

# मतदारांना 'लक्ष्मी'ची उत्सुकता

आविष्कार देसाई

। रायगड ।

शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी शिंदे गटाने पैसे वाटप केल्याचा आरोप केला आहे. तर, शिक्षणतज्ज्ञ हेरंब कुलकर्णी यांनी महिला मतदारांना नथ आणि पुरुष मतदारांना कपडे वाटत असल्याचा दावा केल्याने खळबळ उडाली असतानाच आता रायगड जिल्ह्यामध्ये मतदारांसाठी जेवणावळी उठत आहेत. तसेच मतांना पाच हजार रुपये देण्यात येत असल्याची जोरदार चर्चा आहे. त्यामुळे काही मतदार हे दरवाजात उभे राहून 'लक्ष्मी' आपल्या घरी कधी येणार याची वाट बघत असल्याचे चित्र आहे.

शिक्षक/पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी सोमवारी प्रचाराची सांगता झाली. २६ जून रोजी मतदान पार पडणार आहे. निवडणूक अनेक कारणांनी चर्चेत आली आहे. पदवीधर मतदारांना विविध प्रकारची प्रलोभने दाखवण्यात येत आहेत. याप्रकरणी आचारसंहितेचा भंग झाल्याच्या तक्रारी झाल्या आहेत. रायगड जिल्ह्यामध्ये खरी लढत ही महाविकास आघाडीचे रमेश किर आणि भाजपाचे निरंजन डावखरे यांच्यामध्येच होत आहे. •> पान २ वर

### महाविकास आघाडीची झेप

कोकण पदवीधर मतदारसंघामध्ये मोठ्या संख्येने पदवीधर मतदारांची नोंदणी महाविकास आघाडीने केली आहे. त्यामुळे रमेश किर यांचे पारडे जड असल्याने भाजपाच्या निरंजन डावखरेंसाठी ही निवडणूक तशी सोपी नसल्याचे दिसते. शेवटी मतदारराजा कोणाच्या पारड्यात मतांचे दान टाकणार हे निकालानंतरच स्पष्ट होणार आहे.

**जिल्ह्यातील 15 तालुक्यांमध्ये 81 मतदान केंद्र**

कोकण पदवीधर मतदारसंघाची निवडणूक २६ जून रोजी होणार आहे. सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. रायगड जिल्ह्यातील १५ तालुक्यांमध्ये तब्बल ८१ मतदान केंद्र उभारण्यात आले आहेत. पनवेल-२७, उरण, कर्जत आणि रोहा प्रत्येकी-६, खालापूर आणि महाड प्रत्येकी -४, अलिबाग-पेण प्रत्येकी-८, माणगाव-३, पाली-सुधागड, मुरुड आणि श्रीवर्धन प्रत्येकी-२, तळा, म्हसळा आणि पोलादपूर प्रत्येकी-१ मतदान केंद्राचा समावेश आहे.

# कर्जतमध्ये ३८७५ मतदार हक्क बजावणार

। नेरळ । प्रतिनिधी ।

कोकण पदवीधर मतदारसांघात कर्जत तालुक्यात ३८७५ मतदार आहेत. २६ जून रोजी पदवीधर मतदारसंघासाठी निवडणूक होत असून, कर्जत तालुक्यात सहा मतदान केंद्रांवर मतदान घेतले जाणार आहे. तालुक्यातील एकूण पदवीधर मतदार यांच्यात महिला मतदारांची संख्या कमी आहे. पुरुष मतदार २४३७ असून महिला मतदार १४३८ एवढ्या आहेत.

२०१८ मध्ये कोकण पदवीधर मतदारसंघाची सार्वत्रिक निवडणूक झाली होती. यावर्षी पुन्हा त्याच महिन्यात सहा वर्षांनी कोकण पदवीधर मतदारसंघाची निवडणुकीसाठी मतदान होणार आहे.कोकण पदवीधर मतदारसंघातील रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात यावेळी ३८७५ पदवीधर मतदारांनी नोंद केली असून, यावर्षी तब्बल दोन मतदान केंद्रांची वाढ झाली आहे. गतवर्षी कर्जत येथे तीन आणि नेरळ येथे एक अशी चार मतदान केंद्रे उभारण्यात आली होती. यावर्षी मतदार वाढले असल्याने कर्जत तालुक्यात सहा मतदान केंद्र बनविण्यात आली आहेत. त्यातील चार मतदान केंद्रे ही नवीन प्रशासकीय भवनातील पहिल्या मजल्यावर उभारण्यात आली आहेत, तर दोन मतदार केंद्रे नेरळ येथील महसूल मंडळ अधिकारी कार्यालयाच्या बाजूला असलेल्या रायगड जिल्हा परिषदेच्या कन्या शाळेत उभारण्यात आली आहेत.

कर्जत येथील प्रशासकीय भवनात मतदान केंद्र ५१,५१अ, ५२ आणि ५२अ असे चार मतदान केंद्र बनविण्यात आली आहेत. तहसीलदार यांच्या केबिनमध्ये तसेच पुरवठा शाखा आणि कुळवहिवाट शाखा अशा तीन कार्यालयात चार मतदान केंद्र बनविण्यात आली आहेत. या चार मतदान केंद्रांवर २८९१ पदवीधर मतदार मतदानाचा अधिकार बजावणार आहेत.

कर्जत प्रशासकीय भवन येथील मतदान केंद्रावरील मतदान केंद्रांवर अनुक्रमे ८८३,८८२,५५८ आणि ५६८ मतदार यांना मतदान करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तर नेरळ येथील दोन मतदान केंद्रांवर मिळून ९८४ पदवीधर मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. नेरळ येथे मतदान केंद्र क्रमांक ५३ आणि ५३अ असे दोन मतदान केंद्र आहेत.कोंकण पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी प्रत्येक मतदान केंद्रांवर प्रत्येकी सहा कर्मचारी यांची नियुक्ती निवडणूक यंत्रणा यांच्याकडून करण्यात आली आहे. २६ जून रोजी मतदान सकाळी सात ते सहा या वेळेत होणार आहे, अशी माहिती कर्जत तहसीलदार डॉ. शीतल रसाळ यांनी दिली आहे.

# कोयना प्रकल्पग्रस्तांचा एल्गार

## पावसाळी अधिवेशनात लाँग मार्चने धडकण्याचा इशारा

**। रसायनी । वार्ताहर ।**

६४ वर्षे झाली तरीही कोयना प्रकल्पग्रस्त जनतेच्या न्याय मागण्या पूर्ण होत नसल्याने अखिल कोयना पुनर्वसन सेवा संघाने २८ जून रोजी तालुक्याच्या ठिकाणी तर २ जुलै २०२४ रोजी लाँग मार्चने पावसाळी अधिवेशनात विधिमंडळावर मोर्चा धडकणार असल्याची माहिती अध्यक्ष विठ्ठल मोरे यांनी प्रसार माध्यमांना दिली.

कोयना प्रकल्पग्रस्त जनतेला सातारा जिल्ह्यातून हद्दपार होऊन ६४ वर्ष झाली तरीही प्रशासन त्याची दखल घेत नसल्याने अखिल कोयना पुनर्वसन सेवा संघ महाराष्ट्र राज्य हे २८ जून रोजी राज्यव्यापी आंदोलन करणार असून हे आंदोलन कोयना प्रकल्पग्रस्त गावातील तालुक्याच्या ठिकाणी तहसील कार्यालयावर धडकणार, तर २ जुलै २०२४ रोजी कोकणभवन येथून पावसाळी अधिवेशनात विधी मंडळावर लाँग मार्चने धडकणार आहे.

अखिल कोयना पुनर्वसन सेवा संघाची वार्षिक बैठक खालापूर तालुक्यातील धवली या पाच गावात झाली,तर दुसरी बैठक पनवेल तालुक्यातील अकल्पे या गावी रायगड,ठाणे,पालघर,रत्नागिरी,सातारा, सोलापूर जिल्हयातील कोयना प्रकल्पग्रस्त गावातील प्रकल्पग्रस्त खातेदार आणि त्यांच्या वारसांची संप्पन झाली, त्यावेळी झालेल्या सभेत वरील निर्णय घेण्यात आल्याची माहिती अखिल कोयना पुनर्वसन सेवा संघाचे अध्यक्ष विठ्ठल मोरे यांनी दिली. गेली ६४ वर्ष कोयना प्रकल्पग्रस्त खातेदार अखिल कोयना पुनर्वसन सेवा संघाच्या माध्यमातून लोकशाही मार्गाने आपल्या मागण्या शासकीय दरबारी मांडत आहेत. यात रास्ता रोको आंदोलन, उपोषण, धरणे,बैठक, आंदोलन करण्यात आली. वेळोवेळी आश्वासन देण्यापलीकडे काहीच झाले नाही, विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेही कोयना प्रकल्पग्रस्त आहेत.

या प्रकल्पाच्या त्यावेळी पुनर्वसन कायदा अस्तित्वात नव्हता. पण राज्याचे हित, देशाचा विकास हा विचार करून गरीब, अशिक्षित शेतकरी तत्कालीन राजकीय नेते यांच्या शब्दावर विश्वास ठेऊन आपले मुळ गाव सोडून रायगड ,सातारा,रत्नागिरी,ठाणे,सोलापूर,पालघर या जिल्ह्यात विखुरल्याने आणि दळणवळण साधन नसल्याने कायमचे विखुरले गेले, आणि त्याचाच गैरफायदा तत्कालीन प्रशासन आणि राज्यकर्ते यांनी घेतला. आणि आजही आपल्या नागरी सुविधा, पर्यायी शेती जमीन, नोकरी, प्रकल्पग्रस्त दाखले यापासून दूर राहिले, असे संघाचे ज्येष्ठ सल्लागार पवनराव कदम यांनी प्रस्तुत प्रतिनिधींशी बोलताना सांगितले.

अन्याय किती वर्ष सहन करायचा असा विचार सर्व सामान्य प्रकल्पग्रस्त यांच्या मनात आल्याने येत्या २८ जुन २०२४ रोजी कोयना प्रकल्पग्रस्त गावातील तालुक्याच्या ठिकाणी दिवसभर लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, तर २ जुलै रोजी कोकण भुवन नवी मुंबई येथून लाँग मार्च निघून पावसाळी अधिवेशनात विधीमंडळावर धडक देईल असे कार्याध्यक्ष अर्जुन कदम यांनी सांगितले. यावेळी उपाध्यक्ष आनंद सकपाळ, ज्येष्ठ नेते बळीराम शिंदे, किसन जाधव, अशोक जाधव, सदानंद भातोसे, जीतू सकपाळ, जगदीश मरागजे, मारुती देवरे, सुरेश सकपाळ यांच्यासह प्रकल्पग्रस्त खातेदार मोठया संख्येने उपस्थित होते.

# अलिबागमध्ये कर्मयोग लघुपट प्रदर्शित

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

आपण जे कर्म करतो, त्याचे फळ आपल्याला मिळते. त्यासाठी कर्म कोणते त्यावर त्याची फलश्रुती अवलंबून असते. चांगले कर्म करा. फळ चांगलेच मिळते. हा संदेश देणारा श्रीकांत कवळे लिखित आणि प्रदीप मेस्त्री दिग्दर्शित कर्मयोग हा लघुपट नुकताच अलिबागेतील सुरुची रिसॉर्टमध्ये प्रदर्शित झाला.

महसूल खात्यात ३० वर्षाहून नोकरी केल्यानंतर स्वेच्छा निवृत्ती घेऊन आपल्या आवडत्या क्षेत्रात स्वतःला गुंतवून घेण्यासाठी श्रीकांत पांडुरंग कवळे यांनी चित्रपट क्षेत्राकडे आपले लक्ष केंद्रित केले. सुरुवातीपासूनच साहित्याची आवड असणाऱ्या श्रीकांत यांनी एक कथा लिहिली. त्या कथेचा चित्रपट किंवा लघुपट व्हावा अशी त्यांची इच्छा होती. योगायोगाने किहीम येथील निसर्गोपचार करणारे डॉ.आशिष शेटे यांच्याशी त्यांचा परिचय झाला. डॉ. शेटे यांना देखील निर्मिती क्षेत्रात उतरायचे होते. त्यांनी कवळे यांची कथा ऐकून निर्माता म्हणून होकार दिला.

मुंबईतील दिग्दर्शक प्रदीप मेस्त्री यांच्या बरोबर राजेंद्र नर्बेकर यांच्या माध्यमातून परिचय झाला होता. राजेंद्र नरबेकर यांनी यापूर्वी मेस्त्री यांच्यासोबत एक प्रकल्प केला होता. राजेंद्र यांनी निर्मिती सूत्रधार म्हणून जबाबदारी घेतली. कर्मयोग या लघुपटात काम करणारे नायक, आणि मोजकेच कलाकार व्यावसायिक रंगभूमीवर काम करणारे आहेत. उर्वरित सर्व कलाकार हे अलिबागेतील राहणारे आणि हौशी कलाकार आहेत. त्यातील डॉ.आशिष शेटे, राजेंद्र नरबेकर, बालकलाकार आराध्य नरबेकर यांनी यापूर्वी एका लघुपटात एकत्र काम केले आहे.

कर्मयोग या कथेतील नायक (राजेश भोसले) यांच्या दानी स्वभावावर ही कथा बेतली आहे. ज्यांना मदत करतो त्यांनी केलेल्या उपकाराची ठेवलेली जाण. हा या लघुपटातून सकारात्मक संदेश देऊन जातो. राजेश भोसले, प्रियांका मुणगेकर, हरी ठमके, ज्योती राऊळ, ऋतुजा वाडकर, राजेन्द्र नरबेकर, डॉ.आशिष शेटे, नरेश नारकर, श्रीकांत कवळे, बाल कलाकार, आराध्या नरबेकर, हृदया मेस्त्री यांनी आपापल्या भूमिका चोख बजावल्या आहेत. हा लघुपट समाजाला संदेश देणारा ठरणारा आहे. या प्रीमियर शो साठी सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. लघुपट प्रदर्शित झाल्यानंतर उपस्थित मान्यवरांनी चित्रपटाबाबत आपली प्रतिक्रिया नोंदवली.

# बालग्राममध्ये डॉ. हर्मन मायनर यांची जयंती

**। अलिबाग । वार्ताहर ।**

एसओएस -बालग्राम चळवळीचे जनक दिवंगत डॉ. हर्मन मायनर यांची जयंती रविवार, दि.२३ जून रोजी सोगाव, अलिबाग, जि. रायगड येथील बालग्राममध्ये अतिशय उत्साहात आणि आनंदात साजरी करण्यात आली. डॉ. हर्मन मायनर यांच्या प्रेरणेने जगातील सर्व देशांत एसओएस-बालग्राम सुरू झाले. त्यामध्ये कुटुंबांपासून वंचित, अठरा वर्षापर्यंतच्या मुलामुलींना आईचे प्रेम लाभते आणि भावंडांचा सहवास मिळतो, जवळच्या शाळांत शिक्षणही घेता येते. त्यानंतरही शिक्षण, रोजगारासाठी या सेवाभावी संस्थेद्वारे मदत केली जाते. डॉ. मायनर यांच्या प्रेरणेने भारतात १९६४ पासून बालग्रामे सुरू झाली.

गेल्या साठ वर्षात भारतातील विविध राज्यांत एकूण ३१ बालग्रामे कार्यरत असून, त्यामध्ये ६५ हजारांपेक्षा जास्त मुलामुलींना दरवर्षी सुरक्षित आसरा लाभत आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. शाम जोगळेकर होते. त्यांनी डॉ. हार्मन मायनर यांच्या विलक्षण जीवन आणि कार्याविषयी सांगितले. मुलांच्या वाढीच्या काळात आई आणि भावंडांचा सहवास महत्त्वाचा असतो. व्यक्तिमत्त्व विकासातील कुटुंब आणि अन्य घटकांचे महत्त्व त्यांनी सोदाहरण स्पष्ट केले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून महिला बालकल्याण विभाग, रायगडचे परिवीक्षा अधिकारी योगीराज जाधव उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुरुवातीला डॉ. हर्मन यांच्या अर्धपुतळ्याला सर्वांनी वंदन केले.

या कार्यक्रमाला दिलीप पाटील, सुहास गानू, शिवाजी वाघमोडे आणि काही ग्रामस्थ आणि अन्य हितचिंतक उपस्थित होते. कार्यक्रमाचे शेवटी मान्यवरांच्या हस्ते शिक्षण, क्रीडा क्षेत्रातील यशस्वी मुलामुलींना बक्षिसे देण्यात आली. त्यानंतर तेथील मुलामुलींनी विविध गुणदर्शन कार्यक्रम सादर केला. नृत्य, संगीत, काव्य गायन यामुळे हा कार्यक्रम उत्तम रंगला होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि आभार ग्रामप्रमुख सुजय बाजपाई यांनी केले.

## अज्ञातांकडून गाडीच्या टायर्सची चोरी

**। पनवेल । वार्ताहर ।**

अपोलो कंपनीचे मारुती ग्रॅण्ड व्हिटारा गाडीचे चार टायर्स अज्ञात चोरट्यांनी रिंगसह चोरुन नेल्याची घटना पनवेल तालुक्यातील ओवळे येथे घडली आहे.

ओवळे येथे राहणारे प्रल्हाद गायकवाड यांच्या मालकीची ग्रॅण्ड व्हिटारा गाडीचे चार टायर्स ज्याची किंमत जवळपास ३२ हजार रुपये इतकी आहे. अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## व्यवस्थापकाकडून लाखो रुपयांची फसवणूक

**। पनवेल । वार्ताहर ।**

के.एल. एम. ॲक्सीव्ह फिनवेस्ट लि. या फायनान्स कंपनीच्या पनवेल शाखेत कार्यरत असलेल्या व्यवस्थापकाने ग्राहकांसोबत संगनमत करून बनावट, तसेच कमी प्रतीचे (कॅरेटचे) सोने तारण ठेवून तब्बल २१ लाख ८८ हजार रुपयांचा अपहार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. महेश महादेव कदम असे या व्यवस्थापकाचे नाव असून, पनवेल शहर पोलिसांनी त्याच्या विरोधात फसवणुकीसह अपहाराचा गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.

के.एल.एम. ॲक्सीव्ह फिनवेस्ट लि. ही फायनान्स कंपनी केरळ राज्यातील असून, या कंपनीची शाखा पनवेलमध्ये आहे. या शाखेमध्ये व्यवस्थापक म्हणून महेश कदम यांची नेमणूक करण्यात आली होती. कदम यांनी या पदाचा कार्यभार हाती घेतल्यानंतर फायनान्स कंपनीकडे येणाऱ्या ग्राहकांसोबत संगनमत करून अफरातफर करण्यास सुरुवात केली. मात्र, या फायनान्स कंपनीकडून प्रत्येक महिन्याला ऑडिट करण्यात येत असल्याने मार्च २०२३ मध्ये पनवेल शाखेच्या व्यवहारामध्ये घोटाळा दिसून आला. तपासाअंती व्यवस्थापक महेश कदम याने बनावट व कमी प्रतीचे सोने तारण ठेवून तब्बल ३२ लाख ३५ हजार रुपयांचा अपहार केल्याचे आढळून आले.

## विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**। पाली-गोमाशी । वार्ताहर ।**

शिवयुवा प्रतिष्ठान कळबोशी यांच्यावतीने प्राथमिक शाळा खैरवाडी आणि आतोणे आदिवासीवाडी येथील गरीब आणि गरजू ८० विद्यार्थ्यांना शनिवारी (दि.२२) शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. या शैक्षणिक साहित्यात वह्या, पाटी, पेन्सिल, दप्तर, छत्री, वॉटर बॅग यांचा समावेश होता. यावेळी संतोष भिलारे, हरिश्चंद्र भिलारे, विनायक हुले, अजित भिलारे, शैलेश भिलारे, विपुल भिलारे तसेच सुजय भिलारे, राजू भिलारे, समीर भिलारे, अनिल भिलारे व सर्व सभासद आदी मान्यवर उपस्थित होते.

# कोलाडमध्ये शेतकरी सेवा संघाची सभा

**। सुतारवाडी । वार्ताहर ।**

कोलाड पूर्व विभाग शेतकरी सेवा संघ कुडली, सुतारवाडी, जाम गावची वार्षिक जनरल सभा मनोहर साळवी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी सर्वांनुमते पुन्हा मनोहर साळवी यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी मारुती वाळंज, कार्याध्यक्ष विष्णू मोरे, सचिव दशरथ पवार, उपसचिव नरेश कदम, खजिनदार अशोक शेपोंडे, तर संचालक भागाराम मंचेकर, दत्ता जाधव, माणिकराव सावंत, किसन पडवळ, सुरेश जाधव, राजाराम कोंडे, आनंता जांभळे यांची निवड करण्यात आली. सल्लागार म्हणून गोरखनाथ कूर्ले, चिंतामण दळवी, गोपीचंद कदम, वामन शिंदे, कृष्णा तटकरे, विजय महाडिक, राजू अडलीकर, नथुराम साळवी, विजय सावंत, गंगाराम सावंत, संभाजी जाधव आदींची निवड करण्यात आली.

## वीजपुरवठा सुरळीत

**नेरळ :** बेकरे गावातील वीज रोहित्र बुधवारी सायंकाळी जळाले होते. त्यानंतर महावितरणकडून गुरुवारी जुने वीज रोहित्र बसविण्यात आले. पण, ते एका रात्रीत पुन्हा जळाले. त्यानंतर शुक्रवारी सकाळी नवीन वीज रोहित्र बसविण्यात आले. तेदेखील जळाले असून, रविवारी आाणखी एक नवीन वीज रोहित्र बसवून वीजपुरवठा पूर्ववत करण्यात आला आहे. या कालावधीत नागरिकांना मात्र नाहक त्रास सहन करावा लागला आहे. तसेच वीज गेल्याने व्यापाऱ्यांचे देखील नुकसान झाले.

# आदिवासी बांधवांना जातीचे दाखले वाटप

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

पेण तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत बोरगाव हद्दीतील उंबरमाळ आणि केळीचीवाडी येथील आदिवासी बांधवांना जातीच्या दाखल्यांचे वाटप करण्यात आले. रॅलीज इंडिया लिमिटेड व टाटा केमिकल्स सोसायटी फॉर रूरल डेव्हलोपमेंट यांच्या सहकार्याने ग्रामसंवर्धन सामाजिक संस्थेच्या माध्यमातून उन्नत ग्राम प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्या माध्यमातून हा कार्यक्रम पार पडला.

तांबडी आदिवासी वाडी येथे संपन्न झालेल्या या कार्यक्रमाला टाटा रॅलीजचे तांत्रिक सल्लागार श्रीकांत म्हात्रे, टाटा स्टील फाऊंडेशनचे फिल्ड ऑफिसर उदय गावंड, ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेच्या सामाजिक कार्यकर्त्या मानसी पाटील, राजेश रसाळ, पेण तालुका कृषी सहायक अनंत पाटील, डॉ. आर.के. लोखंडे, सुनील वाघमारे, नरेश कडू, यशवंत, बोरगाव ग्रामपंचायत सदस्य हरिश्चंद्र खाकर, राघी कडू, सविता पवार, बालग्रामित्र सतीश मोकल, विपीन माटे यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी श्रीकांत म्हात्रे यांनी पाणी व कचरा व्यवस्थापनाबद्दल मार्गदर्शन करताना ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेच्या कार्यकर्त्यांनी अल्पावधीत उन्नत ग्राम प्रकल्पांतर्गत उल्लेखनीय काम गिरी केल्याबद्दल कौतुक केले.

सदर दाखले काढण्यासाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव, पेण तहसीलदार कार्यालयातील अधिकारी कर्मचारी यांच्यासह ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेचे कार्यकर्ते राजेश रसाळ, मानसी पाटील, राजू पाटील यांनी मेहनत घेतली.

पान १ वरून

## घोषणांचाच पुरस्कार

रायगड जिल्ह्याला भाताचे कोठार म्हणून ओळखले जात होते. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे भात शेतीचे क्षेत्र कमी झाले असले, तरीही जिल्ह्यातील लाखो शेतकरी शेतीतून आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह चालवित आहेत. रायगड जिल्ह्यामध्ये सध्या ९८ हजार हेक्टर इतके भाताचे क्षेत्र आहे. दोन लाखाहून अधिक शेतकरी जिल्ह्यामध्ये आहेत. यातील काही शेतकरी आधुनिकतेवर भर देत शेतीच्या उत्पादनात वाढ करण्याचा प्रयत्न करतात. भातशेतीबरोबरच भाजीपाला, फलोत्पादन वाढीवरही शेतकरी लक्ष देत आहेत. यामध्ये तरुण शेतकऱ्यांचाही सहभाग वाढत असल्याचे चित्र जिल्ह्यामध्ये दिसून येत आहे.

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक प्रख्यात कृषी तज्ज्ञ व प्रगतशील शेतकरी होते. मुख्यमंत्री असताना कृषी विभागासाठी त्यांचे योगदान मोलाचे राहिले आहे. त्यामुळे त्यांना हरित क्रांतीचे जनक म्हणून ओळखले जाते. त्यांची आठवण प्रत्येक शेतकऱ्यांना स्मरणार्थ राहवी यासाठी राज्य सरकारकडून शेतीमध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या शेतकऱ्यांना वसंतराव नाईक कृषीभूषण पुरस्कारासह शेतीनिष्ठ शेतकरी, युवा शेतकरी असे विविध पुरस्कार देण्याचा निर्णय सरकारने घेतला. त्यानुसार कृषी, कृषी संलग्न क्षेत्र, फलोत्पादन क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांना पुरस्कार देण्यासाठी २०२० पासून ते २०२२ पर्यंत त्यांची यादी तयार करण्यात आली. २३ फेब्रुवारी २००४ रोजी परिपत्रक काढून पुरस्कार देण्याची मान्यतादेखील देण्यात आली. पुरस्कार वितरण कार्यक्रम आयोजित करण्याची जबाबदारी कृषी आयुक्तांकडे सोपविण्यात आली.

रायगड जिल्ह्यातील अलिबागमधील डॉ. मकरंद आठवले यांना वसंतराव नाईक कृषी भूषण पुरस्कार, पाली- सुधागडमधील रसिका फाटक यांना युवा शेतकरी पुरस्कार, रोहामधील धनंजय जोशी यांना वसंतराव नाईक शेतीनिष्ठ पुरस्कार, उरणमधील प्रकाश ठाकूर याना वसंतराव नाईक कृषी भूषण पुरस्कार, रोहामधील संतोष दिवकर यांना कृषी भूषण सेंद्रीय शेती पुरस्कार, पनवेलमधील सज्जन पवार यांना वसंतराव नाईक शेतीनिष्ठ पुरस्कार, पेणमधील धाया भला यांना वसंतराव नाईक शेतीनिष्ठ पुरस्कार, रोहामधील प्राची शेपुंडे यांना जिजामाता कृषी भूषण पुरस्कार, तसेच रोहामधील अनंत भोईर यांना कृषी भूषण सेंद्रीय शेती पुरस्कार आणि उरणमधील प्रफुल्ल खारपाटील यांना वसंतराव नाईक शेतीनिष्ठ पुरस्कार जाहीर केले आहेत. मात्र शेतकरी आजही पुरस्काराच्या प्रतिक्षेत असल्याचे दिसून आले. या शेतकऱ्यांना पुरस्काराची प्रतिक्षा लागून राहिली आहे.

## पेणमध्ये बेकरीतील खारी खराब

सकाळी खारी खाल्ल्याने तिला त्रास होऊ लागला. म्हणून राजन यांच्या पत्नी अहाना यांनी खारी फोडून पाहिली असता ती आतून खराब असल्याचे जाणवले. याबाबत प्रभात प्रभात बेकरी मालक वसंत पारवानी यांना राजन यांची पत्नी अहाना या जाब विचारायला गेले असता बेकरी मालक वसंत याने अरेरावीची भाषा करून कुणालाही तक्रार करा, मी घाबरत नाही. आम्ही दिलेली वस्तू परत घेत नाहीत, तसेच आमची वस्तू खराब नसते. आमच्या बेकरीचे नाव आहे. तुम्ही कुणाकडेही तक्रार करू शकता, असे धमकावले.

दरम्यान, या घटनेची माहिती राजन पाटील यांनी पत्रकारांना दिली. पत्रकारांसह ते स्वत: बेकरीत पोहोचल्यावर बेकरी मालकाची अरेरावीची भाषा बदलली. प्रसार माध्यमांचे प्रतिनिधींनी बेकरी मालकाला जाब विचारल्यावर बेकरी मालकाचा आवाज खाली आला. त्यानंतर सर्व बाबींचे निरीक्षण केले असता बेकरीमध्ये काम करणाऱ्या कामगारांपासून बेकरीमध्ये पदार्थ तयार होत असणाऱ्या खोलीमध्ये अस्वच्छता दिसून आली. हा लोकांच्या आरोग्याशी खेळणारा प्रकार असून, खराब पदार्थ खाल्ल्याने भविष्यात कधीही कोणताही रोग होऊ शकतो. मोठा आजार होण्याचीही शक्यता असते. यामुळे कायद्यानुसार प्रभात बेकरीवर कारवाई व्हावी, अशी मागणी राजन पाटील यांनी केली आहे.

दरम्यान, अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी एम.आर. घोसलवाड यांच्याकडे भ्रमणध्वनीद्वारे संपर्क करुन झालेली घटना त्यांच्या कानावर घातली आहे. त्यावर त्यांनी आज मी ठाण्यात आलो आहे, उद्या बेकरी येऊन तपासतो, आपण लेखी तक्रारही द्या, असे त्यांनी सांगितले. त्याप्रमाणे अधीक्षक अन्न व औषध प्रशासक यांना लेखी तक्रारही दिली आहे. अरेरावी करणाऱ्या अशा बेकरी मालकांविरूद्ध व निकृष्ट दर्जाचे अन्नपदार्थ विकणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई होणे गरजेचे आहे. कारवाई न झाल्यास प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी आरोग्यमंत्र्यांकडे सदरची तक्रार करणार असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, याबाबत प्रभात बेकरीचे मालक वसंत पारवानी यांची प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी संपर्क साधला असता तो होऊ शकला नाही.

## मतदारांना 'लक्ष्मी'ची उत्सुकता

डावखरे हे आधी राष्ट्रवादी काँग्रेसच्या तिकिटावर निवडून आले होते, नंतर त्यांनी भाजपाचे कमळ हाती घेतल्यानंतर भाजपाकडून निवडून आले होते. आता त्यांनी हॅट्ट्रिक साधण्याची तयारी केली आहे.

डावखरेंना पुन्हा उमेदवारी देण्याबाबत भाजपामध्ये मतप्रवाह होता, मात्र उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच हिरवा कंदील दिला. त्यामुळे त्यांना निवडून आणण्याची जबाबदारी मंत्री रवींद्र चव्हाण यांच्यावर आली. त्यामुळे त्यांचीच प्रतिष्ठा पणाला लागली आहे. त्यामुळे त्यांनी चोहोबाजूंनी जोर लावला आहे. रायगड लोकसभा निवडणुकीत धनशक्तीचा जसा विजय झाला, त्याची पुनरावृत्ती करण्याची भाजपाची व्यूहरचना असल्याचे दिसते. या निवडणुकीत मतदारांना 'लक्ष्मी'चे दर्शन होणार असल्याचे बोलले जाते. 'लक्ष्मी' आपल्याकडे येणार असल्याने काही मतदार हे 'लक्ष्मी'ची वाट पाहात आहेत. ज्यांनी मतांची अधिक नोंदणी केली आहे, तेदेखील मतदारांच्या याद्या हातात घेऊन तोलभाव करण्यासाठी पुढे सरसावल्याची चर्चा आहे. परंतु, त्यांच्यापर्यंत अद्याप कोणीच पोहोचले नसल्याने त्यांचा हिरमोड झाल्याचे बोलले जाते. काही ठिकाणी तर मतदारांसाठी दारु- मटणाच्या पार्ट्यादेखील पार पडल्याची चर्चा आहे.

**राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि मनसेची पाठ**

रविवारी अलिबाग येथील होरायझन सभागृहात निरंजन डावखरे यांच्या प्रचारार्थ विजयी संकल्प मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. भाजपासह शिवसेनेचे (शिंदे गट) प्रमुख नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि मनसेचे प्रमुख नेते अथवा पदाधिकारी दिसून आले नाहीत. त्यांनी या मेळाव्याकडे पाठ फिरव्याचे दिसून आले. महायुतीमधील सर्व घटक पक्ष एकत्र आहेत. अन्य ठिकाणी प्रचारात व्यस्त असल्याने ते येऊ शकले नाहीत, अशी सारवासारव भाजपाचे उमेदवार निरंजन डावखरे यांनी केली.

## मान्सूनने अवघा महाराष्ट्र व्यापला

ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात मान्सूनने जोरदार हजेरी लावली आहे. जूनच्या ह्या शेवटच्या आठवड्यातसुद्धा मुंबईसह संपूर्ण कोकणात जोरदार ते अतिजोरदार पावसाची शक्यता ही अजूनही कायम टिकून आहे. तर मुंबई शहर, उपनगर, व कोकणात ह्या आठवड्यात काही ठिकाणी अतिवृष्टी होण्याची शक्यताही वर्तवण्यात आली आहे.

## कशेडी बोगद्याला गळती

त्यामुळे कशेडी बोगद्यातून प्रवास करताना पावसाचा अनुभव येतो. यामुळे वाहन चालकांमध्ये नाराजी आहे. याप्रकरणी राष्ट्रीय महामार्गाच्या तज्ज्ञांकडून पाहणी केली जाणार आहे. दोन किलोमीटर लांबीचा कशेडी बोगदा दोन महिन्यापूर्वी वाहतुकीस खुला झालाय. या प्रकरणाची गंभीर दखल घेत ठाकरे पक्षानं आंदोलनाचा इशारा दिला आहे.

## कार अपघातात एक जखमी

गंभीर स्वरूपाच्या इजा झाल्या आहेत. हुंडाई वेन्यू कार क्रमांक (एमएच ०४ एलएच ३३८) चे चालक राजाराम दत्तू कडू (वय ४०,रा.बदलापूर, जि. ठाणे) व सहप्रवासी निलेश हरिभाऊ शेलार (वय ३१,रा.टिटवाळा, जि. ठाणे), राजकुमार गुलजारराम मल्ही (वय ५७, रा.कल्याण, जि. ठाणे), प्रमोद महादेव खंडागळे (वय ३७, रा.माढा जि.सोलापूर) असे चौघेजण सावंतवाडी ते मुंबई महामार्गावरून प्रवास करताना कार चांढवे बुद्रुक पुलावर आली असता समोरील कंटेनर चालकाने अचानक ब्रेक दाबल्याने हुंडाई कारची कंटेनरला मागून ठोकर लागून अपघात झाला. अपघातानंतर कंटेनर चालक न थांबता त्याने पलायन केले आहे. अपघातात हुंडाई वेन्यू कारचे नुकसान झाले असून, कारमधील राजकुमार गुलजारराम मल्ही यास डोक्याला गंभीर दुखापत झाली आहे, तर अन्य तिघांना किरकोळ स्वरूपाच्या दुखापती झाल्या. अपघाताची माहिती मिळताच महामार्ग पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून अपघातातील जखमींना प्राथमिक उपचारासाठी पोलादपूर ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. जखमींना पुढील उपचारासाठी मुंबई येथे पाठवण्यात आल्याची माहिती महामार्ग पोलिसांकडून देण्यात आली.

## कशेडी घाटात अपघात; दोघे जखमी

व्हॅनवरील चालक रोशन अरविंद पांचाळ (वय २५ रा. सिध्दार्थ नगर जि. अमरावती) याच्या उजव्या पायाला गंभीर दुखापत झाली असून, इसूजु पिकअप टेम्पोच्या चालकासोबतचे प्रवासी हजरत हसनमिया जसनाईक (वय २९ रा.खेड) यांच्या डाव्या हाताला किरकोळ दुखापत झाली.

अपघाताचे वृत्त समजताच कशेडी महामार्ग मदत केंद्राचे पोलीस उपनिरीक्षक प्रवीण धडे, सहाय्यक फौजदार महेश जाधव, पो.ना. शंकर कुंभार, हे.कॉ. रामागडे आदींनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन जखमींना पोलादपूर ग्रामीण रुग्णालय पोलादपूर येथे उपचारासाठी पाठवण्यात आले. जखमींपैकी रोशन पांचाळ यांच्या पायाला गंभीर दुखापत झाल्याने अधिक उपचारासाठी महाड येथे हलविण्यात आले. यानंतर महामार्गावरील वाहतूक कशेडी पोलिसांनी सुरू केली.

## पावसामुळे बळीराजा सुखावला

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

राज्यातयंदाबहुतांशीजिल्ह्यासह रायगड जिल्ह्यात जूनच्या प्रारंभी दुसऱ्या आठवड्यात पावसाला मोठ्या प्रमाणात सुरुवात झाली. मात्र, उरण तालुक्यात अधूनमधून हलक्या सरींचा पाऊस झाला. भातशेतीच्या पेरण्याही झाल्या. मागील दोन आठवड्यांपासून तालुक्यात योग्यतेने पाऊस होत नसल्याने बळीराजाच्या तोंडचे पाणी पळाले होते. मात्र, दोन दिवसात झालेल्या पावसाने शेतात पाणी साचून शेतातील भाताची रोपे वाढू लागली आहेत.त्यामुळे बळीराजा सुखावला आहे.

मुंबईला जोडलेल्या उरण तालुक्यातील बहुतांशी भातशेती केंद्र व राज्य शासनाने विविध प्रकल्पासाठी संपादित केली आहे.मात्र जेएनपीए बंदर,मुंबईला जोडणारा न्हावा - शिवडी सेतू आणि नवीमुंबई विमानतळा लगत असलेल्या अकेकाळी उरण पूर्व विभागातील भाताचे कोठार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उरण तालुक्यातील उरल्या,सुरल्या शेतजमिनीवर राज्यकर्त्यांसह देशातील बड्या भांडवलदारांचा डोळा आहे.

मात्र आपल्या पूर्वजानी शाबूत ठेवलेली काळी आई कोणत्याही प्रकारे न विकता त्या शेतजमिनीची मशागत आजतगायत येथील शेतकरी करीत आहे. तालुक्यातील ठिकठिकाणच्या शेतात पेरणी करण्यात आलेली भाताची रोपे आत्ता जोमाने वाढू लागली आहेत.त्यामुळे तालुक्यातील बळीराजा शेतीच्या मशागतीत मग्न असल्याचे सर्वत्र पाहावयास मिळत आहे. यंदा भात पेरणीसाठी जसा हवा तसा पाऊस बरसला, त्यामुळे भातरोपे चांगली झाली आहेत. काही दिवसात पावसाने वेग वाढवला तर लवकरच लावणी करण्यासाठी भाताची रोपे तयार होतील, अशी माहिती शेतकरी कृष्णा म्हात्रे यांनी दिली.

## तरुणीची गळफास घेऊन आत्महत्या

**पनवेल :** राहत्या घरात अज्ञात कारणावरुन एका तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना पनवेल तालुक्यातील कोळखे गाव येथे घडली आहे. या ठिकाणी राहणाऱ्या एका २७ वर्षीय तरुणीने राहत्या घरात अज्ञात कारणावरुन गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. याबाबतची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## निवडक

### धरणात बुडून एकाचा मृत्यू

**लोणावळा:** पुण्यातील एका महाविद्यालयामध्ये बीबीए शिक्षण घेत असलेला अद्वैत वर्मा रविवारी सुटी असल्याने त्याच्या सहा मित्रांसह पवना धरण परिसरात फिरायला आला होता. सर्वजण पवना धरणात पोहण्यासाठी उतरले असता पाण्याचा अंदाज न आल्याने अद्वैत बुडाला. रात्री उशिरा अद्वैतचा मृतदेह पाण्यातून बाहेर काढण्यात आला. वन्यजीव रक्षक संस्था आणि शिवदुर्ग मित्र या संस्थेतील स्वयंसेवकांची मदत घेतली.

### रांगोळीकारांची रांगोळी कला

**चिरनेर :** गणेशोत्सवाला येत्या सात सप्टेंबर पासून सुरुवात होणार असून, रंगछंदच्या माध्यमातून रंगछंदचे रांगोळीकार गणेशोत्सवात गणपती बाप्पाच्या विविध रूपांचे देखणे रांगोळी प्रदर्शन भरविणार आहेत. गणेश मंडळांच्या गणेशोत्सवात हे रांगोळीकार एकत्र येऊन, गणपती बाप्पाच्या विविध रूपातील देखण्या रांगोळ्या रेखाटणार आहेत. एकंदरीत हे रांगोळीकार एकत्र येऊन सण उत्सवातून आपली कला जोपासण्याचा प्रयत्न करत आहेत.

### पिरकोन येथे वृक्षारोपण

**उरण :** सदाबहार दोस्ती ग्रुप प्रतिष्ठान उरण आणि महाराष्ट्र गुन्हे तपास साप्ताहिकचे पत्रकारांतर्फे उरण तालुक्यातील पिरकोन येथील काशी डोंगरावर वृक्ष लागवड कार्यक्रम संपन्न झाला आहे. या कार्यक्रमासाठी नागेंद्र म्हात्रे, विनायक गावंड, गणेश भोईर, डॉ.हिराचंद पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. तुकाराम गावंड, कामेश्वर म्हात्रे, संतोष जोशी, हरिश्चंद्र म्हात्रे, जितेंद्र म्हात्रे, सचिन पाटील, अरुण म्हात्रे, विजय गावंड या सर्वांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला.

### मोफत आयुर्वेदिक शिबीर

**पनवेल :** माजी आमदार स्वर्गीय तुकाराम सुर्वे प्रतिष्ठान, ज्योविस आयुर्वेदा हॉस्पिटल, नारी सामाजिक संस्था दादर (मुंबई) यांच्या संयुक्त विद्यमाने आणि नवनाथ भक्त मंडळ - पनवेल यांच्या सहकार्याने येथील नवनाथ मंदिर सभागृहात मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबीर आयोजीत करण्यात आले होते. या शिबिराचा २७१ रुग्णांनी लाभ घेतला. डॉ. राज सातपुते आणि श्री नवनाथ भक्त मंडळाचे विजय पानसरे यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

### नदीत बुडून तरुणाचा मृत्यू

**पनवेल :** नदीच्या पाण्यात पोहोण्यास गेलेल्या तरुणांचा पाय घसरून पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे. तरुणाचे नाव प्रविण पुष्पदत्त(वय१६) असे आहे.प्रविण पुष्पदत्त तक्का गावा शेजारील नदीमध्ये पोहण्यास गेला असता, त्यांचा पाय घसरून पाण्यात बुडून त्यात त्याचा दुर्दैवी मुत्यू झाला आहे. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. पुढील तपास पनवेल पोलिस करीत आहेत.

# जनावरांच्या सुरक्षेसाठी पशुसंवर्धन सरसावले

**दीड लाख जनावरांना लसीकरणाचा आधार**

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**पावसाळ्यात गाय, म्हैस, बैल आदी पाळीवर जनावरांना घटसर्प, फऱ्या लम्पीसारखे आजार होण्याची भीती आहे. हे आजार रोखण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने पाऊल उचलले असून, आतापर्यंत ९६ टक्क्यांहून अधिक जनावरांचे लसीकरण करण्यास या विभागाला यश आले आहे. जिल्ह्यातील सुमारे एक लाख ८५ हजार ६०० जनावरांना लसीचा आधार मिळाला आहे.**

रायगड जिल्ह्यात पशुधन वाढविण्यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत वेगवेगळ्या योजना राबविल्या जात आहे. परंतु, जिल्ह्यात सतत हवामानात बदल होत आहे. या बदलाचा परिणाम पशुधनाच्या लोकसंख्येवर होतो. पशुधन घटण्याची भीती अधिक आहे. पावसाळ्यात फऱ्या, घटसर्प, लम्पीसारखे आजार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या वेगवेगळ्या आजारामुळे ताप, येणे, अंगावर फोड येणे, घसा दुखणे अशा अनेकप प्रकारचा त्रास होतो. कित्येक वेळा दुधाळ जनावरांच्या दुधाचे उत्पादन कमी होणे, गर्भपात होणे, दुर्बलता निर्माण होणे अशा प्रकारची समस्या निर्माण होते. ही समस्या रोखण्यासाठी रायगड जिल्ह्यातील पशुसंवर्धन विभाग कामाला लागला आहे.

पावसाळ्यात जनावरांवरील आजार रोखण्यासाठी पावसाळ्यापूर्वी लसीकरण करण्याचे काम करण्यात आले आहे. जिल्ह्यात घटसर्प आजारावर ४४ हजार लसीचा पुरवठा झाला असून, ४२ हजार ७६५ लसी जनावरांना देण्यात आल्या आहेत. या आजारावरील ९८ टक्के लसीकरण पूर्ण झाले आहे. फऱ्या व घटसर्प या आजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी १८ हजार लसी प्राप्त झाल्या असून, १७ हजार ९९७ लसी देण्यात आल्या आहेत. या आजारावरील ९६ टक्के लसीकरण झाले आहे. तसेच लम्पीसाठी एक लाख ४१ हजार लसींपैकी एक लाख २४ हजार ८३८ लसी देण्यात आल्या आहेत. लम्पीचे ९० टक्के लसीकरण झाले आहे.

### शेळ्यामेंढ्यांच्या आरोग्याला भीती

**रायगड जिल्ह्यामध्ये सध्या पावसाळी वातावरण सुरु झाले आहे. कधी ऊन कधी पाऊस तर कधी ढगाळ वातावरण असा वातावरणात बदल होत आहे. या बदलत्या वातावरणाचा शेळ्या मेंढ्याच्या आरोग्यावर परिणाम होण्याची भीती अधिक असते. वाढती आर्द्रता व दमटपणामुळे आंत्रविषार हा विषाणूजन्य आजार होण्याची शक्यता आहे. अतितीव्र स्वरूपाचा आजार असल्याने बाधित शेळ्या, मेंढ्यांचा मृत्यू होता. हे रोखण्यासाठी शेळ्या मेंढ्याच्या सुरक्षेच्या दृष्टीने लसीकरण सुरु करण्यात आले आहे. जिल्ह्यात २४ हजार लसींपैकी २३ हजार ६५८ शेळ्यांचे लसीकरण झाले आहे. तब्बल ९९ टक्के लसीकरण पूर्ण झाल्याची माहिती पशुसंवर्धन विभागाकडून देण्यात आली आहे.**

### तालुक्यात १२ हजार जनावरांचे लसीकरण

**अलिबाग तालुक्यात घटसर्प फऱ्या, आंत्रविषार व लंपी आजारावरील लसीकरणाचे काम तालुका पशुसंवर्धन अधिकारी डॉ. लाळगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु झाली आहे. १२ हजार ३४० लसींचा पुरवठा अलिबाग तालुक्याला झाला असून, आतापर्यंत १२ हजार ९० लसीकरण पूर्ण झाले असल्याची माहिती तालुका पशुसंवर्धन विभागाकडून माहिती देण्यात आली आहे.**

# मोटारसायकलच्या लाईटवर अंत्यसंस्कार

- **स्मशानभूमीत लाईट नसल्याने मोठी गैरसोय**
- **ग्रामस्थांकडून ग्रामपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह**

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ हिंदू स्मशानभूमीत लाईटअभावी मृतदेहावर मोटारसायकलमधील लाईटच्या उजेडात अंत्यसंस्कार करण्याची वेळ ग्रामस्थांवर आली आहे. स्मशानभूमीत विद्यूतपुरवठा नसल्याने ही वेळ त्यांच्या नशिबी आली. दरम्यान, या घटनेमुळे नेरळकर चांगलेच आक्रमक झाले होते, तर ग्रामपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करीत ग्रामस्थांनी या घटनेचा तीव्र निषेध नोंदविला.

शनिवारी (दि. २२) नेरळ पूर्व परिसरातील मातोश्रीनगर येथील राहणाऱ्या साक्षी साळवी यांचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला होता. यावेळी मृतदेह हा अंत्यसंस्कारासाठी नेरळ हिंदू स्मशानभूमीत आणण्यात आला होता. रात्रीचे १० वाजल्याने येथे अंधार होता. स्मशानभूमीत काम सुरू असल्याने येथील विद्युतपुरवठा नसल्याचे समोर आले, तर स्मशानभूमीच्या पायवाटेवरून मृतदेह घेऊन आत प्रवेश करीत असताना ग्रामस्थांना खडतर रस्त्याचा सामना करावा लागला. ठेकेदाराने आपले साहित्य उचलले दिसत नाही, उभ्या राहण्यासाठी असणाऱ्या जागेवर अस्ताव्यस्त सामान विखुरलेले असल्याचा आरोप उपस्थित ग्रामस्थांनी केला.

दरम्यान, त्यावेळी सुदैवाने सरण कसेबसे रचून झाले. नागरिकांनी अंधाराचा सामना आपल्या मोटारसायकलच्या लाईट सुरू करून दूर केला. अंत्यसंस्काराचा विधी सुरू होणार इतक्यात पावसाने रिमझिम सुरुवात करून पुन्हा एकदा संकट उभे केले. स्मशानभूमीच्या कामासाठी शेडवरील पत्रेच ठेकेदाराने काढून ठेवले होते. त्यामुळे पावसाच्या पाण्याने सरण आणि मृतदेह हे दोन्ही भिजणर असल्याने ग्रामस्थांना कपाळावर हात लावण्याची वेळ आली होती, परंतु दैवी चमत्कार झाला पाऊस काही काळ थांबला आणि मृतदेहावरील अंत्यसंस्कार उरकून घेतले. एकूणच काय, तर नेरळ ग्रामस्थांना स्मशानभूमीतदेखील जाण्यासाठी खडतर सामना करावा लागतो.

> **स्मशानभूमीत काम सुरू आहे, तेथे लाईटची सोय आहे; परंतु काही तांत्रिक अडचण असल्याने त्या दिवशी त्या बंद होती. ठेकेदारालाही सूचना केल्या आहेत. अधिक लाईट बसवण्याचीदेखील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना सूचना केल्या आहेत, नागरिकांना झालेली गैरसोय ही नक्कीच खेदाची बाब आहे; परंतु यापुढे लक्ष ठेवले जाईल, ग्रामस्थांनीदेखील सहकार्य करावे.**
>
> – अरुण कारले,
> ग्रामसेवक, नेरळ ग्रामपंचायत

# दि.बा.पाटलांना अभिवादन

**। उरण । वार्ताहर ।**

रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनिअर कॉलेज दहागाव विभाग जासई, ता. उरण या विद्यालयामार्फत स्वर्गीय लोकनेते दि.बा. पाटील यांच्या २४ जून या पुण्यतिथीदिनी अभिवादन करण्यात आले.

शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष, भारतीय मजूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री सुरेश पाटील यांच्या हस्ते विद्यालयाच्या प्रांगणात दि.बा. पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्याचबरोबर इतर मान्यवरांच्या हस्ते विद्यालयाच्या प्रांगणात असलेल्या महापुरुषांच्या पुतळ्यास व हुतात्मा स्मारकास पुष्पहार अर्पण करून पूजन केले. रयत शिक्षण संस्थेचे लाइफ वर्कर आणि विद्यालयाचे प्राचार्य अरुण घाग, विद्यालयाचे चेअरमन अरुण जगे व इतर मान्यवरांच्या हस्ते दि.बा. पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन केले गेले.

याप्रसंगी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी दि.बा. पाटील यांच्या जीवनावर भाषणे केली. प्रा. अतुल पाटील यांनी दिबांचा जीवनपट मनोगतातून विद्यार्थ्यांसमोर मांडला.

# विद्यार्थ्यांचा दाखले वाटप शिबिराला प्रतिसाद

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील शालेय विद्यार्थी सध्या विविध दाखले मिळविण्यासाठी तहसील कार्यालयात गर्दी करतात. विद्यार्थ्यांना कर्जत येथे फेऱ्या मारायला लागू नये यासाठी शिवसेना नेरळ शहर शाखा यांच्या माध्यमातून शालेय दाखले वाटप शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात २०१ विद्यार्थी तसेच ज्येष्ठ नागरिकांनी दाखले मिळविण्यासाठी नोंदणी केली.

नेरळ येथील अंबामाता मंदिर येथे आयोजित करण्यात आलेल्या शासकीय दाखले शिबिराचे उद्घाटन शिवसेनेचे कर्जत तालुका प्रमुख संभाजी जगताप यांचे हस्ते झाले. त्यावेळी नेरळ ग्रामपंचायत सरपंच उषा पारधी, शिवसेनेचे जिल्हा सल्लागार नंदू कोळंबे, शहर प्रमुख प्रभाकर देशमुख, शहर संपर्क प्रमुख किसन शिंदे, जयवंत साळुंखे, महिला आघाडी उपतालुका संघटक वर्षा बोराडे, उपशहर प्रमुख पंढरीनाथ चंचे, ग्रामपंचायत सदस्य गीतांजली देशमुख, जयश्री मानकामे, उमा खडे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. या शिबिरात विद्यार्थ्यांना शाळा प्रवेशासाठी महत्त्वाचे असलेले एक आणि तीन वर्षे उत्पन्नाचे दाखले, अधिवास दाखला, ज्येष्ठ नागरिक दाखला, ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र यांच्यासाठी फॉर्म भरून घेण्यात आले. तहसील कार्यालयातील सेतू कार्यालयाचे प्रतिनिधी मनोज भोईर यांच्या माध्यमातून शिबिरात अर्ज भरलेल्या त्या सर्व लाभार्थ्यांना शिवसेना पक्षाकडून तीन दिवसांनी दाखले घरपोच दिले जाणार आहेत.

या शिबिरासाठी महसूल विभागाचे नेरळ मंडळ अधिकारी संतोष जांभळे, नेरळ तलाठी विकास गायकवाड, कोल्हारे तलाठी उमेशकुमार भोरे, शेलू तलाठी वैशाली मानते, दहिवली तर्फे वरेडी उमाकांत गुरुमुर्ती, पाषाने तलाठी माधुरी चौधरी, दामत तलाठी आशिष राऊत, माणगाव तलाठी कांबळे यांनी विद्यार्थ्यांना कागदपत्र बनवून देण्यासाठी मदत केली. त्यांना कोतवाल अशोक भगत, आदींचे सहकार्य लाभले.

# आक्षीच्या खाडीत सापडला मृतदेह

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

आक्षी येथील खाडीलगत एका व्यक्तीचा मृतदेह सापडला. ही घटना सोमवारी (दि. २४) सकाळी घडली असून, मृतदेहाच्या नातेवाईकांची अद्याप ओळख पटलेली नाही. आक्षी खाडीलगत पुलाजवळ एक व्यक्ती मृतावस्थेत स्थानिकांना दिसून आला. ही बाब अलिबाग पोलिसांच्या लक्षात आल्यावर पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्यासह त्यांचे कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. मृतदेह बाहेर काढण्यात आला. त्याची कसून तपासणी केली, मात्र ओळखीचे कोणतेही पुरावे त्याच्याकडे सापडले नाही. तीन ते चार तासांपूर्वी त्याचा मृत्यू झाला असावा, असा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे.

# कळंब तलाठी कार्यालयाच्या इमारतीचे लोकार्पण

- **स्थानिकांचा लोकसहभागातून पुढाकार**
- **शेतकरी आणि विद्यार्थ्यांच्या कामांना गती**

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील महसूल विभागाचे कळंब येथील तलाठी कार्यालय मोडकळीस आले आहे. त्यामुळे स्थानिकांनी लोकसहभागातून या कार्यालयासाठी पुढाकार घेतला. नवीन जागेत बांधण्यात आलेल्या तलाठी सजा कार्यालयाचे लोकार्पण करण्यात आले.

कर्जत तहसील कार्यालयाच्या अंतर्गत कळंब येथे मंडळ अधिकारी कार्यालय आहे. या कार्यालयाशी संबंधित असलेले कळंब सजा तलाठी कार्यालय नेरळ-कळंब रस्त्यावरील बोरगाव फाटा येथे हे कार्यालय होते. त्याच ठिकाणी मंडळ अधिकारी कार्यालय आणि तलाठी कार्यालय असल्याने शेतकरी, ग्रामस्थ आणि विद्यार्थी यांना दाटीवाटीत आपली कामे करावी लागायची. त्यात अत्यंत कमी जागेत ही कार्यालये असल्याने तेथून कामकाज पाहणे कठीण जात होते. त्यामुळे कळंब तलाठी सजामधील ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते आणि शेतकरी यांनी आर्थिक मदत उभी केली. अनेक हातांनी लोकसहभाग दाखवून कळंब आणि साळोख तलाठी सजामधील ग्रामस्थांच्या मदतीने येथील महसूल विभागाचे तलाठी कार्यालय उभे केले.

या नव्याने बांधण्यात आलेल्या तलाठी सजा कार्यालयाचे लोकार्पण तलाठी राजेश साबके यांच्या हस्ते फीत कापून झाले. यावेळी स्थानिक ग्रामस्थ ॲड. झैद बोंबे, तसेच अनिस बुबेरे, कारकून रामदास पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

# शुद्ध पाण्यासाठी मनसे महिला आघाडी आक्रमक

## सिडको अधिकाऱ्यांना विचारला जाब

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

कळंबोली वसाहतीत मागील काही दिवसांपासून गढूळ पाणीपुरवठा केला जात असल्याने आक्रमक झालेल्या मनसेच्या महिला आघाडीने सिडको कार्यालय गाठून अधिकाऱ्यांना जाब विचारला. महाराष्ट्र नवनिर्माण सेना रायगड जिल्हा सचिव स्नेहल बागल यांच्या यांच्या मार्गदर्शनाखाली सिडको कार्यालयाला धडक देत कळंबोलीवासियांच्या जीवाशी खेळण्याचा कोणालाही अधिकार आहे का, असा सवाल यावेळी बागल यांनी सिडको अधिकाऱ्यांना विचारला.

दरम्यान, त्यांनी सोबत आणलले गढूळ पाण्याचे बाटल्या अधिकाऱ्यांना देऊन पाणी किती घाण येत आहे हे दाखवून दिले. सिडकोने विकसित केलेल्या कळंबोली वसाहतीला सिडकोकडून पाणीपुरवठा केला जातो. पण, सिडकोच्या दिशाहीन व्यवस्थापनामुळे नागरिकांना गेली आठवडाभर गढूळ पाणी प्यावे लागत आहे आणि हे गढूळ पाणी प्यायल्यामुळे याचा विपरीत परिणाम कळंबोलीवासीय गेले काही दिवस अनेक आजाराला सामोरे जात आहेत. आधी सिडकोकडून या वसाहतींना सर्व सुविधा पुरविल्या जात होत्या. पण, सिडकोच्या वसाहती या पनवेल महानगरपालिकेकडे हस्तांतर झाल्यानंतर सिडकोने सुविधा पुरविण्याबाबत हात आखडता घेतला आहे. त्यामुळे सिडकोने याची गंभीर दखल घ्यावी, अशी मागणी बागल यांनी केली आहे. यावर लवकरच तोडगा काढावा, असेही सांगण्यात आले आहे. यावर सिडको अधिकारी प्रफुल देवरे यांनी एमजेपीला पाण्याचे नुमने पाठवून याची पाहणी करण्यास सांगतो, असे सांगितले.

## प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नागरिकांना 'मड बाथ'ची सोय

# रस्त्यावरील चिखलाने वाटसरूंची आंघोळ

**। पाली । वार्ताहर ।**

हरणेरी येथे बेसुमार उत्खननामुळे मातीचे डोंगर उभे राहिले असून, या मातीच्या डोंगराचा काही भाग पावसाच्या पाण्याच्या रेट्याने जांभुळपाडा-कळंब रस्त्यावर येऊन आडवा पसरला. केवळ रस्त्यावर आडवा न होता तो लगतच्या शेतकऱ्यांच्या शेतातदेखील शिरला आहे.

रस्त्यावर चिखल पसरल्याने संजय कदम हा युवक दुचाकीवरून कोसळून त्याला मुका मार लागला. दूध वाहतूक करणारे शेतकरीही या चिखलात आडवे झाले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. आमच्या प्रतिनिधीने या उत्खनाबाबत व होणाऱ्या संभाव्य धोक्याबाबत तहसीलदार यांना प्रत्यक्ष भेटून कल्पना दिली होती. परंतु, महसूल विभागाने कोणतेही पाऊल न उचलल्याने ही दुर्घटना घडली आहे. सुरवातीच्या पावसात ही परिस्थिती आहे, तर मुसळधार पावसात आमचं काय होईल? असा संतप्त सवाल गावकरी विचारत आहेत.

मातीच्या मलब्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाल्यास किंवा जीव गेल्यास जबाबदार कोण? तक्रार करूनही दुर्लक्ष करणारे अधिकारी की थंड बसलेली ग्रामपंचायत? सदर जमीन ही खासगी गृहस्थाच्या नावावर आहे. आपला नातेवाईक आयएस अधिकारी असल्याची बतावणी करून जमीन मालक स्थानिकांवर तसेच प्रशासनावर दबाव आणत असल्याची नागरिकांमध्ये चर्चा आहे. सामान्य नागरिकांवर डोळे वटारणाऱ्या प्रशासनाचे, नातेवाईक आयएस असणाऱ्या जमीन मालकावर कारवाई करताना, हात का थरथरतात याचं उत्तर शासकीय अधिकारी देणार का? जमीन मालक, महसूल विभाग यांच्या हलगर्जीपणामुळे अपघातग्रस्तांचा झालेला वैद्यकीय खर्च व शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान कोण भरून देणार? महसूल विभाग की जमीन मालक? या घटनेने शेतकरी संतप्त असून, आंदोलनाच्या तयारीत आहेत.

> **या घटनेचा पंचनामा करणे अपेक्षित असताना केवळ थातुरमातुर अहवाल तयार केल्याने तलाठी तसेच नायब तहसीलदारांचे जमीनमालकासोबत हितसंबंध तर नाहीत ना? अशी शंका संतप्त ग्रामस्थांमधून व्यक्त केली जात आहे.**

जमीन मालकाने जेसीबी आणून रस्ता साफ केल्यानंतर तलाठी घटनास्थळी पोहोचल्याचे समजते. तलाठी, सजाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी का रहात नाही याची चौकशी होऊन कारवाई होत नसल्याने तहसीलदार कर्मचाऱ्यांवर व धनदांडग्यांवर इतके मेहेरबान का? याचीदेखील चौकशी व्हावी, अशी स्थानिकांची मागणी आहे.

# कोंढाणे येथे एकदिवसीय कार्यशाळा

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

प्राचीन कोंढाणे लेणी येथे बुद्ध लेणी अभ्यासक सूरज जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली एकदिवसीय अभ्यास कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेत लेणी संवर्धक, पुणे व संघमित्रा महिला लेणी संवर्धक समूह महाराष्ट्र यांचा प्रमुख सहभाग होता.

कोंढाणे बुद्ध लेणी ही प्रसिद्ध प्राचीन बुद्ध लेणी आहे. कल्याण व सोपारा या प्राचीन बंदरांपासून बोरघाट मार्गे देर, पैठण आणि जुन्नर येथे जाणाऱ्या व्यापारी मार्गावर आणि रायगड जिल्ह्यातील कर्जतपासून १३ किलोमीटर अंतरावर आहे. कोंढाणे बुद्ध लेणी येथे एकदिवसीय अभ्यास कार्यशाळेत सहभाग घेतला होता. यावेळी साहित्यिक व स्थानिक ज्येष्ठ कार्यकर्ते बबन गायकवाड गुरुजी यांच्या हस्ते वृक्षारोपण कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या लेणी परिसरात जवळ जवळ २०० झाडांची लागवड केली. या ठिकाणी असलेल्या वास्तूचे जतन करण्यासाठी पुरातत्व विभाग उदासीन आहे, अशी खंत सम्यक लेणी संवर्धक संघ आणि लेणी अभ्यासक सूरज जगताप यांनी व्यक्त केली.

# नको असलेला विकास

लोकशाहीमध्ये जनता सरकारे निवडून देतात. त्यांनी जनतेच्या इच्छेनुसार धोरणे आखावीत अशी अपेक्षा असते. पण आपल्याकडे सरकारे परस्पर कार्यक्रम ठरवतात. त्यांनाच विकास असे नाव देतात. तो जनतेच्या कसा हिताचा आहे याचा दिवसरात्र प्रचार करतात. सामान्य लोक पोटासाठी धावत असतात. विचार करायला किंवा बोलायला त्यांना फार अवसर नसतोच. त्यामुळे जनतेला नको असलेल्या असंख्य योजना तिच्या माथी मारल्या जातात. सरकारी शाळेत शिक्षक नसतात, फळे नसतात, मुलामुलींसाठी टॉयलेट नसतात. पण सरकार ठरवते मुलांना संगणक वाटायला हवेत. मग काही शाळांमध्ये संगणक पोचतात. आरोग्य आणि वाहतूक क्षेत्रातही हेच आहे. अलिबागच्या सरकारी इस्पितळाप्रमाणे सरकारी रुग्णालयांमध्ये वरून छत कोसळण्याचे प्रकार सदैव घडत असतात. पण सरकार त्याचा इलाज करीत नाही. त्याऐवजी त्याच मोडकळीला आलेल्या रुग्णालयाला एक-दोन कोटींचे आधुनिक मशीन देते. ते मशीन चालवणारा ऑपरेटरदेखील अनेकदा मिळत नाही. वास्तविक रुग्णालय पण असे मशीन देऊन आपण आपली जबाबदारी पार पाडली असे सरकारला वाटते. अनेकदा यामध्ये निव्वळ राजकारण असते. कंत्राटदारांची भर करणे असते. सत्ताधाऱ्यांचे पैसा जमवण्याचे साधन असते. नुकताच स्थगित करण्यात आलेला शक्तीपीठ हा प्रकल्पही त्यातलाच एक होता. नागपूर ते गोवा यांना जोडणारा हा महामार्ग बारा जिल्ह्यांमधून जाणार होता. भाजपवाल्यांना आपल्या कोणत्याही प्रकल्प किंवा योजनेला धर्माशी जोडायला किंवा पौराणिक नाव द्यायला आवडते. त्यानुसार या रस्त्याला शक्तीपीठ असे म्हटले गेले. राज्यातील व गोव्यातील असंख्य देवीच्या देवळांना हा मार्ग जोडेल अशी बनावट कल्पना त्यात करण्यात आली होती. कोल्हापूरची अंबाबाई, तुळजापूरची तुळजाभवानी, नांदेडची रेणुकादेवी यांची देवळे तसेच पंढरपूर, पट्टणकोडोली अशी तीर्थक्षेत्रे या मार्गामुळे जोडली जातील असा खोटा प्रचार या निमित्ताने करण्यात येत होता. २०२३ मध्ये समृद्धी महामार्गाचे काम पूर्ण होत असताना देवेंद्र फडणवीस यांनी याची घोषणा केली होती.

### तीर्थस्थानांच्या नावाने

वास्तविक, या तीर्थस्थानांना शहरांशी जोडणारे रस्ते आधीपासून अस्तित्वात आहेत. त्यांची व या जिल्ह्यांमधल्या इतर रस्त्यांची स्थिती भयंकर आहे. सरकारची खरेच इच्छा असती तर हे रस्ते सुधारता आले असते. पण त्यातून बहुदा नवी कंत्राटे देता आली नसती व नवे कमिशन खाता आले नसते. नवे काहीतरी केल्यासारखे दाखवण्यासाठी हा प्रकल्प पुढे आणण्यात आला. त्यातही त्याला शक्तीपीठ असे नाव दिले की लोकांच्या धार्मिक भावना सुखावतात हा त्यातला हिशेब. प्रत्यक्षात लोकांकडूनच याला तीव्र विरोध झाला. उत्तराखंडमधील चारधाम यात्रा किंवा महाराष्ट्रातील पंढरपूरची यात्रा यांना प्रदीर्घ अशी परंपरा आहे. मात्र या यात्रा शक्यतो पायी व शरीराला कष्ट देऊनच करायच्या असतात असा संकेत आहे. भाजप सरकारने मात्र अशा यात्रांचे पर्यटन सहलींमध्ये रुपांतर करण्याचा चंग बांधला आहे. त्यामुळे हिमालयाला झेपत नसताना जागोजागी बोगदे, महामार्ग, पंचतारांकित हॉटेले, आलिशान घरे यांचे बांधकाम चालू आहे. त्यासाठी प्रचंड मोठे वीज व पाणी प्रकल्प उभारले जात आहेत. यामुळे निसर्ग कोलमडून पडतो आहे. पण हिंदुत्ववादी म्हणवणाऱ्या सरकारला त्याची पर्वा नाही. शक्तीपीठ मार्गाची कहाणी अशीच काहीशी आहे. त्यासाठी तब्बल २७ हजार हेक्टर जमीन अधिग्रहित केली जाणार होती. त्याने हजारो कुटुंबे भूमिहीन किंवा बरबाद होणार होती. त्यामुळे मराठवाड्यात नांदेड आणि पश्चिम महाराष्ट्रात कोल्हापूर, सांगली या भागात शेतकरी बराच काळ आंदोलन करीत आहेत. खरे तर या भागात धरणे व कालवे यामुळे सिंचन झालेली सुपीक व उत्तम उपजाऊ जमीन आहे. अशी जमीन कोणत्याही प्रकल्पासाठी अधिग्रहित केली जाऊ नये असे नियम व संकेत आहेत. कारण, त्यामुळे सिंचनावर केलेला खर्च वाया जातो व शेती उत्पन्नात घट होऊन लोकांच्या रोजगारांचे नवे प्रश्न निर्माण होतात. पण सत्तेच्या धुंदीत शिंदे-फडणवीस सरकारने असल्या गोष्टींकडे नेहमीच दुर्लक्ष केले आहे.

### धडा शिकवा

हे असेच चालू राहिले असते. पण महायुतीचा लोकसभा निवडणुकीत दणकून पराभव झाला आणि सरकार ताळ्यावर आले. प्रकल्पासाठीच्या जमीन अधिग्रहणाला स्थगिती देण्याची घोषणा करावी लागली. गंमत अशी आहे की, ही स्थगिती येत्या विधानसभा निवडणुकांपर्यंतच आहे. म्हणजे येत्या निवडणुकीत मतांवर काही परिणाम होऊ नये इतकीच चिंता या निगरगट्ट सरकारला आहे. जनता आणि तिच्या विरोधाची किंमत सरकारच्या लेखी काय आहे हे यावरून स्पष्ट दिसते. लोकांना या देशात सहज गुंडाळता येते असा विश्वास त्यामागे आहे. पुन्हा आपणच सत्तेत येऊ व प्रकल्प पुढे रेटू अशी त्याची कल्पना असावी. तेव्हाही लोकांचा विरोध असेलच. पण पुढच्या निवडणुका पाच पाच वर्षे दूर असतील व हा विरोध बोथट करून टाकता येईल असाही त्यामागचा हिशेब असावा. मोठमोठे रस्ते म्हणजेच विकास ही यामागची कल्पना आहे. ती मूर्खपणाची व धोकादायक आहे. समृद्धी महामार्ग किंवा मुंबईतील शिवडी-न्हावाशेवा समुद्री पूल यांचा अपेक्षित वापर होत नसल्याचे दिसून आले आहे. याचे कारण या रस्त्यालगतच्या गावांमधल्या लोकांना त्यांचा फारसा उपयोग नाही. त्यांचे टोल त्यांना परवडणारे नाहीत. त्यांच्या शेती-धंद्यामध्ये त्या रस्त्यांमुळे काही लाभ होणारा नाही. त्यांच्या गावागावांमधले रस्ते खड्ड्यांचे आहेत. मुंबईच्या अलिकडे वा पलिकडे कायम भयंकर वाहतूक कोंडी होते आहे. एकशेवीसच्या वेगाने धावण्याचा व त्यासाठी जादा पैसे देण्याचा उपयोग शून्य आहे. याच रीतीने मुंबई-गोवा मार्गाचे काम रखडलेले असताना नव्या सागरी मार्गाचा घाट घालण्यात आला आहे. शक्तीपीठ मार्गावरही टोल द्यावा लागणार आहे. साहजिकच स्थानिकांना झाला तर त्याचा त्रासच अधिक आहे. शिवाय, सामान्य यात्रेकरुंचा प्रवासही विनाकारण महागणार आहे. लोकांना नको असलेला विकास त्यांच्या माथ्यावर मारण्याच्या उचापती करणाऱ्यांना जनतेने येत्या निवडणुकीत चांगला धडा शिकवण्याची गरज आहे.

विचार

# सत्ताकारणात सामान्य माणूस कुठे?

*लोक राज्यकर्त्यांबद्दल उदासीन झालेत. कुणीही सत्तेत येवो, सामान्य माणसाकडे कुणाचेही लक्ष नाही. आपण नुसतेच 'राजे' नाही तर हवे तसे बदल घडवून आणू शकतो, हे मात्र लोकांना कळायला लागले आहे. पण ही बाब आपल्या राजकारण्यांच्या नीट लक्षात आलेली नाही. पण, लक्षात ठेवा, मतदार जागा झालाय. सामान्य माणूस समजदार झालाय. यापुढे तो दिलेल्या आश्वासनांचा आणि केलेल्या कामांचा हिशेब मागणार आहे.*

**मेधा इनामदार**

लोकसभेच्या निवडणुकांचे सूप वाजले. सत्तेची माळ एनडीएच्या गळ्यात पडली. आता अगदी लवकरच विधानसभांच्या निवडणुका जाहीर होतील. महाराष्ट्राच्या दृष्टीने लोकसभेच्या निकालाकडे विधानसभेची ब्ल्यू प्रिंट म्हणूनच पाहिले जात होते. एकूण निकाल पाहून सगळेच पक्ष जागे झाले आहेत. टिकून राहायचे असेल तर आपल्याला बदलायला हवे हे त्यांना कळून चुकलेय. इतकी वर्षे राजकारण केवळ आश्वासनांपुरते असायचे. निवडणुकीपूर्वी मतदार 'राजा' असायचा. त्याला अजूनही बरेच काही मिळालेले नाही याची जाणीव उमेदवारांना व्हायची आणि मग 'हे देऊ... ते देऊ...' असे सांगून गेलेल्या 'त्या' उमेदवारावर विश्वास ठेवून मतदार निवडून द्यायचा. मग तो उमेदवार दिलेली आश्वासने विसरून जायचा. त्याला स्वत:चेही काही तरी बघायचे असायचे ना ! आणि शेवटी लोकांना सगळेच दिले तर मग पुढच्या वेळी कशाच्या जोरावर मते मागायची हा प्रश्नही असायचाच. त्यामुळे एकदा आश्वासने देऊन गेलेला उमेदवार पुन्हा पुढच्या पाच वर्षांनीच दृष्टीला पडायचा. तोवर आपल्याला नक्की काय हवे होते हे लोक विसरून गेलेले असत.

अर्थात तरीही अगदीच काहीच होत नव्हतं असं मात्र नाही. खरे तर सामान्य माणसाच्या अपेक्षा अगदी मर्यादित असतात. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि सुरक्षित आणि सुखाने जगणे एवढेच सामान्य माणसाला हवे असते. देश स्वतंत्र होऊन ७७ वर्ष झाली. आणि तेव्हापासून लहान मोठ्या प्रत्येक गावातून नगरसेवक, आमदार, खासदार अशी वरपर्यंत पोचलेल्या आणि लोकांनीच निवडून दिलेल्या नेत्यांची साखळी आहे. पण तरीही इतक्या वर्षानंतरही 'स्त्रियांना संरक्षण, प्रत्येक हाताला काम, प्यायला शुद्ध पाणी, विनाशुल्क शिक्षण, स्वयंपाकासाठी गॅस, गरीबांना राहायला घरे, इतकेच नव्हे तर, प्रत्येक घराला शौचालयासारख्या प्राथमिक गरजाही पूर्ण झाल्या नाहीत. आणि आजही हीच आश्वासनं देऊन नेते पुन्हा पुन्हा मतदार'राजा'ला भेटायला जातात. आधी त्यांचे आजोबा जात असत. मग वडील, काका, मामा जायला लागले. मग महिला आरक्षण आले तशा ताई, वहिनी, दीदी, काकू, मामी जायला लागल्या. मतदारसंघ तोच. आश्वासने तीच. फक्त देणारे आणि घेणारे यांच्या पिढ्या बदलल्या. मग या ७७ वर्षांमध्ये या नेत्यांनी आपल्या गावासाठी नक्की काय केले? गेली अनेक वर्षे पाणी, घर, शिक्षण, रस्ते या मूळ गरजा पुरवण्याची आश्वासने देऊन हे नेते निवडून येत आहेत. मात्र प्रत्यक्षात आजही कोणत्याही लहान गावातच नव्हे तर मध्यम किंवा जिल्ह्याच्या गावात गेले तर गावापर्यंत जाणारा धूळ उडवणारा कच्चा रस्ता, सुकत चाललेल्या नद्या, खोल गेलेल्या विहिरी, उघडी गटारे, रिकाम्या शाळा आणि पोट खपाटीला गेलेली अशक्त जनावरे. स्वातंत्र्यपूर्व काळात दिसणाऱ्या या चित्रात आजही फारसा फरक पडलेला नाही.

एक मात्र झाले. या काळात खेड्यातला मतदार शहरात आला. शेतीचे पडत चाललेले तुकडे आणि त्यात कष्टायच्या मानाने हाती फार काही लागत नाही हे कळले तशी शहरे फुगू लागली आणि खेडी ओस पडू लागली. शहरातल्या सुशिक्षित मतदाराला आता बरेच काही कळायला लागले. गावी जाऊन तो आपल्या लोकांना जागे करू लागला. त्यातच मोबाइल आणि प्रसिद्धीम ाध्यमांनी जणू क्रांती केली. आपल्याला नक्की काय हवे आहे आणि ते मिळतेय की नाही आणि कोण देऊ शकेल याबद्दल लोकही जागरूक झाले. त्यातूनच आपल्यावर 'राज्य' करणाऱ्याला बदलू शकतो, हे लोकांच्या लक्षात आलं. खरे सांगायचे तर स्वार्थकेंद्रित झालेल्या या राज्यकर्त्यांना तळागाळात राहणाऱ्या गोरगरीब माणसांना आणि शिकून नोकरी करून मोजक्या उत्पन्नात जगणाऱ्या सामान्यांना नक्की काय हवेय हे माहीतच नाहीये. किंबहुना, माहीत असूनही त्यांना त्याच्याकडे लक्ष द्यायची इच्छाच नाही. त्यामुळेच ते अजूनही झोपलेलेच आहेत. किंबहुना सामान्य लोकांचं लक्ष त्यांच्या गरजांपासून विचलित करून नको त्या गोष्टीकडे वळवत राहण्याचा सर्वच राजकारण्यांचा प्रयत्न दिसतो. गेल्या काही वर्षांमध्ये एकूणच राजकारणाला एक गलिच्छ रूप आले आहे. त्यातच या सगळ्यांवर मिडियाचा प्रचंड प्रभाव आहे. प्रत्येक पक्षाने स्वत:च्या प्रसारासाठी, प्रचारासाठी आणि जाहिरातीसाठी एक किंवा अधिक चॅनेल्समध्ये पैसा गुंतवला आहे, हे देखील अगदी उघड गुपित आहे. राजकारणाचं गुन्हेगारीकरण, अत्यंत खालच्या भाषेमध्ये आरोप-प्रत्यारोप, सत्तेसाठी होणारे पक्षबदल हे जे काही चालू आहे, त्यात देश आणि देशातला सामान्य माणूस नक्की आहे तरी कुठे? प्रत्येक क्षणाला 'महाराष्ट्रातल्या जनतेच्या' नावाखाली स्वत:चे मत मांडणाऱ्या या राजकीय पक्षांना त्याचा विचार करायची खरोखर इच्छा आहे का आणि खरोखरीच सामान्य माणसाला याबद्दल काय वाटते याची जाणीव या नेत्यांना आहे का? आजही पाऊस पडला किंवा नाही पडला तरी सामान्य माणसांचे हाल होतात. करोडो तरुण हात बेकारीच्या आगीत होरपळत आहेत. आजही आपण दिलेल्या कराचा योग्य उपयोग होत नाही याची खंत प्रत्येक करदात्याच्या मनात आहे. 'हा देश कुणीच चालवत नाही. तो आपोआप चालतो', असे आपल्या देशाच्या बाबतीत म्हटले जाते. कारण खरोखरीच राज्यकर्ते आणि जनता एकमेकांना समांतर चालतात. जाती धर्माच्या भेदभावांनी राज्यकर्त्यांनी देश पोखरून टाकला आहे. तसे पाहिले तर नव्या पिढीतली मुले आडनाव वापरतच नाहीत; फक्त नाव सांगतात. त्यांना या जातींच्या राजकारणामध्ये खरोखरीच रस नाही. पण राजकारण अजूनही तिथेच आहे. शिवाय जातीच्या नावावर प्रत्येक गोष्ट विनाकष्ट आणि फुकट मिळवण्याची सवय पुढील काळात घातक ठरणार आहे.

राजकारणाचे गुन्हेगारीकारण इतक्या प्रचंड प्रमाणात झाले आहे की स्वच्छ चारित्र्याचा आणि देशासाठी निष्ठेने काम करणारा उमेदवार शोधावा लागतो. उभ्या राहिलेल्या उमेदवारांमधून मतदाराला त्यातल्या त्यात कमी गुन्हे केलेला उमेदवार निवडावा लागतो. विरोधी पक्षही केवळ विरोध करण्यातच धन्यता मानतो आहे. खरे तर, देशाच्या हिताच्या गोष्टींसाठी सगळ्या विरोधी पक्षांनी एकत्र येऊन योग्य निर्णय घ्यायला मदत करायला हवी. पण आम्ही विरोधी पक्षात बसतो म्हणून आम्ही विरोध करणार, असा विडाच जणू हे पक्ष स्वीकारतात आणि कोणतेही काम होऊ न देण्यात धन्यता मानतात. संसदेच्या अधिवेशनात काम होऊ द्यायचे नाही, फक्त गोंधळ करायचा, आरडाओरडा करायचा, जमलेच तर धक्काबुक्की करायची; निदानपक्षी सभात्याग करायचा. बहिष्कार घालायचा ! एकूण काय, तर काम होऊ द्यायचं नाही. लोकप्रतिनिधींच्या पगाराचा किंवा पेन्शन वाढवायचा ठराव असला की हेच सगळे अगदी एकमताने अनुमोदन देतात. लोक हे सगळे बघत आहेत. ते गेली ७७ वर्षे सगळे सहनही करत आहेत. ते कर भरत आहेत. टोल भरत आहेत. नोटा बंद केल्या तर ते रांगेत उभे राहत आहेत. देशाप्रती असलेले कर्तव्य मनापासून बजावत आहेत. आपल्या मुलांना योग्य प्रकारचे, जीवनात उपयोगी पडेल असे शिक्षण मिळेल असे स्वप्न पाहत आहेत.

आज ना उद्या पेपर न फुटता परीक्षा शांतपणे पार पडतील आणि मुलाला त्याच्या मेरीटप्रमाणे नोकरी मिळेल, असे त्यांना अजूनही वाटते. मला सहज कर्ज मिळेल, सरकारदरबारी लायसन्स आणि इतर परवानग्या मिळण्यासाठी असंख्य हेलपाटे घालावे लागणार नाहीत अशी त्यांची इच्छा आहे. लोकांना हवे आहे भ्रटाचारमुक्त आणि सुखी सुरक्षित जीवन. जे आणि जेवढे कष्ट करू, त्याचे योग्य फळ देणारे आणि कसलीही भीती नसलेले जगणे त्यांना हवे आहे. म्हणूनच लोक आजच्या राज्यकर्त्यांबद्दल उदासीन झालेत. कुणीही सत्तेत येवो, पक्ष कोणताही असो, सगळेच एकमेकांना मिळालेले आहेत. त्यांना फक्त सत्ता हवी आहे.

सामान्य माणसाकडे कुणाचेही लक्ष नाही राज्यकर्ते आपल्यासाठी काही करतील असे आज कुणालाही वाटत नाही. आपल्याला काय हवे आहे ते त्यांना सम जायला लागले आहे. नक्की कोण काय करतेय हेदेखील लोकांना कळायला लागलेय. आपण नुसतेच 'राजे' नाही तर हवे तसे बदलही घडवून आणू शकतो, हे लोकांना कळायला लागले आहे. पण ही बाब आपल्या राजकारण्यांच्या नीट लक्षात आलेली नाही. अजूनही ते पुरेसे जागे झालेले नाहीत. लोकांना नक्की काय हवे आहे आणि ते देण्यासाठी ते आपल्याला निवडून देत आहेत, ही गोष्ट अजूनही बऱ्याचजणांच्या लक्षात आलेली नाही. पण, लक्षात ठेवा, मतदार जागा झालाय. सामान्य माणूस समजदार झालाय. आता समज वाढायला हवी ती 'त्यांची.'

आजकाल

# सरकार आणि आरक्षण आंदोलकांकडून जनतेची दिशाभूल

**तुषार गायकवाड**

एका बाजूला राज्य सरकार, दुसऱ्या बाजूला मराठा आरक्षण आंदोलक व तिसऱ्या बाजूला ओबीसी आरक्षण आंदोलक असे तीनही घटक वेगवेगळ्या पध्दतीने महाराष्ट्रातील जनतेस चुकीची माहिती देवून जनतेची दिशाभूल करत आहेत.

सर्वप्रथम मराठा आरक्षण आंदोलनाचा आढावा घेऊ. वास्तविक सगेसोयरे अधिसूचनेची अंमलबजावणी करा म्हणून उपोषण केले जात असले तरीही, सगेसोयरे अधिसूचनेतून म राठ्यांना (कुणबी मराठ्यांना) नव्याने ओबीसी प्रवर्गातून काहीच मिळालेले नाही. वंशावळ शोधून कुणबी प्रमाणपत्र काढण्याची तरतूद जुनीच आहे. कुणबी प्रमाणपत्र मिळाल्यानंतर याआधी ज्या पध्दतीने जात पडताळणी समितीची कार्यवाही होत होती. तशीच पुढेही कायम राहणार आहे.

सगे-सोयरे मध्ये पूर्वीही आईच्या नात्यातून कुणबी प्रमाणपत्र मिळत नव्हते. नवीन अधिसूचनेतही ते कायम आहे. केवळ पितृसत्ताक वंशावळीतूनच कुणबी प्रमाणपत्र मिळू शकते. आईच्या रक्ताच्या नात्यातून कुणबी प्रमाणपत्र मिळवण्याची तरतूद नवीन अधिसूचनेत नाही. शिवाय मराठा जातीचे सरसकट कुणबीकरण कायदेशीर शक्य नाही. म्हणूनच लोकसभा निवडणूकीच्या आधी महायुती सरकारने मराठा जातीला १० टक्के आरक्षण जाहीर केले, मात्र ते न्यायालयात टिकूच शकत नाही. यास्तव विद्यमान महायुती सरकारमधील भाजपा आमदार राम सातपुते यांनी जोपर्यंत मराठा जातीला आरक्षण मिळणार नाही तोपर्यंत डोक्यावर फेटा बांधणार नाही. अशी भीष्मप्रतिज्ञा ऐन लोकसभा निवडणूक प्रचारात केली. याचा अर्थ आमदार असलेल्या राम सातपुतेंना हे ठाऊक आहे की, न्यायालयात मराठा आरक्षण टिकणार नाही. महायुती सरकार मधील भाजपाचे नेते व ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी देखील अधिसुचनेतून सगेसोयरे सरसकटीकरण करत आरक्षण देता येणार नाही. तसे केल्यास न्यायालयात ते टिकणार नाही. याची जाहीर कबुली नुकतीच दिलेली आहे. आता ओबीसी आरक्षण आंदोलकांची भूमिका पाहूया. ओबीसी आरक्षण आंदोलकही ओबीसी प्रवर्गातील लोकांना खोटे सांगून आपल्या भातावर राजकीय डाळ वाढून घेण्याचा प्रयत्न करत आहेत. ओबीसी आरक्षण हे घटनात्म क आरक्षण नसून वैधानिक आरक्षण आहे. तसेच कुणबी प्रमाणपत्र ओबीसी प्रवर्गातून देण्याची तरतूदही जूनीच असून वैधानिकच आहे. त्यामुळे कुणबी मराठ्यांचा ओबीसी मध्ये नव्याने समावेश केला जातोय हा कांगावा चूकीचा आहे. तसेच मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र दिल्याने त्याचा परिणाम, प्रवर्गाच्या आरक्षणावर होत नाही! कारण त्यांचे आरक्षण घटनात्मक आहे. कितीही वैधानिक आरक्षण दिले तरी ते कोणत्याही जातीचे घटनात्मक आरक्षण हिसकावू शकत नाही.

मात्र, ज्यांनी गैरप्रकार करुन, खोटे पुरावे जोडून, किंवा पुराव्यांशी छेडछाड करुन कुणबी प्रमाणपत्रे मिळवली आहेत. त्यांचेवर कारवाई करण्याची जी मागणी ओबीसी आंदोलकांनी केलीय. ती ईष्ट आहे. तसे आश्वासन नुकतेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदेनी दिल्याचे जाहीर करण्यात आले आहे. नुकतेच बिहार राज्याने जातनिहाय जनगणना करुन बिहारमधील दुर्बल घटकांसाठी लागू केलेले अतिरिक्त १५ टक्के आरक्षण उच्च न्यायालयाने रद्द केले आहे. या सुनावणी दरम्यान न्यायालयाने इंद्रा साहनी खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने लागू केलेली एकूण ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडता येणार नाही! हे परत एकदा अधोरेखित केले आहे. त्यामुळे जोपर्यंत केंद्र सरकार घटनादुरुस्ती करुन सर्वोच्च न्यायालयाने इंद्रा साहनी खटल्यात ठरवून दिलेली ५० टक्के आरक्षणाची मर्यादा वाढवत नाही. तोपर्यंत महाराष्ट्रात मराठा किंवा अन्य कोणत्याही जातीला नव्याने आरक्षण मिळणार नाही. त्याचप्रमाणे मराठा जातीतील कुणबी नोंदी शोधून कुणबी प्रमाणपत्र देऊ केल्याने ओबीसी प्रवर्गातील आरक्षणाला धक्का लागत नाही. कुणबी मराठा हे इतर मागासवर्गीयच आहेत. त्यामुळे ओबीसी आरक्षण आंदोलक उपोषणाच्या माध्यमातून जे राजकारण करत आहेत ते केवळ दिशाभूल आहे, बाकी काहीच नाही. तसेच मनोज जरांगे पाटील कायदेशीर आरक्षण पदरात घेण्याऐवजी ज्या अधिसूचनेतून काहीच हाती लागणार नाही. अशा अधिसूचनेची अंमलबजावणी करा म्हणत राजकीय निवडणूकांच्या फडात उतरले आहेत. यातून केवळ राजकारणच होईल आरक्षण मिळणार नाही. कारण राज्य सरकारला आरक्षण देण्याचे अधिकार सध्या शिल्लक नाहीत.

महाराष्ट्रात सध्या घटनात्मक आरक्षणात अनुसूचित जाती १३ टक्के, अनुसूचित जमाती ७ टक्के, भटक्या जमाती व विमुक्त जाती ११ टक्के तर वैधानिक आरक्षणात इतर मागासवर्ग जाती १९ टक्के, विशेष मागासवर्ग २ टक्के असे एकूण ५२ टक्के आरक्षण आहे. महायुती सरकारने यामध्ये १० टक्के मराठा आरक्षण देऊ केले आहे जे न्यायालयात टिकणार नाही.

आरक्षण आंदोलनामागील राजकारण एक वेळ समजून घेता येईल. पण सरकारकडून महाराष्ट्रातील जनतेला सत्य सांगण्याऐवजी मराठा विरुध्द ओबीसी असे ध्रुवीकरणाचे राजकारण सुरु आहे. सूज्ञ जनतेने या राजकारणापासून अलिप्त राहणेच योग्य!!

**लोकसंसद**

## अतिउत्साही पर्यटक आणि पर्यटनातील दुर्घटना

पावसाळा सुरु होताच काही बातम्या ठरलेल्याच असतात. मुसळधार पावसामुळे उपनगरी रेल्वेची वाहतूक विस्कळीत होणे, जीर्ण इमारत कोसळणे, दरडी कोसळणे, वीजेचा लपंडाव सुरु होणे या अशा बातम्यांसोबतच आणखी एक बातमी न चुकता ऐकण्याच / वाचण्यात येते ती म्हणजे पावसाळी पर्यटनासाठी गेलेल्यांचे धबधबा, तलाव, नदी, समुद्र याठिकाणी झालेले मृत्यु. २१ जून रोजी अशाच काही पर्यटकांचा खोल पाण्याचा अंदाज न आल्याने बुडून मृत्यु झाला. वांद्रे येथील रिझवी महाविद्यालयाच्या ३७ विद्यार्थ्यांपैकी चार जणांचा खालापूर येथील साई बंधारा येथे मृत्यु झाला. दरवर्षी पावसाळा सुरु होताच पावसाळी पर्यटनासाठी धबधब्याची ठिकाणे गाठली जातात. अशा धबधब्याच्या ठिकाणी याअगोदरही दुर्घटना घडलेल्या असल्यामुळे पोलिसांकडून मज्जाव केला जातो. तसे मनाईचे फलकही लावले जातात. पण काही अतिउत्साही पर्यटक मनाई आदेश झुगारुन तिथे जातात आणि स्वत:ला संकटाच्या खाईत लोटतात. बऱ्याचशा ठिकाणी तर मद्यपी पर्यटक धुडगूस घालतात आणि मद्यपानाच्या भरात नको ते धाडस करुन खोलवर पाण्यात जातात. अर्थातच मग दुर्घटना ही ठरलेलीच असते. अशा दुर्घटनांना आळा घालायचा असल्यास पर्यटकांतच स्वयंशिस्त असायला हवी.

**- दीपक काशिराम गुंडये, वरळी**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२५ जून**

**१९०५:-** वैदर्भीय कवी यादव मुकुंद पाठक यांचा जन्म. त्यांच्या अनेक अप्रकाशित कविता निधनोत्तर, 'अग्निकमळ' या नावाने संग्रहित झाल्या. **१९१४:-** लेखक पं. पू. सद्गुरु योगिराज श्री मामासाहेब देशपांडे यांचा जन्म. त्यांनी ४० ग्रंथ लिहिले. श्रीनाथसंप्रदाय, श्रीदत्तसंप्रदाय व श्रीवारकरी संप्रदाय यांचे महान अध्वर्यू. गेल्या शतकातील थोर प्रवचनकार व कीर्तनकार म्हणून सुप्रसिद्ध. सर्वसामान्य जनांना समजेल अशा सुबोध व रसाळ भाषेत भारतीय संस्कृती तत्त्वज्ञान आणि संतसाहित्याचे मर्म उलगडून दाखवणाऱ्या विपुल साहित्याची निर्मिती केली. त्यापैकी 'अभंग सौरभ', 'अभंग अमृत', 'अभंग संजीवन', 'वाङ्मय पारिजात', 'श्री ज्ञानदेव विजय', 'चैतन्यचक्रवर्ती', 'देवा तूंचि गणेश' हे महत्त्वपूर्ण ग्रंथ प्रसिध्द तसेच कन्नड भाषेतूनही त्यांनी ग्रंथरचना केली. **१९१९:-** साहित्यिक अमरेन्द्र लक्ष्मण गाडगीळ यांचा जन्म. 'जीवनसंग्राम' हा कथासंग्रह. 'ताई आणि भाऊ', 'वटपत्र' या कादंबऱ्या. 'सुभाषचंद्र', 'आईन्स्टीन' इत्यादी चरित्रे आणि 'वंदेमातरम्', 'वीर आणि परमवीर' असे ऐतिहासिक लेखन करणाऱ्या अमरेन्द्र यांनी शुद्रक, कालिदास या संस्कृत नाटककारांच्या कृतींची परिचय करुन देणारी पुस्तके लिहिली. तसेच 'जय जय रघुवीर समर्थ' हे सज्जनगडावर तर 'पुण्यातील जलप्रलयाचा इतिहास' हे माहितीपर पुस्तकेही त्यांनी लिहिले.



मराठी बालकुमार साहित्य संमेलनाचे ते संस्थापक. **१९३५ :** लेखक, कथा समीक्षक, पत्रकार, संपादक, अनुवादक आणि कथांचे संग्रह म्हणून मराठी साहित्यात आपले नाव कोरणाऱ्या राम कोलारकरांचा २५ जून १९३५ रोजी झाला. इंग्रजी विषयातून एम.एची पदवी संपादन केल्यावर काही काळ पत्रकारिता केली. पुढे हंस, मोहिनी या मासिकांचे संपादन तसेच 'नवे लेखन' ह्या अनियमित कालिकांचे संपादन त्यांनी काही काळ केले. त्यांनी थोड्या फार कथा, कविता काही समीक्षात्मक तसेच पुन्हा आज रात्री सारखी अनुवादित कादंबरी असे थोडे फारच लेखन केले असले तरी मराठी साहित्यविश्वाता त्यांचा परिचय उत्कृष्ट कथांचे जाणकार व संकलक असा आहे. उत्कृष्ट कथा संग्रहित करण्याची प्रेरणा त्यांना एडवर्ड जे व ओ ब्रायन या ब्रिटिश व अमेरिकन लेखकांकडून मिळाली. कोठारकरांनी मराठी कथेच्या प्रारंभकाळापासूनचा चोखंदळपणे निवडून त्याचे सूत्रबद्ध पद्धतीने संकलन केले. १९६८ साली त्यांचा 'सर्वोत्कृष्ट मराठी कथा' चा पहिला खंड तर १९८६ साली १६ वा खंड प्रकाशित झाला. याच धर्तीवर सर्वोत्कृष्ट विनोदी कथा, सर्वोत्कृष्ट कथाचे संकलन त्यांनी केले. याखेरीज कॅप्टन गो. गे. तिमये निवडक कथा, कमलाबाई टिळक: निवडक कथा, चिंतामणी यशवंत मराठे निवडक कथा ह्या तीन कथालेखकांच्या कथांची स्वतंत्र संकलने त्यांनी तयार केली. व्रतस्थ व सेवाभावी वृत्तीने कथा वाङ्मयाच्या अभ्यासात मन असलेल्या कोलारकरांची साहित्यिक दृष्टी चोखंदळ व समीक्षकाची आहे. भारतीय व जागतिक कथेची पाळेमुळे शोधण्याची जिद्द बाळगून त्यांनी कयेथे परिशिलन केले. मराठी कथेच्या दृष्टीने त्यांचे हे साहित्यिक कार्य फारच मोलाचे ठरले. तसेच ग्रालियादलेट्टा या इटालियन लेखिकेच्या का मदर' या कादंबरीचा पुन्हा आज रात्री' असा अनुवाद केला. वर्तमानपत्रातून लेखन त्यांचे अविरतपणे चालू असते. **१९५२:-** लेखक, गाढे अभ्यासक आणि संत तुकाराम महाराजांचे वंशज डॉ. सदानंद श्रीधर मोरे यांचा जन्म. त्यांच्या अभ्यासाची साक्ष देणाऱ्या अनेक पुस्तकापैकी 'मंथन' हे पहिले, तर 'त्रयोदशी' हे ज्ञानेश्वरांविषयीचे. 'तुकाराम दर्शन' या पुस्तकाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला. 'लोकमान्य ते महात्मा', 'कृष्ण: द मॅन ॲंड हिज मिशन' हे इंग्रजी पुस्तक, तीन काव्यसंग्रह तसेच बौद्ध तत्त्वज्ञानावर आधारित 'उजळल्या दिशा'हे नाटक आणि अनेक पुस्तकांचे संपादन, प्रस्तावना व्याख्याने देणारे प्रा.मोरे महाराष्ट्राचे राजकारण, समाजकारण व धर्मकारण यांचे अभ्यासक व भाष्याकार म्हणून ओळचले जातात. **१९६०:-** लेखक महादेवराव सु. बगाडे यांचा जन्म. 'फौज', 'गीतगझल' हा काव्यसंग्रह अशी साहित्य संपदा. **१९७७:-** अफझलखानाचा पोवाडा रचणारे कवी बळवंत गणेश खरे यांचे निधन. 'अनंताची हाक', 'काव्यांतर व इतर काही कविता', 'गाणे आता कशाचे' हे काव्य संग्रह, तसेच भगवद्गीतेचे अंतरंग, 'मनाचा संसार' ही गद्य पुस्तके प्रकाशित झाली. **१९८०:-** समीक्षक प्रा. लक्ष्मण गणेश जोग यांचे निधन. कादंबरीची चिकित्सा करणारा 'कादंबरी' हा ग्रंथ तसेच संत नामदेव अरुपाचे रुप (ज्ञानेश्वरीच्या अध्यायांचे विवेचन) हे दीर्घलेख, 'लावण्यवेध', 'दीपदर्शन', 'लावण्यक्षितिजे' हे स्फुट समीक्षोख संग्रह ही त्यांची पुस्तके.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२५ जून

१) श्रीम. विद्या दत्तात्रेय शिंदे
अलिबाग, २५-६-१९५३

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

### आजचे अन्नदाते

रायगड पोलिस, २०१२ बॅच

# फळ झाडांच्या रोपांचे वाटप

**। मुरुड-जंजिरा । वार्ताहर ।**

सद्या उत्तम पाऊस पडत असल्याने वृक्षाची लागवड होण्यास अनुकूल वातावरण आहे. झाडांना पुरेसा पाणी पुरवठा मिळत असल्याने झाडे जोमाने वाढत असतात. यासाठी पावसाळ्यात वनखाते मोठ्या प्रमाणात झाडांची लागवड करीत असते. आगा खान संस्थेच्या अमृता पराडकर यांनी ही रोपे उपलब्ध करून दिली असून सर्व रोपे ग्रामस्थांना मोफत देण्यात आली.

परिमंडळ वन अधिकारी कार्यालय तीनवीरा व आगाखान एजन्सी फॉर हॅबिट्याट इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने पेझारी येथील परिमंडळ कार्यालयात नुकतेच नागरिकांना मोफत फळझाडे रोपे वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला. या

कार्यक्रमात एकूण १२०० रोपांचे वाटप करण्यात आले. यावेळी तीनविराचे परिमंडळ वन अधिकारी डॉ. निलेश चांदोरक, संदेश बैकर, किशोर म्हात्रे, धर्मा मेंगाळ, अविनाश हंबीर, अशोक मेंगाळ तसेच वाघजाई, कोळघर, तळशेत, वाघोडे, पोयनाड, दळवी खरोशी परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# स्नेहसंमेलनानिमित्त वृक्षारोपण

**। उरण । वार्ताहर ।**

चिरनेर येथील सेकंडरी स्कूलचे १९८५ साली दहावीत असलेल्या गृपचे पावसाळी स्नेह संमेलन रविवारी (दि.२३) बापूजी मंदिर येथे संपन्न झाले.

यावेळी स्नेहसंमेलनाच्या निमित्त एकत्र आलेल्या जुन्या मित्रांनी बापूजी मंदिर परिसरात आंबा आणि करंज वृक्षांची लागवड केली. तसेच, वृक्षारोपण करून इतर पर्यावरणप्रेमींना हा चांगला संदेश देण्यात आला. त्याचबरोबर ही झाडे जगविण्यात येतील अशी हमी देखील त्यांनी दिली. तसचे, पर्यटकांकडून या परिसरात प्लास्टिक बाटल्या आणि प्लास्टिक पिशव्या टाकल्या जातात, त्यादेखील उचलून या परिसराची साफसफाई करण्यात आली. यावेळी मिलिंद खारपाटील, चंद्रहास म्हात्रे, सुर्यकांत म्हात्रे, पद्माकर फोफेरकर, प्रकाश फोफेरकर, प्रकाश नारंगीकर, पंढरीनाथ नारंगीकर, सुरेश केणी, रोहिदास पाटील, सुभाष पाटील, दिपक म्हात्रे, राजेंद्र मुंबईकर, विजय पाटील, उपकार ठाकूर, प्रभाकर ठाकूर, रवींद्र पाटील, विजय मुंबईकर आदि वर्गमित्र उपस्थित होते.

# सदाबहार दोस्ती ग्रुपतर्फे वृक्षारोपण

**। उरण । वार्ताहर ।**

पर्यावरणाचा ऱ्हास तसेच पृथ्वीचे वाढते तापमान आणी निसर्ग संवर्धन ही काळाची गरज ओळखून सदाबहार दोस्ती गृपतर्फे मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करण्यात आली. या लागवडीत फणस, आंबा, जांबुळ, चिकू सारखी फळझाडे तर करंज, अर्जून, वड, पिंपळ सारखी जंगली झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमाला डॉ. हिराचंद पाटील आणि स्वर्गीय लक्ष्मण धर्मा म्हात्रे यांच्या आठवणी स्मृतिप्रीत्यर्थ, कामेश्वर म्हात्रे व सदाबहार दोस्ती गृप प्रतिष्ठाने ही झाडे उपलब्ध करून दिली होती.

यावेळी नागेंद्र म्हात्रे, हिराचंद पाटील, विनायक गावंड, गणेश भोईर, संतोष जोशी, विजय गावंड, सचिन पाटील, अरूण म्हात्रे, जितेंद्र म्हात्रे, कामेशवर म्हात्रे, कैलास पाटील, तुकाराम गावंड, हरिश्चंद्र म्हात्रे आदि उपस्थित होते.

# बागेची वाडीत वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण

**। अलिबाग । वार्ताहर ।**

सामाजिक कार्यकर्ते गौरव म्हात्रे हे आपला वाढदिवस दर वर्षी विविध सामाजिक उपक्रम करून साजरा करत असतात. यावर्षी रविवारी (दि.२३) सारसई बागेची वाडी येथे वृक्षारोपण करून साजरा करण्यात आला. बदलत्या वातावरणाचा पर्यावरणावर होत असलेला विपरीत परिणाम लक्षात घेता यावर्षीचा वाढदिवस पर्यावरणास पूरक असावा म्हणून वृक्षारोपण करून आपला वाढदिवस साजरा केला. यावेळी येथील ६५ आदिवासी कुटुंबांना मोफत टॉवेलचे वाटप करण्यात आले.

तसेच, आदिवासी ग्रामस्थांनी पारंपारिक पद्धतीने स्वागत करून सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. यावेळी उरण सामाजिक संस्थेचे उपाध्यक्ष राजेंद्र मढवी, सदस्य नामदेव ठाकूर, आदिवासी सेवक रत्नाकर घरत, पराग ठाकूर, गौरव म्हात्रे यांचे कुटुंबीय, मित्र परिवार आणि मोठ्या संख्येने वाडीतील ग्रामस्थ उपस्थित होते.

## बोरगावात वृक्षारोपण

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत येथील बोरगाव गावातील तरुणांनी एकत्र येत येथील मोकळ्या टेकडीवर वृक्षारोपण करत उत्सव साजरा केला. कर्जत तालुक्यात या वर्षी सरासरी पेक्षा जास्त प्रमाणात वृक्ष तोड झाली आहे. वृक्ष तोड रोखण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. यासाठी तरुणांकडून झाडांची लागवड करत समाजाला वृक्ष लागवडीचा संदेश देण्यात आला. यावेळी या तरुणांनी सुमारे दोनशे रायवल झाडांची लागवड केली. त्यात आवळा, बांबू, करंज, सागवान अशी विविध प्रकारची रोपे होती.

## अविनाश पडवळ यांचे निधन

**। रसायनी । वार्ताहर ।**

रसायनी येथील रहिवाशी अविनाश पडवळ यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. मृत्यूसमयी ते ४५ वर्षांचे होते. अविनाश नारायण पडवल हे बारवई गावचे मनसेचे सक्रिय पदाधिकारी होते. त्यांच्या अचानक जाण्यामुळे कुटुंबियासह रसायनी बारवई परिसरात तीव्र शोककळा पसरली आहे. अविनाश पडवळ यांच्या पश्चात त्यांच्या मातोश्री, भाऊ, पत्नी, दोन मुली एक मुलगा असा परिवार आहे. अविनाश पडवल यांचा दवक्रीया विधी २८ जून रोजी श्री क्षेत्र उद्धर रामेश्वर येथे होणार असून उत्तरकार्य १ जुलै रोजी बारवई येथील राहत्या घरी होणार आहेत.

## अंजलीमाई कांबळे यांचे निधन

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

बौद्धजन पंचायत समिती शिहू या शाखेचे सभासद सीताराम कांबळे यांच्या पत्नी राजिप

आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त निवृत्त मुख्याध्यापिका अंजलीमाई कांबळे यांचे शनिवारी (दि.२२) वयाच्या ७४ व्या वर्षी निधन झाले. अंजलीमाई कांबळे या बौद्धजन पंचायत समिती पेण तालुकाध्यक्ष ॲड. प्रमोद कांबळे, वैशाली येलवे, किरण कांबळे यांच्या मातोश्री होत. आंबेडकरी बहुजन चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्त्या अंजलीमाई कांबळे या नेहमीच परिवर्तवादी, पुरोगामी चळवळीत सक्रिय होत्या. अंजलीमाई कांबळे यांचा जलदान विधी रविवारी (दि.३०) सकाळी ११ वाजता पेण येथील म्हाडा कॉलनीतील रविराज फार्महाऊस याठिकाणी होणार आहे.

# माथेरान शहरात एटीएम सेवा सुरु

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान नागरी पतसंस्थेच्या ८५व्या वर्धापन दिन सोहळ्यात एटीएम सेवा सुरु करण्यात आली. माथेरान मध्ये बाजारपेठ भागात पतसंस्थेचे मुख्य कार्यालय असून त्या ठिकाणी ही सेवा सुरु करण्यात आली. या सेवेचा सर्वाधिक फायदा पहिल्याच दिवशी पर्यटकांनी घेतल्याचे दिसून आले असून येथील दस्तुरी नाका येथे देखील माथेरान नागरी पतसंस्थेने अशी सुविधा सुरु करावी, अशी मागणी पुढे आली आहे. यासेवेचे उद्घाटन माथेरान नागरी पतसंस्थेचे सभापती अजय सावंत यांच्या हस्ते झाले. यावेळी विनंती घावरे, प्रसाद सावंत, विवेक चौधरी, कुलदीप जाधव, विजय कदम, गाजणाना आबनावें, सचिन दाभेकर, रामचंद्र ढेबे, नितीन शेळके, चंद्रकांत काळे, निसार शारवान, विजय सावंत, स्वाती कुमार, अनिल गायकवाड, गिरीश पवार, योगेश जाधव आदींसह सर्वपक्षीय नागरिक उपस्थित होते.

# पर्यटकांची पावले काशिद समुद्राकडे

**। कोर्लई । वार्ताहर ।**

मुरूड तालुक्यातीली काशिद समुद्र किनाऱ्यावर सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून पावसाळ्यात बंदी असूनही शनिवार व रविवारी पर्यटकांची पावले वळल्याचे चित्र दिसून आले.

अलिबाग - मुरुड रस्त्यावर असलेला काशिद समुद्रकिनारा दोन महिन्यांसाठी बंद करण्यात आला आहे. सुरक्षेचा उपाय म्हणून रस्त्यालगत सुचना फलक देखील लावण्यात आले असून पर्यटकांनी सुचनांचे पालन करुन समुद्रात जाऊ नये, असे आवाहनही करण्यात येत आहे. तरीदेखील बंदी असूनही पर्यटकांची पावले काशिद समुद्राकडे वळल्याचे चित्र दिसून येत होते. येथे सुरक्षेसाठी तैनात असलेले दोन पोलीस, तीन सुरक्षा रक्षक तसेच पार्किंग सदस्य आपली कामगिरी चोख पार पाडत पर्यटकांना मार्गदर्शन करीत होते.

# वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषदेचे माजी शिक्षण व आरोग्य समिती सभापती तसेच शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव अशोक साबळे यांचा वाढदिवस रविवार दि.७ जुलै रोजी विविध सामाजिक कार्यक्रमांनी साजरा करण्यात येणार असल्याची माहिती कृष्णा गांधी, नरेंद्र गायकवाड व नितीन बामगुडे यांनी सहविचार सभेत बोलताना दिली.

यावर्षी ॲड. राजीव साबळे हे ६०व्या वर्षात पर्दापण करीत असून माणगाव शिक्षण प्रसारक मंडळ, ॲड. राजीव साबळे मित्रमंडळ व साबळे परिवारातर्फे हा वाढदिवस सोहळा साजरा करण्यात येणार आहे. या दिवशी माणगाव येथील द.ग.तटकरे महाविद्यालयात केइएम रुग्णालय रक्तपेढी परेल व शासकीय रुग्णालय रक्तपेढी अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून किमान ५०० ते ६०० रक्त बॅगा संकलित करण्याचा मानस व्यक्त करण्यात आला आहे. तसेच, माणगाव नगरपंचायत हद्दीत ठिकठिकाणी वृक्षारोपणाचा मोठा कार्यक्रम हाती घेण्यात आला असून प्रत्येकाने आपल्या घरी वृक्षाची लागवड करून त्याचा फोटो काढून ॲड. राजीव साबळे यांना पाठवल्यास तीच खरी मला शुभेच्छा असेल, अशी प्रतिक्रिया ॲड. साबळे यांनी यावेळी दिली.

# मच्छिमार सोसायटीचे अनावरण

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील खारपाटील ठाकूर कुटुंबीयांमार्फत स्थापन करण्यात आलेल्या चिरनेर खारपाटील ठाकूर सहकारी मच्छिमार सोसायटीचा अनावरण सोहळा चिरनेर खाडीवर रविवारी (दि.२३) स्थानिक मान्यवरांच्या तसेच चिरनेरचे उद्योगपती राजेंद्र खारपाटील यांच्या हस्ते पार पडला.

यावेळी राजिपचे माजी सदस्य महेंद्र ठाकूर, गणेश म्हात्रे, गजानन वशेणीकर, संजय पाटील, शशांक ठाकूर, घनश्याम पाटील, राजेंद्र भगत, समाधान ठाकूर, निकिता नारंगीकर, नीलम चौलकर, जयश्री चिर्लेकर तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते. मच्छिमार सोसायटीचे अध्यक्ष प्रफुल्ल खारपाटील यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. त्यानंतर त्यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणातून खारपाटील आणि ठाकूर ही दोन कुटुंबे या खाडीक्षेत्रावर वंशपरंपरागत मच्छीमारी करीत आपला उदरनिर्वाह चालवित असल्याचा आवर्जून उल्लेख केला.

## नागाला जिवदान

**। कोर्लई । वार्ताहर ।**

मुरुड तालुक्यातील उसरोली ग्रामपंचायत हद्दीतील वाळवटी येथील राजिपच्या प्राथमिक शाळेजवळील बिळात नाग गेला असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. नाग आल्याची माहिती माहिती मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी

प्रियांका पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सर्पमित्र संदीप घरत यांनी आपल्या कौशल्याने पाच फुटी नागाला पकडून जवळील जंगलात सुरक्षितपणे सोडून जिवदान दिले. याबद्दल संदीप घरत यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

**। रसायनी । वार्ताहर ।**

कुंभार समाज सामाजिक संस्था खालापूर यांची अनंत महाडकर व रायगड जिल्हा कार्यकारणी यांच्या मार्गदर्शनाखाली अत्करगाव येथे वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाली. या सभेचे आयोजन राजेंद्र साळवी, स्वप्निल नागावकर यांनी केले असून सभेचे नियोजन अत्करगाव कुंभार समाज कमिटी तसेच समाज बांधव आणि महिलावर्ग यांनी केले होते.

यावेळी खालापूर तालुका कुंभार समाज महिला आघाडी यांची नियुक्ती करण्यात आली असून, तालुका अध्यक्षा सविता मांडलेकर, उपाध्यक्ष सुरेखा हातनोलकर, सचिव चंदा वाडेकर, खजिनदार पूजा हातनोलकर यांची नियुक्ती करण्यात आली. तसेच, तालुका कुंभार समाज युवक खजिनदार म्हणून महेश निर्गुळकर यांची नियुक्ती करण्यात आली. यावेळी रायगड जिल्हा अध्यक्ष अनंत महाडकर यांच्याकडून या सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्रक देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

## विज्ञान प्रयोग शाळेचे उद्घाटन

**। उरण । वार्ताहर ।**

नुकताच जनता विद्यामंदिर व ज्युनि.कॉलेज अजिवली येथे इन्फिनियम इंडिया ऑडिटिव्हज प्रा.लि.कं. यांच्यावतीने विद्यार्थ्यांची गरज ओळखून भव्य, सुसज्ज आणि अद्ययावत अशा विज्ञान प्रयोगशाळेचा उद्घाटन सोहळा संपन्न झाला. यावेळी एस.के. रघुराम, हर्षद जांभवलेकर, मोहनीज शुक्ला, गिरिराज धिंग्रा, डॉ. राखी धिंग्रा, गुलाब सुर्यवंशी तसेच प्रकाश हाके, बेडगे, एस.एच.पाटील, डी.बी चवरे, परशुराम माळी, सुनील पवार, रघुनाथ पाटील, गोविंद पाटील, कान्हा कडव, विलास गायकर आदींसह शिक्षक वृंद व विध्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाहतूक संघटनेच्या नियुक्त्या जाहीर

**। उरण । वार्ताहर ।**

भारतीय कामगार संघटनेच्या वाहतूक विभागातर्फे उरण तालुक्यातील वाहतूक संघटनेच्या नियुक्त्या चंद्रहार पाटील यांनी जाहीर केल्या आहेत. यामध्ये उरण विधानसभा उपाध्यक्षपदी सौरभ पाटील, जासई विभाग अध्यक्षपदी अतुल मढवी व नवघर विभाग अध्यक्षपदी संतोष पाटील यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. यावेळी शिवसेना (उध्दव ठाकरे) मनोहर भोईर यांनी त्यांना नियुक्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# कर्नाळा अभयारण्यात पर्यटकांची गर्दी

**। पनवेल । वार्ताहर ।**

पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्रबिंदू असलेल्या कर्नाळा पक्षी अभय अरण्याला दररोज हजारो पर्यटक भेट देत असतात. पावसाळ्यात या पर्यटकांच्या संख्येत आणखीनच भर पडत असते. यंदा देखील कर्नाळा पक्षी अभय अरण्याला भेट देणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत वाढ झाली असून रविवारी (दि. २३) जवळपास १ हजार ५७७ पर्यटकांनी कर्नाळा पक्षी अभयारण्याला भेट देऊन निसर्गाच्या सानिध्याचा आनंद घेतला आहे.

पनवेलपासून १२ किलोमीटर अंतरावर कर्नाळा किल्ला आहे. विविध प्रकारचे वृक्ष, वेलींचा गराडा असलेल्या या किल्ल्याच्या परिसरात विविध प्रजातीचे सव्वाशे ते दीडशे पक्षी आढळत असल्याने सुमारे १२ चौरस किमी परिसरात पसरलेल्या या प्रदेशाला पक्षी अभय आरण्य म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे कर्नाळा किल्याला ऐतिहासिक महत्व देखील आहे. कर्नाळा किल्यावर अनेक ऐतिहासिक स्थळे असून, पशु-पक्षी निरीक्षकांसोबत इतिहासाचा अभ्यास करणाऱ्यांना देखील कर्नाळा पक्षी अभय अरण्याने भुरळ घातली असल्याने कर्नाळा पक्षी अभय अरण्याला भेट देणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत दिवसेंदिवस भर पडत आहे.

पावसाळ्यात पक्षी अभयारण्य परिसरात अनेक लहान मोठे ओढे आणि धबधबे वाहत असतात. यामुळे अभयारण्याच्या सौंदर्यात भर पडत असते. सध्या सुरु असलेल्या पावसाळ्यामुळे अनेकजण पावसाळी पर्यटनाचा आनंद घेत असून, सुट्ट्यांमुळे पावसाळी पर्यटनाचे आराखडे आखलेल्या अनेकांनी कर्नाळा पक्षी अभयारण्याला भेट देण्यास पसंती दिल्याचे पाहायला मिळत आहे. शुक्रवार, शनिवार आणि रविवारी हजारो पर्यटकांनी कर्नाळा पक्षी अभयारण्यात पर्यटनाचा आनंद घेतला आहे. ज्यामध्ये १०९ लहान मुलांचा समावेश आहे.

# वृद्धाश्रम संस्थेची सर्वसाधारण सभा

**। अलिबाग । वार्ताहर ।**

अलिबाग येथील शिवशांती स्नेहालय वृद्धाश्रम व विरंगुळा केंद्रांची सर्वसाधारण सभा रविवारी (दि.२३) डॉ. सुभाष म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली श्रीबाग येथील श्रीमती भारती दीनानाथ तरे सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या सभेला संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुभाष म्हात्रे, योगेश तरे, डॉ. प्रतिभा म्हात्रे, प्रफुल्ल राऊत, डॉ. जगदीश थळे, डॉ. सुरेश म्हात्रे, डॉ. प्रशांत जन्नावार, डॉ. अनिल डोंगरे, शरद कोरडे यांच्यासह गजेंद्र दळी, भारती तरे, चारुशिला कोरडे, द्वारकानाथ नाईक, आर.के. घरत, पुरुषोत्तम साठे, सुभाष क्षिरे, मंगला सावंत, उमाजी केळुसकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## क ड व नि

### चालकांना पोलिसांचा दणका

**अलिबाग :** नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २७० वाहन चालकांविरोधात कारवाई केली आहे. त्यांच्याकडून दोन लाख ४८ हजार ९०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. नियम मोडणाऱ्या चालकांना वाहतूक पोलिसांनी दणका दिला आहे. हेल्मेट नसणे, वाहन वेगात चालविणे, ट्रीपल सीट असणे, ज्यादा प्रवासी वाहतूक करणे अशा अनेक वाहतूकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांना शिस्त लागावी. यासाठी जिल्हा वाहतूक शाखेमार्फत रविवारी बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

### जामीन अर्ज फेटाळला

**अलिबाग :** जमीन परस्पर दुसऱ्या व्यक्तीला विक्री करून आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल केला होता. यातील काही आरोपींनी अटक पूर्व जामिनासाठी जिल्हा न्यायालयात अर्ज केला होता. मात्र न्यायालयाने तो अर्ज नामंजूर केला असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या गुन्ह्याचा तपास पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत किरवले करीत आहेत. ही घटना मुरूड तालुक्यातील बारशीव येथील आहे.

### लोकनेत्यांना विनम्र अभिवादन

**रसायनी :** लोकनेते स्वर्गीय दि.बा. पाटील यांच्या पुण्यतिथी निमित्त सोमवारी २४ जून २०२४ रोजी शिवसेनेचे (ठाकरे गट) रायगड जिल्हाप्रमुख व उरण विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार मनोहर भोईर यांनी स्वर्गीय दि.बा. पाटील यांना विनम्र अभिवादन करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. यावेळी स्वर्गीय पाटील यांचे पुत्र अतुल पाटील हे उपस्थित होते. भोईर यांनी त्यांच्या आठवणींना उजाळा दिला.

### आश्रमशाळेत साहित्य वाटप

**पाली :** डोईश बँक पुणे मुंबई व उमंग फाऊंडेशन यांच्यावतीने पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप नुकतेच करण्यात आले. शाळेला एक प्रोजेक्टरदेखील भेट देण्यात आला. या कार्यक्रमाच्या वेळी बँकेच्या सीएसआर प्रमुख आम्रपाली, बँकेचे सर्व सहकारी तसेच उमंग फाऊंडेशनचे आशिष गोयल सहकुटुंब उपस्थित होते.या सर्व मान्यवरांनी शैक्षणिक साहित्य दिल्याबद्दल आश्रमशाळेच्या मुख्याध्यापिका सावंत यांनी विशेष आभार व्यक्त केले.

### पनवेलमधील चर्चमध्ये चोरी

**पनवेल :** पनवेल शहरातील सेन्ट फ्रान्सीस न्यू चर्चमध्ये तीन दिवसांपूर्वी चोरी झाली. चर्चमधील कपाटातील पाच हजार रोख रकमेची चोरी झाल्याने भाविकांनी संताप व्यक्त केला. १९ ते २१ जून या दरम्यान ही चोरी झाली. याबाबत दोन दिवसांपूर्वी पनवेल शहर पोलीस ठाण्यात चर्चच्या व्यवस्थापकांच्यावतीने तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी परिसराची पाहणी केली. चोरट्यांनी चर्चच्या इमारती मागील दरवाजा तोडून चर्चमध्ये प्रवेश करुन ही चोरी केल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.

# रमेश कीर यांना मताधिक्य देणार

**। उरण । वार्ताहर ।**

रविवार दिनांक २३ जून २०२४ रोजी कोकण पदवीधर मतदार संघाचे उमेदवार रमेश कीर यांच्या प्रचारार्थ उरण येथील आनंदी हॉटेलमध्ये महाविकास आघाडीचा मेळावा पार पडला. सभेच्या सुरुवातीला राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस दिवंगत प्रशांत पाटील यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

या मेळाव्यास शेकापचे माजी आमदार बाळाराम पाटील, शिवसेनेचे माजी आमदार मनोहर भोईर व काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष आर. सी. घरत यांनी मार्गदर्शन केले. यावेळी सर्व मान्यवरांनी मार्गदर्शन करताना महाविकास आघाडीचे उमेदवार रमेश कीर यांना उरण तालुक्यातून मताधिक्य देण्याचा निर्धार व्यक्त केला. २६ तारखेला मतदान केंद्रावर महाविकास आघाडीचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते यांनी उपस्थित राहायचे आहे. तसेच उरण तालुक्यातील ज्या पदवीधरांची नावे मतदार यादीत आहेत त्यांना मतदान केंद्रापर्यंत आणण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे असे सर्व मान्यवरांनी आवाहन केले.

या मेळाव्यास शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख नरेश रहाळकर, काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर,विधानसभा संपर्कप्रमुख महादेव घरत, शेकापचे ज्येष्ठ नेते एल. बी.पाटील शिवसेनेचे तालुकाप्रमुख संतोष ठाकूर, काँग्रेसचे तालुका अध्यक्ष विनोद म्हात्रे, माजी सभापती नरेश घरत, रमाकांत पाटील, काँग्रेस नेते कमलाकर घरत, अक्लाख शिल्लोत्री, शिवसेना गटनेते गणेश शिंदे, माजी नगरसेवक बबन कांबळे, उपजिल्हा संघटिका ममता पाटील, तालुका संघटिका सुजाता गायकवाड, काँग्रेस तालुका अध्यक्ष रेखा घरत, शेकाप तालुका अध्यक्ष सीमा घरत, नगरसेविका ॲड वर्षा पाठारे, नायदा ठाकूर, अफशा मुखरी, विधानसभा संघटिका ज्योती म्हात्रे, शहर संघटिका मेघा मेस्त्री, विना तलरेजा, उपतालुका संघटिका मनीषा ठाकूर, सुजाता पाटील, अल्पसंख्यांक सेलच्या तालुकाध्यक्ष हुसेना शेख, शहराध्यक्ष मुमताज भाटकर, शाखा संघटिका हसीमा सरदार, रंजना तांडेल, नयना पाटील, उपतालुकाप्रमुख कमलाकर पाटील, मधुसूदन पाटील, उपतालुका संघटक के.एम. घरत, रुपेश पाटील, शहरप्रमुख विनोद म्हात्रे, काँग्रेस शहर अध्यक्ष प्रकाश पाटील, शेकाप शहर चिटणीस शेखर पाटील, द्रोणागिरी शहरप्रमुख जगजीवन भोईर, युवासेना तालुका अधिकारी करण पाटील, सोशल मीडिया समन्वयक नितीन ठाकूर, द्रोणागिरी व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष रवींद्र पाटील, महाविकास आघाडीचे सर्व पक्षांचे सर्व जिल्हा परिषद विभाग निहाय पदाधिकारी शहरातील पदाधिकारी, लोकप्रतिनिधी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ■ महाविकास आघाडीचा निर्धार

## मच्छीविक्रेत्या रस्त्यावर

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरूड-जंजिरा नगरपरिषदेने लाखो रुपये खर्च करुन मच्छीविक्रेत्यांकरिता मच्छीमार्केट बांधले आहे. परंतु काही मच्छीविक्रेते मोटार सायकलच्या जागेत व रस्त्यावर बिनधास्तपणे राजपुरी व इतर विभागातील महिला मच्छी विक्री करीत असल्याने या ठिकाणी खरेदी करताना खवय्यांची गर्दी होताना दिसत आहे. त्यामुळे या रस्त्यावरुन जाणाऱ्या-येणाऱ्या वाहनचालकांना गाडी चालवताना कसरत करावी लागत आहे.

### वाहनचालकांना मनस्ताप

याठिकाणी हा मुख्य रस्ता असल्याने या ठिकाणी गाड्यांची वर्दळ जास्त असते, तरी ही महिला मच्छी विक्रेत्या मच्छी मार्केटमध्ये न बसता बाहेर विक्री करित असल्याने दुकानदारांना व घर मालकांना यांचा त्रास होऊ लागला आहे.

## माथेरानमध्ये पर्यटकांनी केली गर्दी

**। माथेरान । वार्ताहर ।**

चौथ्या शनिवारी सुट्ट्यांमुळे पावसाळी पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी पर्यटकांनी तोबा गर्दी केली होती. सलग दोन दिवस घाटात नेहमीप्रमाणे प्रशासनाच्या निष्क्रिय व्यवस्थेमुळे आणि कोणत्याही प्रकारचे नियोजन नसल्यामुळे वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. त्यामुळे पर्यटकांना घाटातून आपल्या लवाजम्यासह पायपीट करण्याची एकप्रकारे माथेरानला आल्याची शिक्षा सहन करावी लागली होती. गावातील सर्व हॉटेल्स आणि लॉज भरून गेले होते तर काहींना रूम्स अभावी माघारी जाण्याची वेळ आली. ई-रिक्षाच्या स्वस्त आणि सुरक्षित वाहतूक सुविधेच्या प्रवासामुळे पर्यटकांची संख्या वाढल्याचे बोलले जात आहे.

प्रशासनाने वाहतूक कोंडी बाबतीत सकारात्मक भूमिका घेतली नाही तर भविष्यात माथेरानला पर्यटकांची संख्या निश्चितच रोडावेल आणि याचा सर्वाधिक फटका इथे पिढ्यानपिढ्या वास्तव्यास असलेल्या स्थानिक भूमिपुत्रांना सोसावा लागणार आहे.स्थानिक लोकप्रतिनिधी आणि तालुक्यातील ,जिल्ह्यातील प्रमुख लोकप्रतिनिधी, नेतेमंडळीनी माथेरानमधील अल्प वोट बँकेचा विचार न करता या पर्यटन स्थळाला संजीवनी देण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे वयोवृध्द मंडळी बोलत आहेत.

> शनिवारी सुट्टी असल्यामुळे आम्ही इथे हजेरी लावली होती पण याहीवेळी घाटात गर्दी पाहून मन अस्वस्थ झाले. इथले प्रशासन या गावासाठी वाहतुकीची समस्या दूर करण्यासाठी काही प्रयत्न करणार आहेत की नाही. आम्हाला घाटातून पायपीट करण्याची सजा दिली जात आहे की काय असेच वाटते.
>
> कृष्णकांत चटर्जी
> पर्यटक,मुंबई

> माथेरान हे खूपच छोटेसे गाव आहे त्यामुळे इथे काही हजार पर्यटक आले की फुल्ल होऊन जाते आणि नेरळ माथेरान एकच मार्ग असल्याने खूपच गर्दी वाहतूक कोंडी होते. शासनाने महाबळेश्वर प्रमाणे दुसरा पर्यायी रस्ता केल्यास बरे होईल. महाबळेश्वरला जाण्यासाठी खूप रस्ते आहेत मग इथे का केले जात नाहीत.
>
> रामकिशोर जांभवंत
> पर्यटक, मुंबई

## वयोवृद्ध पेन्शनरना घरबसल्या पेन्शन

**अलिबाग :** दुर्धर आजारांमुळे निवृत्तिवेतनविषयक बँक खात्याचे व्यवहार व्यक्तिशः हाताळू न शकणाऱ्या निवृत्तिवेतनधारकांना आता घरबसल्या पेन्शन मिळू शकणार आहे. त्यांना विश्वासू व्यक्तीची पालक नियुक्ती करून त्यांच्यामार्फत बँकेतून पेन्शन काढता येईल. अनेक वेळा अशा निवृत्तिवेतनधारकांसह त्यांचे वैवाहिक जीवनसाथीदार देखील अशाच प्रकारच्या शारीरिक-मानसिक दुर्बलतेमुळे निवृत्तिवेतन विषयक संयुक्त बँक खात्याचे व्यवहार हाताळू शकत नाहीत.अथवा त्यांचे वैवाहिक जीवनसाथीदार हयातच नसतील, तर पालक नियुक्ती सुविधांपैकी त्यांना सोयीच्या असलेल्या कोणत्याही सुविधेचा वापर करता येईल, असे नमूद केले आहे.

## मनसे लढवणार उरण विधानसभेची निवडणूक – जिल्हाध्यक्ष संदेश ठाकूर

**। उरण । वार्ताहर ।**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या आदेशानुसार येऊ घातलेल्या विधानसभेच्या स्वबळावरील निवडणुकांसाठी मनसेने उरण मध्ये पक्ष बांधणीसाठी जय्यत तयारी सुरू केली आहे.तसेच गावोगावी शाखा अध्यक्षपदी निवड प्रक्रिया सुरू केली असून १९० उरण विधानसभा मतदारसंघातून मनसेकडून मनसेचे उरण तालुकाध्यक्ष ॲड. सत्यवान भगत हे इच्छुक आहेत. मनसेच्या सर्व कार्यकर्त्यांनी व पदाधिकाऱ्यांनी तयारीला लागावे असे आवाहन मनसेचे जिल्हाध्यक्ष संदेश ठाकूर यांनी केले आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष संदेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली सध्या गावोगावी मनसेकडून जनहितार्थ उपक्रम राबविण्याचा संकल्प मनसेचे तालुकाध्यक्ष ॲड. सत्यवान भगत यांनी व्यक्त केला आहे. त्यासाठी गावातील लोकांचे प्रश्न जाणून घेऊन त्या प्रश्नांना शासनस्तरावर न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले आहेत. तसेच तालुक्यातील जनतेच्या प्रवाशांच्या दुष्टीने महत्वाचा समजला जाणारा खोपटा रस्त्याच्या दुरुस्तीसाठी लवकरच आंदोलन छेडण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या जनहिताच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शविताना मनसेचे जिल्हाध्यक्ष संदेश ठाकूर हे बोलत होते. यावेळी तालुका सचिव अल्पेश कडू, तालुका उपाध्यक्ष राकेश भोईर, विभाग अध्यक्ष संदीप ठाकूर बबन ठाकूर निशांत ठाकूर या सर्वांच्या माध्यमातून चिरनेर शाखा अध्यक्षपदी किरण भाकुर्लेकर, द्रोनागिरी सेक्टर ४७, ५३ शाखाध्यक्षपदी प्रवीण कांबळी, समीर गंगावे याची नियुक्ती केल्याचे पत्र तालुकाध्यक्ष ॲड. सत्यवान भगत यांच्या हस्ते देण्यात आले.

## नागोठणे संत सेवा मंडळाच्या अध्यक्षपदी शैलेश रावकर

**। नागोठणे । वार्ताहर ।**

नागोठणे शहर व परिसरातील धार्मिक कार्य व वारकरी सांप्रदायात नावलौकिक मिळविलेल्या नागोठणे संत सेवा मंडळाच्या अध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते व प्रियदर्शनी चालक मालक वाहतूक संस्थेचे संचालक शैलेश रावकर यांची निवड करण्यात आली आहे.

उर्वरित कार्यकारिणीमध्ये उपाध्यक्षपदी महेश वाघमारे, सचिव अनिल नागोठणेकर, सहसचिव राजू नाकते, खजिनदारपदी जनार्दन सकपाळ, सहखजिनदारपदी हरेश शिर्के, तर सदस्य म्हणून चंद्रकांत ताडकर, विजय नागोठणेकर, हितेश भोय, कैलास परदेशी, प्रणव रावकर, ज्ञानेश्वर साळुंखे, रोहिदास हातनोलकर, चंद्रकांत ताडकर यांची निवड करण्यात आली आहे. या बैठकीला मंडळाचे वरिष्ठ सदस्य नामदेव चितळकर, बाळा पोटे, आप्पा रावकर, विजय शहासने, रतन हेंडे, ऋषिकेश भोय, रुपेश नागोठणेकर, मनोज भोसले आदींसह इतर सदस्य यावेळी उपस्थित होते. उपस्थित सर्वांनी नवीन पदाधिकारी व कार्यकारिणीचे अभिनंदन करुन त्यांना शुभेच्छा दिल्या.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. १. वेटर, २. नाश्ता बनवणारा कूक, ३. हाऊस कीपिंग, २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी संपर्क साधावा. (व्हॉटसॲप वर मेसेज करावा.) ८४०८८२९५५५, ७८७५८६६५५५
- हार्डवेअर दुकानात मांडवा येथे मुलगी कामाला पाहिजे. मो. ८००७८९३२३२, ९४२१९५४३४८
- ५०००० रुपये किंमतीचा CNC मशिन ऑपरेटींगचा कोर्स मोफत, मोफत, मोफत, पात्रता १२ वी किंवा १५ वी पास, वयोमर्यादा-३० वर्षे पर्यंत. पगार- १०००० रुपये, ८ तास ड्युटी, संपर्क- ९०४९६५५५२३
- Vacancies for office staff for Office in Alibag Fresh graduates required For interview Call 9422383099 Between 11.am to 6 pm
- पी.एन.पी मध्ये गाळा भाड्याने देणे आहे. साबु हॉस्पिटल बिल्डींग, कलावती भाजी भंडारच्या बाजुला संपर्क - ९६०४१३८८२६/७३०४८५२३१५
- वाडगाव फाटा येथे कॉटेजमध्ये काम करण्यासाठी जोडपे पाहिजे. मो.९७६२७७७९७५
- Data Entry साठी Ladies पाहिजे Tally ERP 9 येणे आवश्यक. त्वरित संपर्क साधावा. कामाचे ठिकाण : धरमतर चेक पोस्ट कामाची वेळ :९ ते ५.३०, पगार: ८,००० ते १०,००० संपर्क : ९०२८७४९२९२ /८३९०५५१९३

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## जलमार्ग झाल्यास १० मिनिटात श्रीवर्धन

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

श्रीवर्धन तालुक्यात कुरवडे ते दांडा या दोन गावांना जोडणाऱ्या २१ किलोमीटरच्या मार्गासाठी चाळीस मिनिटे लागतात, मात्र ही गावे खाडीमार्गे जोडल्यास १० मिनिटांत श्रीवर्धनला पोहोचता येईल. त्यामुळे जलमार्गासाठी प्रशासकीय पातळीवर प्रयत्न व्हावेत, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

श्रीवर्धन-दांडा आणि कुरवडे हे अंतर २० किमीहून अधिक आहे. मात्र सागरी मार्गाने हे अंतर केवळ १०० मीटर इतके होऊ शकते. पूर्वी याच खाडीमार्गे बोटीने नागरिक प्रवास करून श्रीवर्धनच्या बाजारपेठेचे ये-जा करायचे, मात्र कालांतराने जलप्रवास बंद झाला आणि नागरिकांना वीस किलोमीटरचा फेरा मारावा लागतो आहे. रायगड व रत्नागिरी या दोन्ही जिल्ह्यातील नागरिकांना सागरी पुलामुळे श्रीवर्धनची बाजारपेठ उपलब्ध होऊ शकते. शिवाय वेळास- बाणकोट या ठिकाणी, आजूबाजूच्या रत्नागिरी जिल्ह्यातील शेवटच्या टोकापर्यंत दळणवळण सोयीचे होईल.सध्या सागरमाला प्रकल्पाअंतर्गत रायगड जिल्ह्यातील बागमांडला व रत्नागिरी जिल्ह्यातील वेश्वी गावांना जोडणाऱ्या बाणकोट खाडीवरील प्रकल्प सुरू आहे. या पुलामुळे रायगड आणि रत्नागिरी हे दोन जिल्हे जोडले जात आहेत. दोन्ही जिल्ह्यातील नागरिक, पर्यटक आणि व्यावसायिकांना भविष्यात मोठा फायदा होणार आहे.

### वेळ व इंधनाची बचत

**दांडा व कुरवडेदरम्यान छोटी खाडी आहे. या दरम्यानचे अंतर साधारण शंभर मीटर असू शकते. पूल झाल्यास ग्रामस्थ व पर्यटकांचा वेळ, पैसे व इंधनाची मोठ्या प्रमाणावर बचत होईल.**

### हरिहरेश्वरचा प्रवास सुकर

**कुरवडे पूल झाल्यास, श्रीवर्धनमार्गे हरिहरेश्वरदरम्यान वीस किलोमीटरचा फरक पडेल. पर्यटकांची संख्या वाढल्यास बचतगट, छोटे व्यवसायही तेजीत येतील. दांडा ते कुरवडेदरम्यान जलमार्गाबाबत पूल बांधण्यासंदर्भात सर्वे करता येऊ शकेल. त्यासाठी भौगोलिक, आर्थिकदृष्टया पडताळणी करण्याबाबत वरिष्ठ पातळीवर पाठपुरावा करू.**

**– तुषार लुंगे, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, श्रीवर्धन.**

## श्री काळभैरव नागरी सहकारी पतसंस्थेतर्फे मान्यवरांचा सत्कार

**। कोर्लई । वार्ताहर ।**

मुरुडच्या श्री काळभैरव नागरी सहकारी पतसंस्थेतर्फे संस्थेचे संचालक कर्मचारी व प्रतिनिधी यांचा यथोचित सत्कार आयोजित करण्यात आला.

श्री काळभैरव संस्थेच्या प्रतिनिधी तृप्ती पाटील यांची शिवसेनेकडून रायगड जिल्हा महिला संघटिकापदी नियुक्ती झाल्याबद्दल, तसेच तसेच संस्थेचे संचालक प्रतिक रमेश पेडणेकर यांची श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतनगर नांदगाव हायस्कूलच्या पर्यवेक्षकपदी नियुक्ती तसेच आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल, व संस्थेचे कर्मचारी प्रथमेश पुलेकर यांनी जीवाची परवा न करता शॉक सर्किटमुळे रसाळ खानावळ यांच्या किचनमध्ये लागलेल्या आगीमधून सिलेंडर बाहेर काढले या सर्वांना कौतुकाची थाप म्हणून संस्थेतर्फे श्रीफळ, शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले यावेळी संस्थेचे चेअरमन दिपक पालशेतकर, स्नेहा पाटील, संचालक सुरेश कासेकर, प्रतीक पेडणेकर व दीपक मयेकर. संचालिका उषा खोत तसेच प्रतिनिधी व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

## केळीच्या झाडापासून बनवले दोर

***। पाली /बेणसे । वार्ताहर।***

***अलिबाग तालुक्यातील चौल येथील शैलेश राईलकर पर्यावरण स्नेही (इकोफ्रेंडली) जीवन पद्धती जगत आहेत. त्यांनी प्रयोग व शोध याद्वारे विविध इकोफ्रेंडली वस्तू तयार केल्या आहेत. तसेच प्लास्टिकला पर्याय दिला आहे. नुकतेच त्यांनी केळीच्या झाडापासून दोर बनवले आहेत. तसेच डस्टबिन बॅगला राखेचा पर्याय देऊन जणू राखाडीची डास्टबिन बॅग बनवली आहे.***

*सतीश राईलकर विजेवर चालणारी कोणतीही यंत्रसामग्री न वापरता केळीच्या खोडापासून धागा निर्मिती करून त्यापासून दोरी बनवली आहे. यासाठी प्रथम केळीच्या खोडाचे काप केले. त्यानंतर त्या खोडाचे सर्व पापुद्रे वेगवेगळे करून या पापूद्र्यांवरती दाब देऊन त्यातील रस पाणी काढून टाकाले. नंतर हे पापुद्रे दोरी वरती उन्हात वाळत टाकून चांगले सुकवून घेतले. सुकल्यानंतर या धाग्याची वेणी करून त्याचा दोरखंड बनविला. असे दोरखंड ग्रामीण भागातील शेतकरी आणि बागायतदारांना वापरता येऊ शकतात.*

*यापासून कलात्मक वस्तूंची निर्मिती ही करता येऊ शकते. या दोरखंडांना चांगली मजबुती असते. भाताचे भारे बांधणे, गोणी बांधणे, अशाप्रकारे याचा वापर करता येतो. घरच्या घरी अशा दोऱ्या बनविल्यास बाजारातील दोऱ्या विकत घेण्याचा खर्च वाचू शकतो.*

*ग्रामीण भागात कचऱ्याचे व्यवस्थापन कसे करता येईल या विषयावर काम करताना राईलकर यांना राखेच्या पिशवीचा शोध लागला. घरी आलेल्या प्लास्टिक पिशव्यांचे करायचे काय? जाळल्या तर हवा खराब होते. प्लास्टिकचे विघटन होत नसल्यामुळे मातीतही टाकता येत नाहीत.*

*मग जाणीवपूर्वक वेगळ्या ठेवून त्या पुनर्निर्मितीसाठी पाठविणे हा एकच उपाय त्यांना सापडला. त्याचबरोबर प्लास्टिक पिशवीचा वापर कुठे कुठे टाळता येईल आणि त्यावर उपाय काय यावर विचार करता करता ही राखेची पिशवी बनविण्याचे त्यांना सुचले.*

*ग्रामीण भागात बऱ्याचशा शेतकरी बागायतदारांकडे घराभोवताली स्वतःची पुरेशी जागा उपलब्ध असते. अशा ठिकाणी त्या शेतकऱ्याच्या घरात निर्माण होणारा ओला कचरा त्याच्याच जागेत जिरविता येऊ शकतो. अशाप्रकारे सार्वजनिक ठिकाणी टाकण्यात येणारा कचरा किंवा डम्पिंग ग्राउंड कडे जाणारा कचरा थोपाविता येऊ शकतो. कचरा डस्टबिन मध्ये टाकण्यासाठी बाजारात मिळणारी काळी प्लास्टिकची पिशवी टाळण्यासाठी ही राखेच्या पिशवीची कल्पना सुचली.*

### मोठी समस्या

***प्रत्येकजण आपल्या घराच्या कचऱ्याच्या डब्यात काळी प्लास्टिकची पिशवी लावत असतो. आणि पिशवी सकट उचलून तो कचरा आपण घंटागाडीत टाकतो. त्यामुळे आपला कचऱ्याचा डबा स्वच्छ राहतो खरा परंतु पर्यावरणामध्ये आपण एक प्लास्टिकची पिशवी रोज टाकत असतो. डम्पिंग ग्राउंडमध्ये अशा लाखो पिशव्यांमधून कचरा आल्याने हा ओला कचरा सडू लागतो. आणि कर्मचाऱ्यांच्या अजाणतेपणामुळे शेवटी हा कचरा जाळला जातो. आपल्या देशातील डम्पिंग ग्राउंडमध्ये याच पद्धतीने कचरा जाळल्याने पृथ्वीवरची शुद्ध हवा खराब होत चालली आहे. त्यामुळे या डस्टबिन बॅगला पर्यायवस्णनेही पर्याय देणे गरजेचे होते.***

### अशी बनते राखेची डस्टबिन बॅग

***कचऱ्याची बादली ओलसर करून त्यात राख आतून सर्वत्र लावावे. ज्यामुळे त्याला एक प्रकारचे राखेचे कोटिंग तयार होते. म्हणजे एक प्रकारे ही कचरा बादलीत लावण्याची पिशवीच तयार होते. यातील कचरा घंटा गाडीत देता येतो किंवा जवळच्या खड्ड्यात टाकता येतो. यामुळे प्लास्टिक थैली टाळली जाते. ही राख घरातील चुलीमधून गावातील इतर ठिकाणावरून आणली जाते व साठवली जाते गरजेनुसार तिचा वापर केला जातो.***

# कर्जत शहराचा पाणीप्रश्न पेटला

## कोतवालनगरमधील नागरिक पालिकेवर धडकले

**। नेरळ । प्रतिनिधी ।**
**कर्जत शहरातील कोतवाल नगर भागात गेली दोन महिने अत्यंत कमी दाबाने पाणी पुरवठा होत आहे. त्यामुळे संतापलेल्या कोतवाल नगर भागातील नागरिकांनी कर्जत नगरपरिषद कार्यालयात धडक दिली. प्रतिष्ठित नागरिक विजय बेडेकर यांनी पुढाकार घेऊन या नगरातील सर्व नागरिकांना पाण्याच्या प्रश्नांवर एकत्र केले. पाणी मिळत नसल्याने कोतवालनगर भागातील महिलांचा या धडक मोर्चात पालिका अधिकाऱ्यांना धारेवर धरले.**

कर्जत शहरातील महत्वाचा भाग म्हणून हुतात्मा भाई कोतवाल नगर ओळखला जातो.शहरातील अन्य सर्व भागापेक्षा कोतवाल नगर हा परिसर खोलगट भागातील परिसर ओळखला जातो.कर्जत प्रादेशिक नळपाणी योजना झाल्यापासून कोतवाल नगर येथे पाणी कमी दाबाने येत आहे.कर्जतमध्ये सर्व ठिकाणी पाणी सोडून शेवटी आमच्या येथे सोडत आले आहेत. तरीदेखील या भागातील नागरिक हे अपुऱ्या पाणी पुरवठा असून देखील त्या अपुऱ्या पाण्यावर घरातील सर्व कामे पूर्ण करीत होते.त्यात मागील दोन महिने नळाला पाणी येत नव्हते.त्यामुळे स्थानिक नागरिक हे दररोज पाण्याचे टँकर मागवून पाणी पुरवठ्याचा प्रश्न निकाली काढावा लागतो.हुतात्मा भाई कोतवाल नगरमध्ये अपुऱ्या पाण्याबरोबर नगरातील साफसफाई देखील वेळेवर होत नसल्याने या भागातील नागरिक संतप्त आहेत. त्यामुळे या भागातील प्रतिष्ठित नागरिक विजय बेडेकर यांनी कोतवाल नगर भागातील सर्व रहिवाशी यांना एकत्र केले. त्यानंतर आज कोतवाल नगरातील सर्व नागरिक हे कर्जत नगरपरिषदमध्ये पोहोचले.

कोतवाल नगर भागातील नागरिकांनी पालिका पाणी पुरवठा अधिकारी यांना घेराव घातला. त्यावेळी मोठ्या संख्येने महिला वर्गाची संख्या मोठी होती.विजय बेडेकर, सुनील हरपूडे, हेमंत ठाणगे,शेखर सावंत, भाई लाड,दिनेश सोलंकी, पंढरीनाथ बडेकर,संतोष भासे, भालचंद्र जोशी,तुषार दिवेकर, सुरज तांडेल,नितीन तांबडे,नाथा राणे,मीना प्रभावळकर,संगीता गोडबोले,संध्या बेडेकर,शर्वरी फडके,कांता सांगळे,छाया गांगल आदी उपस्थित होते.

यावेळी पालिका अधिकाऱ्यांनी उद्या सकाळी पाण्याची जलवाहिनी पाहण्यासाठी कोतवाल नगर भागात पोहोचत आहोत. त्यादिवशी कोणत्याही अडचणी दूर झाल्या नाहीत, तर पुन्हा कोतवाल नगर भागात येऊन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निकाली काढतील असे आश्वासन पाणी पुरवठा अभियंता स्वागत विरंबोळे यांनी नागरिकांना दिले आहे. तर या भागातील खासगी आणि व्यावसायिक जलवाहिन्या वेगळ्या करण्यात याव्यात, अशी सूचना नागरिकांनी केली आहे.

## पदवीधर मतदारसंघाच्या मतदानाकरिता

# मतदारांना पर्यायी कागदपत्रे ग्राह्य

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

कोकण विभाग पदवीधर मतदारसंघाची निवडणूक २६ जून रोजी होणार आहे. मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर मतदारकर्त्यांनी त्यांची ओळख पटविण्यासाठी छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करु शकत नाही अशा मतदारांनी त्यांची ओळख पटवून देण्यासाठी निवडणूक आयोगाने निर्धारीत केलेल्या ओळखपत्रांपैकी कोणतेही ओळखपत्र मतदान केंद्रावर सादर करता येईल, अशी माहिती उपआयुक्त (सा.प्र.) कोकण विभाग तथा सह. निवडणूक निर्णय अधिकारी अमोल यादव यांनी एका प्रसिध्दी पत्रकान्वये दिली आहे.

विधान परिषदेची द्विवार्षिक शिक्षक मतदारसंघाची निवडणुकीकरिता मतदान करताना मतदान केंद्रावर मतदारांची ओळख पटविण्यासाठी जे मतदार ओळखपत्र सादर करु शकत नाहीत, अशा मतदारांना त्यांची ओळख पटविण्यासाठी मतदार ओळखपत्र व्यतिरिक्त खालील नमूद पर्यायी कागदपत्रे पुरावा म्हणून ग्राह्य धरण्याबाबत आयोगाने आदेश दिले आहेत.

आधारकार्ड, वाहन चालक परवाना, पॅन कार्ड, भारतीय पारपत्र (पासपोर्ट), राज्य/केंद्र सरकारद्वारे त्यांच्या कर्मचाऱ्यांना जारी केलेले सेवा ओळखपत्र उपक्रम, स्थानिक संस्था किंवा इतर खासगी औद्योगिक घरे, खासदार/आमदार/एमएलसी यांना अधिकृत ओळखपत्रे जारी केली जातात. ज्या शैक्षणिक संस्थांनी दिलेले सेवा ओळखपत्र संबंधित शिक्षक/पदवीधर मतदार संघात काम केले जाऊ शकते. विद्यापीठाने जारी केलेले पदवी/डिप्लोमाचे प्रमाणपत्र, मूळ स्वरूपात, सक्षम अधिकाऱ्याने जारी केलेले शारीरिक अपंगत्वाचे प्रमाणपत्र, वर युनिक डिसॅबिलिटी आयडी कार्ड अशी कागदपत्रे पर्यायी कागदपत्रे पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात येतील. २६ जून रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ या कालावधीत होणाऱ्या मतदानाच्या दिवशी पदवीधर/शिक्षक मतदारांनी मोठ्या संख्येने मतदान करावे, असे आवाहन अमोल यादव यांनी केले आहे.

**V. Y. KOTHARI ENGLISH SCHOOL, NERAL**
WANTED EXPERIENCED TEACHER-
Studied Throughout English
Bsc,B.Ed (Maths & Science)- Medium (English)
D.Ed (Primary section) - Medium (English)
For V. Y. KOTHARI ENGLISH SCHOOL, NERAL
Walk - in - Interview 6th July 2024, Saturday
Time 10.00 AM to 12.00 PM
Contact No. 8879737931/ 7208899978
**Sd**
**Head Master**
**V. Y. Kothari English School - Neral**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकतीचे मालक श्री. प्रमोद हरिश्चंद्र जाधव, श्री. हर्षद प्रमोद जाधव यांनी त्यांचे स्वकष्टार्जित मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील मिळकत आमचे अशिल राहूल जयंत तांडेल व मिलिंद जयंत तांडेल यांना कायम स्वरूपी खरेदीखताने विकत देण्याचे ठरविले असून तशी बोलणी आमचे अशिलांबरोबर केलेली आहेत. मौजे खांडस, तालुका कर्जत, जिल्हा रायगड ४१०२०१ येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :-

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रू.पै) |
|---|---|---|
| ६५/४ | ०.५२.०० | ३४.०० |

तरी मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, बयाणा, पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षीस, दान, जप्ती, लिज, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशिर हक्क, भारतातील कोणत्याही कोर्टाचे मनाई हुकूम, करारनामा व इतर हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत खाली सही करणार वकील यांच्या नमुद केलेल्या कार्यालयाचे पत्त्यावर आपल्या हरकती लेखी पुराव्यासह देण्यात यावे. दिलेल्या मुदतीनंतर कोणाचीही हरकत आली तर ती हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

कर्जत — सही/-
तारीख २५/०६/२०२४ — **ॲड. जगदीश पांडूरंग कराळे**
कार्यालय : १०. पंकज रेसिडेन्सी,
साई हॉस्पीटल जवळ, धामोते, नेरळ, ता. कर्जत,
जि. रायगड ४१०१०१, मो.नं.८३६९२१७३१३

### जाहिर नोटीस

आरटीएस अपिल क्र.८९/२०२३

१. अशोक श्रीपत भारती,
रा.शिवकृपा हाऊस, माणकिवली, ता. खालापूर, जि. रायगड
२. प्रकाश अनाजी फावडे,
रा. शेडवली, पो.खोपोली, ता.खालापूर, जि.रायगड — अपिलार्थी

विरुध्द

१. जितेंद्र गोवर्धनदास तन्ना,
रा. बाजारपेठ खोपोली, पो.खोपोली,
ता. खालापूर, जि. रायगड — सामनेवाला

वादी यांनी मौजे-शेडवली, ता. खालापूर, जि.रायगड येथील तहसिलदार खालापूर यांचेकडिल आदेश क्र.हक्कनोंद/कात-४/तक्रार नोंद क्र.१३/२०२३/३८४७, दि.२७/०६/२०२३ रोजीचा आदेश व फेरफार क्र.९८४ चे विरुध्द दि.०८/०९/२०२३ रोजी या कार्यालयात अपील दाखल केले आहे.

सदर अपिलाचे मुद्यावर दोन्ही पक्षकारांना त्यांचे म्हणणे मांडणेकामी प्रथम सुनावणी दि.१०/११/२०२३ रोजी सकाळी ११-०० वाजता सुनावणी घेण्यात आलेली आहे. त्यानंतर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र सामनेवाले या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपीलाची पुढील सुनावणी दिनांक १६/०७/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता उपविभागीय अधिकारी कर्जत उपविभाग कर्जत, प्रशासकीय भवन, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड येथे निश्चित करण्यांत आली आहे.

प्रस्तुत अर्जामधील सर्व सामनेवाले यांनी तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींना २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कर्जत, जि. रायगड येथे समक्ष येऊन आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहाणार नाही यांची नोंद घ्यावी.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र | स. नं/हि.नं | क्षेत्र चौ.मी | आकार |
|---|---|---|---|
| १ | १०/३/अ/२ | ०-४५-४० | ८.६२ |

सदरची जाहीर नोटीस आजरोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिली.

ठिकाण: कर्जत — सही/-
दिनांक : १४/०६/२०२४ — **(प्रसाद पाटील)**
नायब तहसिलदार
उपविभागीय अधिकारी कार्यालय,
कर्जत उपविभाग कर्जत

### जाहिर नोटीस

या नोटीसीद्वारे कळवण्यात येते की मी श्रीमती अच्युता अनंत पाटील माझे पती अनंत श्रावण पाटील यांच्या नावावर गाडी क्रमांक MH06 BE0224 ही स्विप्ट डिझायर गाडी होती माझे पती स्वर्गवासी झाल्यामुळे ती गाडी माझ्या नावावर करण्यात येत आहे. या गाडीवर कोणाचा बोजा, तारण असेल व गाडी कोणी विकत घेतली असेल तर नोटीस दिलेल्या तारखेपासून १५ दिवसात हरकती कळवावे. १५ दिवसानंतर येणाऱ्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाही.
मोबाईल नंबर-९१६८७८१२१०

**श्रीमती अच्युता अनंत पाटील**

### जाहीर नोटीस

आमचे आशील यांनी दिलेल्या माहितीवरून व सांगितलेवरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालीलप्रमाणे:-

मौजे रांजणपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. १७, क्षेत्र ०.५६.५० (हे. आर.), पो. ख. ०.०८.५० (हे. आर.), एकूण क्षेत्र ०.६५.०० (हे. आर.), आकार ०.७४ (रु. पैसे), या मिळकतीपैकी विद्यमान मालक श्री. कृष्णा रघुनाथ काशीद रा. धोकवडे, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या मालकीचे क्षेत्र ०.२५.६० हे. आर या क्षेत्रापैकी ०.०६.५० हे. आर इतके क्षेत्र व सदर मिळकतीतून १२ फुट रुंद इतका रस्ता जाण्या-येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह सदरहू मिळकत विकत देण्याबाबत माझे आशील यांजबरोबर व्यवहार ठरविला आहे. सदर व्यवहारास श्री. संतोष कृष्णा काशीद, श्री. अजित कृष्णा काशीद, रा. धोकवडे यांनी संमती दिलेली आहे. सदरहु व्यवहारापोटी बयाणा म्हणुन २२,४०,०००/- इतकी मोठया प्रमाणात रक्कम स्विकारलेली आहे. मात्र श्री. कृष्णा रघुनाथ काशीद हे माझे आशीलांचा हक्क डावलुन परस्पर सदर मिळकत त्रयस्थ इसमास विक्री करु पाहत आहेत, असे माझे आशीलांस खात्रीलायक समजलेले आहे. तरी श्री. कृष्णा रघुनाथ काशीद यांचेशी वर नमुद मिळकती संदर्भात कुणीही कोणत्याही स्वरूपाचा खरेदी विक्री व अन्य व्यवहार करू नये. या उपरही कोणीही व्यवहार ठरविल्यास तो व्यवहार बेकायदेशीर असुन माझे अशीलांवर बंधनकारक राहणार नाही.

अलिबाग, — **(ॲड. परेश एम.घरत )**
दिनांक :- २५/०६/२०२४. — तळमजला, अशोका शॉपींग सेंटर,
एस.टी. स्टॅण्डजवळ, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड,
९८५०४८१२३४

### जाहीर नोटीस

सदरील नोटीशीद्वारे सर्वांना सूचीत करण्यात येते की, माझ्या अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या जमीन मिळकती संदर्भित जमीन मिळकतींचे विद्यमान मालक श्री. सुबोध सुभाष नाईक यांच्याकडून कायमस्वरूपी व कायदेशीरपणे विकत घेण्याचे ठरविलेले आहे व तशी प्राथमिक बोलणी माझे अशील व विद्यमान मालक यांचे दरम्यान पूर्ण झालेली आहेत. संदर्भित जमीन मिळकती दया पूर्णपणे बिनजोखमी, बोजाविरहीत व निर्वेध तसेच कोणत्याही प्रकारे अबाधित असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे. असे असे असूनदेखील संदर्भित जमीनमिळकतींमध्ये जर कोणत्याही व्यक्तीचे/व्यक्तींचे खरेदीखत करार, भाडेपट्टा बक्षिस, गहाणखत इत्यादीद्वारे व इतर कसल्याही कराराद्वारे या दस्ताद्वारे प्राप्त होणारे कायदेशीर हक्क/अधिकार वा हितसंबंध असतील तर अशा व्यक्तीने /व्यक्तींनी त्या आशयाची लेखी हरकत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह सदरची नोटीस प्रसिध्द झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत माझ्या खालील नमूद पत्त्यावर पाठवून द्यावी. विहित मुदतीनंतर आलेली कसलीही हरकत/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व माझे अशिल संदर्भित जमीनमिळकतींचा व्यवहार अंतिमत: पूर्ण करतील याची कृपया नोंद घ्यावी.

**-: संदर्भित जमीनमिळकतींचे परिशिष्ट :-**

| अ. क्र. | मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू..पै.) |
|---|---|---|---|---|
| १. | रांजणपाडा, ता.अलिबाग, जि. रायगड. | २८/२ | ०-३५-५० | १.०५ |
| २. | रांजणपाडा, ता.अलिबाग, जि. रायगड. | २८/७ | ०-२३-५० | ०.८३ |
| ३. | रांजणपाडा, ता.अलिबाग, जि.रायगड. | ३४/३/० | ०-६६-२० | १५.४१ |

अलिबाग, — **राजेंद्र दा. पाटील,**
दिनांक : २५/०६/२०२४. — ॲडव्होकेट,
कृष्णवंदन-२, ब्राम्हणआळी,
कन्याशाळेसमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो. ९८२२५२८९३१.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल रुबीना अमजद अली शेख, यांनी खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत विद्यमान मालकांकडून विकत घेणे करीता ठरविलेले आहे.

मिळकतीचे वर्णन:- मौजे-पोशीर, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड येथील शेतजमीन मिळकत

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. | आकार पै. |
|---|---|---|---|---|---|
| (१) अरशद सिकंदर मस्ते २) सिमाब सिकंदर मस्ते ३) शाहीद सिकंदर मस्ते | १४४ | ५ | ०.२१.२० | ०२ | ६९ |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकत बाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र,, चार्ज व गैर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार वकील यांचे कडे ही नोटीस प्रसिध्द झाल्या पासून १० दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हित संबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधन कारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. — **मनोज किसन क्षिरसागर (ॲडव्होकेट)**
दि. २४/६/२०२४ — मु. सम्राटनगर, पो. नेरळ, ता. कर्जत,
जि.रायगड. पिनकोड ४१०१०१

### जाहीर नोटीस

अर्ज क्र.१०/२०२४

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. अमित गजानन धसाडे
वय : ३० वर्षे, धंदा : शेती, — अर्जदार
रा. मु. भांदरे, पो. कविळवहाल,
ता. माणगांव, जि. रायगड.

विरूध्द

१.निबंधक जन्म - मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी, — सामनेवाला
ग्रुप ग्रामपंचायत मांगरूळ,
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहु अर्जदार श्री. अमित गजानन धसाडे यांची आजी कै. लक्ष्मी बाबु धसाडे ही दि.-२२/०९/२०११ रोजी मौजे भांदरे, ता. माणगांव, जि. रायगड. येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली. त्यांचे मुत्युची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना जावक क्र. ०३/२०२४ ने दि. ०९/०५/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांची आजी कै. लक्ष्मी बाबु धसाडे ही दि. २२/०९/२०११ रोजी मयत झाली असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होवून दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे. किंवा कसे हे तपासण्याकरीता सदीच जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. अमित गजानन धसाडे यांची आजी कै. लक्ष्मी बाबु धसाडे ही दि. २२/०९/२०११ रोजी मौजे भांदरे, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव : — सही/-
ता. : १२/०६/२०२४ — **कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

### जाहिर नोटीस

निः ७/ड
दिवाणी चौकशी अर्ज नं. ०७/२०२४

**पाली येथिल मे दिवाणी न्यायाधीश क. स्तर सो. यांचे न्यायालयात**

श्री. अमरकुमर रसिकलाल शहा... — अर्जदार

विरुध्द

कोणीही नाही

सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१) के. रसिकलाल पुरुषोत्तक शहा, हे बी-३, हरीकृष्ण पार्क, कॅडिला क्रॉसिंग समोर, घोडासर, अहमदाबाद सिटी गुजरात ३८००५० येथे वास्तव्यास होते. के रसिकलाल पुरुषोत्तम शहा हे दिनांक १९/०८/२०१५ रोजी राहत्या घरी मयत झाले आहेत. कै. रसिकलाल पुरुषोत्तम शहा यांचे नावे मौजे पेडली, ता सुधागड, जि रायगड येथे सर्व्हे नं ३०/१/ब क्षेत्र ३.८५.७० हे. आर पैकी त्यांचा असणारा अविभक्त हिस्सा अशी शेत मिळकत असुन कै. रसिकलाल पुरुषोत्तम शहा यांस कै प्रमिलाबेन रसिकलाल शहा (मयत) ही पत्नी व अर्जदार हा मुलगा असे कायदेशीर वारस होते कै प्रमिलाबेन रसिकलाल शहा हया दि २५/०३/२०२३ रोजी राहत्या घरी मयत झाल्या असून अर्जदाराच्या व्यतिरिक्त कै. रसिकलाल पुरुषोत्तम शहा यांस अन्य कोणीही वारस नाही.

२) कै. रसिकलाल पुरुषोत्तम शहा यांस वरील अर्जदार हेच कायदेशीर वारस असून अर्जदार यांचे व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाही. सबब अर्जदारांनी कै रसिकलाल पुरुषोत्तम शहा यांचे वारस असल्याचे ठरवून मिळणेकामी मा. पाली दिवाणी व फौजदारी न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

३) अर्जदार यांस के रसिकलाल पुरुषोत्तम शहा यांचे वारस असल्या वा दाखल देणेबाबत कुणाचीही हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या लेखी हरकती सदर जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या मुदतीमध्ये मा दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाली यांचे न्यायालयात लेखी स्वरुपात कळवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांनी दाखल केलेले अर्जास कोणाचीही हरकत नाही असे समजून गा न्यायालय अर्जदार यांस ते कै. रसिकलाल पुरुषोत्तम शहा यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचा वारस दाखला मंजूर करेल व मागाहून आलेल्या हरकती मा. न्यायालयावर बंधनकारक राहणार नाही.

आज दिनांक १८/६/२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले

पाली — **कोर्टाचा गोल शिक्का**
दिनांक. १८/६/२०२४
**क लिपिक** — **सहा अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, कस्तदिवाणी** — **न्यायालय कस्तर पाली**

### जाहीर नोटीस

मौजे शहाबाज, ता. अलिबाग, जि. रायगड या ठिकाणी असणारे भूमापन क्रमांक व उपविभाग २५४/१ व २५४/२ याच्या अनुषंगाने मा. तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालयात बॉम्बे टेनेन्सी ॲन्ड ॲग्रीकल्चरल लँड ॲक्ट कलम ३२ ग अन्वये खालील दावे प्रलंबित आहेत.

१)दावा क्र. २२/२०१६ विजय डुकरे व इतर विरूध्द कृष्णा दयाराम म्हात्रे व इतर
२)दावा क्र. २५/२०१९ दिवंगत आत्माराम गोसावी जुईकर व इतर विरूध्द कृष्णा दयाराम म्हात्रे

उपरोक्त प्रलंबित दाव्यांमध्ये माझे अशिल श्री. केसरीनाथ दयाराम म्हात्रे हे पक्षकार आहेत. सदरील उपरोक्त नमूद भूमापन क्रमांक व उपविभाग २५४/१ व २५४/२ या जमिनींमध्ये माझे अशिलाचे हक्क, हिस्सा हित आहे. या नोटिसीव्दारे असे जाहीर करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रलंबित दाव्यातील जमिनींच्या अनुषंगाने माझ्या अशिलाने कोणासही खरेदी/विक्री वा इतर कोणत्याही प्रकारचे हस्तांतरण केलेले नाही वा हस्तांतरणाचे अधिकार दिलेले नाहीत. उपरोक्त नमूद जमिनी माझे अशिलाच्या सहमतीशिवाय खरेदी-विक्री वा इतर कोणत्याही प्रकारचे हस्तांतरण करण्यास या नोटिसीव्दारे माझे अशिल हरकत घोषित करीत आहेत. तरी कोणीही सदरील जमिनींबाबत माझे अशिलाच्या सहमतीशिवाय कोणीही व्यक्ती, आस्थापना, कंपनी वा इतर यांनी व्यवहार करू नये. अन्यथा माझ्या अशिलाच्या सहमतीशिवाय उपरोक्त जमिनींच्या अनुषंगाने कोणताही व्यवहार केल्यास त्याची पूर्ण जबाबदारी संबंधिताची असेल आणि सदरील संबंधितांविरोधात माझे अशिल योग्य ते न्यायालय/प्राधिकरण, कार्यालय येथे दावा दाखल करतील आणि त्याकामी होणाऱ्या सर्व कायदेशीर परिणामांची जबाबदारी संबंधित व्यक्ती, कंपनी, आस्थापना इ. ची राहील.

सही/-
**ॲड आनंद नारायण काटे**
वकील, मुंबई उच्च न्यायालय
मोबा. क्र. ९००४६०६९०३

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. ललीत गोंविद चौधरी, रा. अंबरनाथ ता. अंबरनाथ, जि. ठाणे यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली बिनशेती मिळकत विद्यमान मालकांकडून विकत घेणे करीता ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन :-** मौजे सापेले, तालुका- कर्जत, जिल्हा-रायगड येथील बिनशेती मिळकत

| मालकाचे नाव | सर्व्हे न. | हिस्सा नं. | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रू. | आकार पै. |
|---|---|---|---|---|---|
| | ३२ | २ | १२.६०.०० | १२६ | ०० |
| श्री उमेश गंगाराम कोकणे | ३२ | ४अ | ३१.६०.०० | ३१६ | ०० |

वरील वर्णनाच्या बिनशेती मिळकती बाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र,, चार्ज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार वकील यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
दि. २४/६/२०२४ — **मनोज किसन क्षिरसागर** (ॲडव्होकेट)
मु. सम्राट नगर, पो. नेरळ, ता.
कर्जत, जि. रायगड. पिन कोड ४१०१०१

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

प्रोसेस जमा — नि. ७/५
दि. — अर्जदार तर्फे वकील
**ॲड. अभिषेक विजय घरत**

**अलिबाग येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर साहेब यांचे कोर्टात**

दिवाणी चौकाशी अर्ज क्र./२०२४

१) श्रीमती अलका दत्तात्रेय माळी
२) श्रीमती पार्वती महादेव माळी — अर्जदार
३) सौ. ऋतुजा मयूर पाटील
४) सौ. अनघा प्रफुल्ल अनंतकर

विरूद्ध

कोणीही नाही

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वरील अर्जदार नं. १ यांचे पती, अर्जदार नं. २ यांचा मुलगा तसेच अर्जदार नं. ३ व ४ यांचे वडील, कै. दत्तात्रेय महादेव माळी हे. दि.११/०१/२०२३ रोजी मयत झाले असून त्यांस अर्जदार क्रं. १ ते ४ हेच कायदेशीर वारस आहेत. अर्जदारांनी सरकारी व इतर तस्यम कामाकरिता सक्षम कोर्टाकडून कै. दत्तात्रेय महादेव माळी यांचे वारस असल्याबाबत वारस दाखला मिळावा म्हणून या मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदारांच्या मागणी प्रमाणे त्यांना कै. दत्तात्रेय महादेव माळी यांचे वारस या नात्याने वारस दाखला देण्यास कोणत्याही व्यक्तीची, कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी सदर नोटिस प्रसिद्ध झाले पासून ३० (तीस) दिवसांचे आत किंवा दि. २२/०७/२४ पर्यंत स्वतः किंवा त्यांचे वकिलांमार्फत हजर राहून आपली हरकत कळवावी. वर दिलेल्या मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे कै. दत्तात्रेय महादेव माळी यांचे वारस म्हणून वारस दाखला (Heirship Certificate) देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे समजण्यात येवून मे. कोर्ट आवश्यक तो वारस दाखला देणेचा हुकूम अर्जदार यांचे लाभात करेल त्याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दि.१५.माहे.०६/२४२०२४ रोजी माझ्या साहिनिशी न्यायालयाच्या आज शिक्यानीशी दिले.

सही — कोर्टाचा शिक्का — सही
**अधिक्षक,** — **लिपिक**
**दिवाणी न्यायाधीश** — **दिवाणी न्यायाधीश**
**व स्तर, अलिबाग** — **व स्तर, अलिबाग**

## नि व ड क

### विराटचे चाहते नाराज

**नवी दिल्ली :** सुनिल गावसकर यांनी टी-२० विश्वचषकाच्या सुपर-८ मधील भारत-बांगलादेश सामन्यात समालोचन करताना रोहित आणि विराट बाद झाल्यावर दिलेली प्रतिक्रिया नेटकऱ्यांना रूचली नाही. रोहितने २३(११) धावा केल्या होत्या. त्यानंतर तो मोठा फटका मारण्याचा नादात बाद झाला. दरम्यान, विराटने ३७(२८) धावा केल्या. गावसकरांनी रोहितच्या खेळीचे सेल्फलेस खेळी असा उल्लेख केला. मात्र, विराट बाद झाला त्यावेळी गावसकरांनी कडक शब्दात टीका केली होती.

### अभिषेक शर्माला संधी

**नवी दिल्ली :** आगामी झिम्बाब्वे दौऱ्यासाठी सोमवारी (दि.२४) भारतीय क्रिकेट संघाची घोषणा करण्यात आली. या दौऱ्यात भारतीय संघाला ५ सामन्यांची टी-२० मालिका खेळायची आहे. या मालिकेसाठी भारताच्या संघात अभिषेक शर्मालाही संधी मिळाली आहे. त्यामुळे आता अष्टपैलू असलेल्या अभिषेकला आंतरराष्ट्रीय पदार्पणाची संधी मिळू शकते. डाव्या हाताने फलंदाजी आणि फिरकी गोलंदाजी करणाऱ्या अभिषेकचे गेल्या अनेक दिवसांपासून नाव क्रिकेट वर्तुळात चर्चेत होते.

### कर्णधारपदी गिलची नियुक्ती

**नवी दिल्ली :** बीसीसीआयने नुकतेच झिम्बाब्वे विरूद्धच्या टी-२० मालिकेसाठी आपल्या संघाची घोषणा केली. भारतीय संघ सध्या टी-२० विश्वचषक खेळत असल्याने आणि मालिका विश्वचषकानंतर लगेच होत असल्याने बीसीसीआयने मुख्य संघातील जवळपास सर्वांनाच विश्रांती दिली आहे. त्यामुळे या संघात भारताचा संपूर्ण युवा संघ खेळणार असून या युवा संघाचे नेतृत्व शुभमन गिल करणार आहे. गिलचे टी-२० विश्वचषकाचे तिकीट थोडक्यात हुकले होते.

### मेकअप आर्टिस्टचे निधन

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट संघाचा माजी खेळाडू इरफान पठाणचा मेकअप आर्टिस्ट फैयाज अन्सारी यांचे निधन झाले आहे. वेस्ट इंडिजमधील एका हॉटेलमध्ये हा अपघात झाला. स्विमिंग पूलमध्ये आंघोळ करत असताना त्याचा बुडून मृत्यू झाला. दरम्यान, स्विमिंग पूलमध्ये मित्रांना तो बेशुद्ध अवस्थेत सापडला होता. फैयाजला तातडीने रुग्णालयात नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. २१ जून रोजी सायंकाळी हा अपघात झाल्याचे सांगण्यात येत आहे.

### रसेलची चुकीची धाव

**फ्लोरिडा :** टी-२० विश्वचषकात सुपर-८ मधील शेवटच्या सामन्यात वेस्ट इंडिजला दक्षिण आफ्रिकेविरुद्ध पराभवाला सामोरे जावे लागले असून वेस्ट इंडिजला विश्वचषकातून बाहेर पडावे लागले आहे. दरम्यान, रबाडा डावातील १८ वे षटक टाकण्यासाठी आला असता पहिल्या चेंडूवर हौसेन शॉट खेळला. यानंतर हौसेन धाव घेण्यासाठी धावला, पण रसेल धोक्याच्या बाजूला धावत होता. मात्र, नॉर्कियाच्या थेट थ्रोमुळे रसेलला धावबाद व्हावे लागले. त्यामुळे सामना आफ्रिकेच्या बाजूस झुकला.

## भारतीय महिला संघाचे घवघवीत यश

# स्मृतीची झंझावती खेळी

**6 गडी 56 चेंडू राखून मात**

**मालिका 3-0 ने खिश्यात**

**। बंगळूर । वृत्तसंस्था ।**

भारतीय महिला क्रिकेट संघाने दक्षिण आफ्रिका संघाविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत यश संपादन केले आहे. श्रेयांका पाटील, अरुंधती रेड्डी व दीप्ती शर्मा यांच्या प्रभावी गोलंदाजीनंतर स्मृती मानधनाच्या आणखी एका धडाकेबाज खेळीच्या जोरावर भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेवर सहा गडी व ५६ चेंडू राखून मात केली आहे. तसेच, तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेत ३-० असे घवघवीत यश संपादन केले.

प्रथम फलंदाजी करणाऱ्या दक्षिण आफ्रिकेला भारताने २१५ धावात रोखले. भारताकडून अरुंधती आणि दिप्ती यांनी प्रत्येकी २ बळी घेतले. तर, श्रेयांका व वस्त्रकारने प्रत्येकी एक फलंदाज बाद केला.

भारताने आफ्रिकेचे २१५ धावांचे आव्हान पार करताना स्मृती आणि शफालीने ६१ धावांची सलामी दिली. शफाली २५ धावा करून बाद झाली. यानंतर पुनियाने २८ धावा करून स्मृतीची साथ सोडली. दरम्यान, स्मृती ही आपल्या सलग तिसऱ्या शतकाच्या दिशेने कूच करत होती. ती ९० धावांवर पोहचली असताना मलाबाने स्मृतीला बाद करत तिची शतकांची हॅट्ट्रिक होऊ दिली नाही. स्मृती बाद झाल्यानंतर कौर आणि रॉड्रिग्ज यांनी भारताला २०० धावांच्या पार पोहचवले. कौर बाद झाल्यावर रिचा घोषने षटकार मारत भारताच्या विजयाची औपचारिकता पूर्ण केली.

### स्मृतीने रचला आणखी एक इतिहास

भारताची दिग्गज महिला क्रिकेटपटू स्मृती मानधनाने इतिहास रचला आहे. स्मृती तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत सर्वाधिक धावा बनवणारी पहिली महिला क्रिकेटपटू बनली आहे. तिने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध पहिल्या एकदिवसीय सामन्यात १२७ चेंडूत ११७ धावा केल्या होत्या. त्यानंतर दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात १२० चेंडूत १३६ धावांची खेळी खेळली. यानंतर स्मृतीने तिसऱ्या सामन्यात ९० धावा ठोकत हा विक्रम आपल्या नावे केला आहे.

# दक्षिण आफ्रिकेवर पाऊस मेहरबान

## यजमान वेस्ट इंडिज चषकातून बाहेर

**। फ्लोरिडा । वृत्तसंस्था ।**

सुपर-८ सामन्यात दक्षिण आफ्रिकेने डकवर्थ लुईस नियमानुसार यजमान वेस्ट इंडिजचा तीन गडी राखून पराभव केला. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना वेस्ट इंडिज संघाने १३५ धावा केल्या. पण पावसामुळे दक्षिण आफ्रिकेला १२३ धावांचे लक्ष्य मिळाले. शेवटच्या षटकापर्यंत रंगलेल्या या सामन्यात अखेर आफ्रिकेने विजय मिळवत उपांत्य फेरीतील आपले स्थान पक्के केले.

सामन्यादरम्यान, आफ्रिकेने दोन षटकांनंतर २ बाद १५ धावा केल्या त्यावेळी पावसाला सुरुवात झाली आणि खेळ थांबवावा लागला होता. खेळ पुन्हा सुरू झाल्यानंतर दक्षिण आफ्रिकेला डकवर्थ लुईस नियमानुसार १७ षटकांत १२३ धावा करण्याचे नवे लक्ष्य मिळाले होते. दक्षिण आफ्रिकेकडून स्टब्सने सर्वाधिक २९ धावा केल्या. क्लासेन आणि मॅक्रॅम यांनीही चांगली सुरुवात केली. क्लासेनने २२ आणि मॅक्रॅमने १८ धावांचे योगदान दिले.

तत्पूर्वी, प्रथम फलंदाजी करताना वेस्ट इंडिजने १३५ धावा केल्या. साई होप खाते न उघडता पॅव्हेलियनमध्ये परतला. यानंतर निकोलस पुरनही १ धावा काढून बाद झाला. यानंतर काईल मेयर्स आणि रोस्टन चेस यांनी काही काळ मैदानावर टिकून राहण्याचा प्रयत्न केला. रोस्टन चेसने ४२ चेंडूत ३ चौकार आणि दोन षटकारांसह ५२ धावा केल्या. ३५ धावा केल्यानंतर मेयर्स शम्सीचा बळी ठरला. आंद्रे रसेलने १५ धावांचे योगदान दिले. अल्झारी जोसेफने ११ धावा केल्या. रोस्टन चेसच्या खेळीमुळेच वेस्ट इंडिजचा संघ सन्मानजनक धावसंख्या गाठू शकला. दक्षिण आफ्रिकेकडून तबरेझ शम्सीने ४ षटकांत २७ धावा देत तीन बळी घेतले.

# गतविजेत्या साहेबांची अमेरिकेवर मात

**। ब्रिजटाऊन । वृत्तसंस्था ।**

ख्रिस जॉर्डनने हॅट्रिकसह टिपलेले चार फलंदाज आणि कर्णधार जॉस बटलरच्या घणाघाती नाबाद ९० धावांच्या खेळीच्या जोरावर गतविजेत्या इंग्लंड संघाने रविवारी अमेरिका संघावर १० गडी व ६२ चेंडू राखून मोठा विजय मिळवला. यावबरोबर टी-२० विश्वकरंडकाच्या उपांत्य फेरीत ही प्रवेश केला. या स्पर्धेच्या उपांत्य फेरीत पोहोचणारा इंग्लंड हा पहिला संघ ठरला आहे.

या विजयामुळे आता दक्षिण आफ्रिका व वेस्ट इंडीज यांच्यामधील लढतीच्या निकालानंतर उपांत्य फेरीत पोहोचणारा दुसरा देश ठरणार आहे.

यावेळी अमेरिका संघाकडून इंग्लंडसमोर ११६ धावांचे आव्हान ठेवण्यात आले होते. उपांत्य फेरीत पोहोचण्यासाठी इंग्लंडला हे आव्हान १८.४ षटकांत पूर्ण करायचे होते. बटलर व फिल या सलामी जोडीने अमेरिका गोलंदाजांवर वर्चस्व गाजवले. दोघांनी नाबाद ११७ धावांची आक्रमक भागीदारी केली. अवघ्या ९.४ षटकांत हे आव्हान ओलांडण्यात आले. बटलरने ३८ चेंडूंमध्ये सहा चौकार व सात षटकारांच्या आतषबाजीने नाबाद ८३ धावांची खेळी साकारली. सॉल्टने नाबाद २५ धावा करीत त्याला उत्तम साथ दिली.

# फुटबॉल स्पर्धेचे आयोजन

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

खारघर येथील वेबवर हायस्कूलच्या मैदानात जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून तयेच शेकापचे अजित अडसुळे आणि उषा अडसुळे यांच्या मार्गदर्शनाखाली मान्सून फुटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. खेळीमेळीच्या वातावरणात पार पडलेल्या या फुटबॉल स्पर्धेमध्ये एकूण १६ संघाने भाग घेतला होता. यामध्ये प्रथम विजेते बीवायबीएफसी आणि उपविजेते म्हणून पीएफए संघाची निवड झाली. मॅन ऑफ द टूर्नामेंट म्हणून कैफ आणि बेस्ट किपर म्हणून आर्यन याची निवड करण्यात आली.

यावेळी देवानंद मढवी, खारघर शेकापचे जगदीश घरत, तेजस्वी घरत, कल्पेश तोडेकर, शिवाजी पाटील, यशवंत देशपांडे आदी मान्यवर उपस्थित होते.

### अफगाणांचा विजयी जल्लोष

**फ्लोरिडा :** टी-२० विश्वचषकस्पर्धेत अफगाणिस्तान आणि ऑस्ट्रेलिया संघातील सामन्यात अफगाणिस्तानने २१ धावांनी विजय मिळवला. अफगाणिस्तानसाठी हा विजय ऐतिहासिक ठरला आहे. कारण आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध मिळवलेला हा अफगाणिस्तानचा पहिलाच विजय होता. यामुळे अफगाणिस्तानने या विजयाचा जोरदार जल्लोष केला. यावेळी अफगाणिस्तान खेळाडूंनी हॉटेलकडे जात असताना बसमध्ये गोलंदाजी सल्लागार ड्वेन ब्रावो याने काही वर्षांपूर्वी गायलेल्या त्याच्या 'चॅम्पियन' या गाण्यावर त्याच्यासह नृत्यही केले.

# पोर्तुगाल नवव्यांदा बाद फेरीत

**। डॉर्टमंड । वृत्तसंस्था ।**

पोर्तुगालने युरो करंडक फुटबॉल स्पर्धेच्या 'फ' गटातून बाद फेरी निश्चित केली आहे. त्यांनी तुर्कस्तानवर ३-० फरकाने सफाईदार विजय मिळविला. प्रतिस्पर्ध्यांच्या विस्कळित खेळाचा रोनाल्डोच्या नेतृत्वाखालील संघाला फायदा झाला. पोर्तुगालचा संघ नवव्यांदा बाद फेरीत पोहोचला आहे.



अगोदरच्या लढतीत चेक प्रजासत्ताकावर निसटती मात केलेल्या पोर्तुगालने प्रारंभापासूनच वर्चस्व राखत 'फ' गटातील सलग दुसऱ्या विजयाची नोंद केली. त्यांचे एकूण सहा गुण झाले आहेत. पहिल्या लढतीत जॉर्जियाला नमविलेल्या तुर्कस्तानचे आता तीन गुण कायम असून अखेरचा साखळी सामना त्यांच्यासाठी महत्त्वाचा आहे. चेक प्रजासत्ताक व जॉर्जियाचा प्रत्येकी एक गुण आहे. अखेरच्या फेरीत पोर्तुगाल जॉर्जियाविरुद्ध खेळेल, तर चेक प्रजासत्ताकविरुद्ध तुर्कस्तानची लढत होईल.

सामन्याचा मानकरी ठरलेल्या बर्नार्डो सिल्वा याने डाव्या पायाच्या सणसणीत फटक्यावर पोर्तुगालला २१व्या मिनिटाला आघाडी मिळवून दिली. नंतर २८व्या मिनिटाला गोलरक्षक बायिन्दिर व बचावपटू अकायदिन यांच्यातील समन्वयाच्या अभावाचा फटका तुर्कस्तानला बसला. अकायदिनच्या स्वयंगोलामुळे पोर्तुगालच्या खाती आणखी एक गोल जमा झाला. ५६व्या मिनिटाला रोनाल्डोच्या निःस्वार्थी साह्यावर फर्नांडिसने पोर्तुगालला बाद फेरीत नेणारा गोल केला. रोनाल्डोने आता युरो करंडक इतिहासात आठ असिस्टची नोंद केली आहे.

### रोनाल्डोच्या सुरक्षेबाबत प्रश्न

**डॉर्टमंड :** पोर्तुगालचा दिग्गज फुटबॉलपटू ख्रिस्तियानो रोनाल्डो हा लोकप्रिय खेळाडू असून अनेकदा काही चाहते त्यासोबत सेल्फी काढण्यासाठी मोठी जोखीम ही स्विकारत असतात. शनिवारी पोर्तुगाल आणि तुर्कस्थान या सामन्यात तीन वेळा प्रेक्षकांनी सुरक्षा तोडली. पहिल्यांदा सामन्याच्या ६९व्या मिनिटाला एका छोट्या चाहत्याने मैदानात धाव घेतली. यानंतर अखेरची काही मिनिटे असताना आणखी दोन जणं मैदानात घूसले. यानंतर पुन्हा आणखी एका व्यक्तीने मैदानाची सुरक्षा तोडली आणि रोनाल्डोजवळ जाण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे आता रोनाल्डोच्या सुरक्षेचा प्रश्नही उपस्थित होत आहे.

## रत्नागिरी लय भारी!

# सलग दुसऱ्यांदा कोरलं विजेतेपदावर नाव

**। पुणे । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र क्रिकेट असो.च्या महाराष्ट्र प्रीमियर लीग स्पर्धेत सलग दुसऱ्या वर्षी रत्नागिरीने आपला दबदबा कायम राखला. या लीगच्या अंतिम सामन्यात इगल नाशिक टायटन्सन संघाला हरवून रत्नागिरी जेट्सने सलग दुसऱ्यांदा विजेतेपदावर नाव कोरले. पुण्यात झालेल्या अंतिम सामन्यात नाशिकने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला होता.

रत्नागिरीने प्रथम फलंदाजी करताना धीरज (२७), किरण (३५), अभिषेक (२८), निखिल (३६) यांच्या खेळीच्या जोरावर १६० धावा केल्या. नाशिकचा अष्टपैलू मुकेश चौधरीने सर्वाधिक ३ बळी घेतले. तर, हरी सावंतने २ गडी बाद केले. रत्नागिरीच्या आघाडीच्या फळीतील इतर फलंदाज दुहेरी धावसंख्या गाठू शकले नाहीत. मात्र, मधल्या फळीतील फलंदाजांनी फटकेबाजी करत संघाला आव्हानात्मक धावसंख्या उभारून दिली.

रत्नागिरीने दिलेले १६१ धावांचे आव्हान घेऊन मैदानात उतरलेल्या नाशिकचे दोन फलंदाज दहा धावांवर बाद झाले. मधल्या फळीत मुकेश चौधरीने फटकेबाजी केली. मुकेश चौधरीने ३५ चेंडूत ५० धावा केल्या. रत्नागिरीकडून गोलंदाजी करताना सत्यजित बच्चावने ४ षटकात ४ गडी बाद केले. तर, किरण थोरात आणि दिव्यांग हिंगणेकर यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. नाशिकला २० षटकात ९ बाद १३६ धावांपर्यंतच मजल मारता आली. रत्नागिरी जेट्सने हा सामना २४ धावांनी जिंकला.

### २०२३ मध्येही विजेतेपद

**महाराष्ट्र प्रीमियर लीगच्या पहिल्या पर्वातही रत्नागिरी जेट्सने विजेतेपद पटकावले होते. २०२३ मध्ये अंतिम सामन्यात केदार जाधवच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या कोल्हापूर टस्कर्सला नमवून रत्नागिरी जेट्सने विजेतेपदावर नाव कोरले होते. आता यंदा पुन्हा एकदा रत्नागिरी जेट्सने अजिम काझीच्या नेतृत्वाखाली आपला दबदबा कायम राखत सलग दुसऱ्यांदाचे विजेतपद पटकावले.**

# बेल्जियमचा चमकदार विजय

**। कलोन । वृत्तसंस्था ।**

फिफाच्या जागतिक क्रमवारीत तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या बेल्जियमला युरो करंडक फुटबॉल स्पर्धेत प्रारंभीच पराभवाचा धक्का बसला होता. मात्र, त्यातून सावरत त्यांनी शनिवारी रात्री रुमानियावर दोन गोलने चमकदार विजय मिळविला. परिणामी आता 'ई' गटात चुरस वाढली आहे. बेल्जियमच्या विजयात युरी टेलेमान्स याने पूर्वार्धात व कर्णधार केविन द ब्रह्न याने उत्तरार्धात प्रत्येकी एक गोल केला.

पहिल्या फेरीत बेल्जियमला स्लोव्हाकियाने धक्का दिला होता, तर रुमानियाने युक्रेनला पराजित केले होते. नंतर युक्रेनने स्लोव्हाकियास हरवून आव्हान कायम राखले. युरो करंडकाच्या इतिहासातील तिसऱ्या क्रमांकाचा सर्वांत वेगवान गोल युरी टेलेमान्स याने सामना सुरू झाल्यानंतर ७३ व्या सेकंदास (१ मिनीट, १३ सेकंद) नोंदविला. रुमानियाच्या बचावफळीवर वारंवार दडपण आणलेल्या कर्णधार केविन द ब्रह्न याने ८० व्या मिनिटास बेल्जियमची आघाडी वाढविली. गोलरक्षक कोएन कॅस्टएल्स याने दुरवरून मारलेल्या फटक्यावर ३२ वर्षीय द ब्रह्न याने चेंडू नियंत्रित केला आणि नंतर रुमानियाचा बचाव भेदला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)